तृतीय वर्ष कला

भूगोल अभ्यासपत्रिका क्र. ७

लोकसंख्या व आर्थिक भूगोल

© UNIVERSITY OF MUMBAI

डॉ. देवानंद शिंदे
प्रभारी कुलगुरू,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

डॉ. धनेश्वर हरिचंदन
प्रभारी संचालक
दूर व मुक्त अध्ययन संस्था,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

प्रा. अनिल आर. बनकर,
सहयोगी प्राध्यापक इतिहास आणि सहाय्यक संचालक व
प्रभारी अध्ययन साहित्य विभाग,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

कार्यक्रम समन्वयक : **प्रा. अनिल आर. बनकर,**
सहयोगी प्राध्यापक इतिहास आणि सहाय्यक संचालक,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

लेखक : **डॉ. शिवराम ए. ठाकुर**
भूगोल विभाग प्रमुख,
एस.पी.के. महाविद्यालय, सांवतवाडी

: **डॉ. आर. बी. पाटील**
भूगोल विभाग प्रमुख,
फोंडाघाट, आर्टस आणि कॉमर्स महाविद्यालय, कनकवली

: **डॉ. हेमंत एम. पेडणेकर**
मुख्याध्यापक,आर्टस, सायन्स आणि कॉमर्स महाविद्यालय,
ओंडे, विक्रमगड

: **डॉ. सुमेधा धुरी**
सहाय्यक प्राध्यापक भूगोल विभाग
डॉ. जे.बी. नाईक, आर्टस आणि कॉमर्स आणि
आरपीडी ज्युनियर महाविद्यालय, सांवतवाडी

संपादन : **डॉ. आर. बी. पाटील**
भूगोल विभाग प्रमुख,
फोंडाघाट, आर्टस आणि कॉमर्स महाविद्यालय, कनकवली

जानेवारी २०१८, तृतीय वर्ष कला, भूगोल अभ्यासपत्रिका क्र. ७, लोकसंख्या व आर्थिक भूगोल

प्रकाशक : प्रभारी संचालक, दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ,
विद्यानगरी, मुंबई -४०० ०९८.

अक्षर जुळणी : अश्विनी आर्टस्,
गुरुकृपा चाळ, एम्. सी. छगला मार्ग, बामणवाडा,
विलेपार्ले (पूर्व), मुंबई - ४०० ०९९.

मुद्रण :

अनुक्रमणिका

क्रमांक	अध्याय	पृष्ठ क्रमांक
१.	लोकसंख्या भूगोल	०१
२.	लोकसंख्येची वाढ व वितरण	१०
३.	लोकसंख्या सिद्धांत	२९
४.	स्थलांतर	३९
५.	भारतातील लोकसंख्या	५०
६.	आर्थिक भूगोलाचे स्वरुप	६४
७.	आर्थिक व्यवसाय	७२
८.	उद्योगधंदे	८१
९.	वाहतूक, व्यापार व व्यापारी गट	८७
१०.	भारतातील आर्थिक विकास	१०१

❖❖❖❖

TYBA
Geography Paper – VII
POPULATION AND ECONOMIC GEOGRAPHY

(Section – A) Population Geography

UNIT- I
Population Geography
Concept, Definition, Nature, Scope, Importance,
Population Geography and other Social Sciences, Historical Development in Population Geography

UNIT- II
Growth, Distribution and Density
Growth - Definition, Causes, Effects and
Remedies to control the growth of population
Distribution– Factors affecting on distribution of population in World and India
Density – Zones of density of population in world

UNIT- III
Demographic Theories
Demographic transition theory
Malthus Theory
Karl Marx Theory

UNIT- IV
Migration
Definition, Types, Causes, effects
Recent trend of migration of population in India

UNIT- V
Population of India
Distribution of Tribes, Major Religious groups, Occupational structure, Age structure, Population Policy of India

(Section – B) Economic Geography

UNIT-VI
Nature and Scope of Economic Geography
Definitions, Concept of Economic Regions, Relation of Economic Geography with Economics and other branches of social sciences, Importance of the study of Economic Geography

UNIT-VII
Economic activities
Factors of location of economic activities: physical, economic, social and cultural, Sectors of economy: primary, secondary and

tertiary, Major primary economic activities- Significance and world types

UNIT-VIII

Industries

Classification of industries: Recourse based and foot loose industries, Theories of industrial location: Weber and Losch

UNIT-IX

Transport, Trade and Trading blocks

Modes of Transport and Transport cost: Bases of spatial interaction, Recent trend in international trade, Major trading organizations and trading blocks: WTO, OPEC, ASEAN, SAARC, EFTA, LAFTA, EU, G20, BRICKS etc.

UNIT-X

Economic Development of India

Regional disparities in India, Globalization and Indian economy, its impact on environment, Concept of SEZ and related issues in India.

❖❖❖❖

१

लोकसंख्या भूगोल

घटक संरचना :

१.० उद्दिष्टे
१.१ प्रस्तावना
१.२ लोकसंख्या भूगोलाचा उगम व विकास
१.३ लोकसंख्या भूगोल - व्याख्या
१.४ लोकसंख्या भूगोलाचे स्वरुप व व्याप्ती
१.५ लोकसंख्या भूगोलाच्या अभ्यासाचे महत्त्व
१.६ लोकसंख्या भूगोल आणि इतर सामाजिक शास्त्रे
१.७ लोकसंख्या भूगोलाचा इतिहास व विकास

१.० उद्दिष्टे

- लोकसंख्या भूगोलाची व्याख्या, स्वरुप व व्याप्ती लक्षात घेणे.
- लोकसंख्या भूगोलाच्या अभ्यासाचे महत्त्व लक्षात घेणे.
- लोकसंख्या भूगोल व इतर सामाजिक शास्त्रामधील संबंध तपासणे.
- लोकसंख्या भूगोलाचा विकास समजून घेणे.

१.१ प्रस्तावना

लोकसंख्या भूगोल ही मानवी भूगोलाची एक प्रमुख शाखा आहे. या विषयाचे स्वरुप इतके विस्तृत आहे की, त्याचा स्वतंत्र अभ्यास विशिष्ट अशा शाखेमध्ये करावा लागतो. त्रिवार्थास लोकसंख्या भूगोलाचे जनक मानतात. कारण १९५३ मध्ये अमेरिकन भूवैज्ञानिकांच्या मेळाव्यात बोलताना लोकसंख्या भूगोल ही एक स्वतंत्र शाखा आहे असे त्याने प्रतिपादन केले. दुसऱ्या महायुध्दानंतर बरेचसे देश वसाहत वादातून मुक्त झाले. त्यांनी विकासाला सुरुवात केली. परंतु सतत वाढणाऱ्या लोकसंख्या व्दारे विविध प्रकारचे प्रश्न निर्माण झाले. त्यातूनच लोकसंख्या भूगोलविषयी जागरुकता निर्माण झाली म्हणूनच लोकसंख्या भूगोल हा भूगोल विषयाला अलिकडे फुटलेला एक अंकूर आहे.

१.२ लोकसंख्या भूगोलाचा उगम व विकास :

दुसऱ्या महायुध्दानंतर लोकसंख्या भूगोल या विषयाचा विकास झाला असला तरी लोकसंख्येसंबंधीचा अभ्यास फार पूर्वीपासून चालू आहे. ख्रिस्तपूर्व ३२१ ते २६९ दरम्यान 'कौटिलिय अर्थशास्त्र' नामक ग्रंथात लोकसंख्येची आर्थिक व शेती संबंधात गणती कशी करावी याचे विवेचन आढळते. लोकसंख्येच्या शास्त्रशुध्द अभ्यासास १७ व्या शतकापासून सुरुवात झालेली आढळते. जॉन ग्रॉट याने लंडन व सभोवतालच्या परिसर येथील मृत्यूदाखले वापरुन महत्वाचे लोकसंख्या विषयक निष्कर्ष काढले. १७ व्या शतकात ससूमिल्य या जर्मन अभ्यासकाने मोठा ग्रंथ लिहून त्यात मृत्यूसारणी तयार केली. १७६६ ते १८३४ या दरम्यान थॉमस माल्थस याने लोकसंख्या वाढीचा वेग व अन्नधान्य उत्पादनाचा वेग यातील तफावत जाणून एक महत्वाचा सिध्दांत मांडला. म्हणूनच माल्थसला लोकसंख्या विज्ञानाचा जनक असे म्हटले जाते.

१९ व्या शतकात वैद्यकिय शास्त्रात प्रगती होऊ लागली. त्याचा परिणाम म्हणजे मृत्यूदर झपाट्याने खाली येऊ लागला. संसर्गजन्य रोगावर मात करण्यात आली. आयुर्मानात वाढ झाली व लोकसंख्या वाढीवर परिणाम झाला. १९ व्या शतकाच्या अखेरीस जनन या घटकाबद्दल अभ्यास सुरु झाला. १९ व्या शतकातच लोकसंख्या शास्त्रातील स्थलांतर या महत्वपूर्ण अंगाच्या अभ्यासालाही महत्व प्राप्त होऊ लागले. म्हणूनच लोकसंख्या अभ्यासाला मोठी चालना मिळाली.

दुसऱ्या महायुध्दानंतर अनेक अविकसित देश स्वतंत्र झाले. देशातील लोकांच्या विकासासंबंधीच्या आकांक्षा वाढल्या. लोकसंख्या हा घटक कित्येक देशाच्या जलद विकासास अडसर ठरु लागला व त्यामुळे त्या देशाच्या भौगोलिक पार्श्वभूमीच्या व नैसर्गिक संपत्तीच्या संदर्भात लोकसंख्येचा अभ्यास सुरु झाला. या विषयाची जगभर प्रगती करण्यात आली. आणि विकसनशील राष्ट्रामध्ये लोकसंख्येच्या अभ्यासास उत्तेजन देण्यात युनायटेड नेशन्सचा फार मोठा वाटा आहे.

१९५९ मध्ये त्रिवार्ता यांनी लोकसंख्या भूगोलाला एक स्वतंत्र विषय म्हणून स्थान म्ळवून दिले. त्यातूनच लोकसंख्या भूगोल या नव्या ज्ञानशाखेचा जन्म झाला. पदवी पातळीवर लोकसंख्या भूगोल हा विषय आणणारे व त्यादृष्टीने अभ्यासक्रमाची रचना करणारे त्रिवार्ता हेच पहिले भूगोलतज्ञ होते. यानंतर अमेरीकेतील व त्यामागोमाग जगातील अनेक विद्यापीठातून हा विषय स्वतंत्र विषय म्हणून शिकवला जाऊ लागला. क्लार्क यांनी या विषयात भर टाकली.

तुमची प्रगती तपासा :

१) लोकसंख्या भूगोलाचा उगम व विकास स्पष्ट करा.

१.३ लोकसंख्या भूगोल व्याख्या

१) पृथ्वीच्या पृष्ठभागावर वितरीत झालेल्या लोकांचा किंवा प्रदेशातील प्रावृतिक, सांस्वृतिक व आर्थिक घटकांचा त्या समुहाशी असलेला संबंध म्हणजे लोकसंख्या भूगोल होय. - त्रिवार्ता.

२) लोकसंख्या वितरण, घटना, स्थलांतर यांच्यातील क्षेत्रीय विविधता ही स्थलीय स्वरुप व विविधतेशी कशी निगडीत आहे याचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे लोकसंख्या भूगोल होय. - क्लार्क

३) प्रादेशिक भिन्नतेनुसार मानव जाती मधील वेगळेपणा अभ्यास म्हणजेच लोकसंख्या भूगोल होय किंवा लोकसंख्या भूगोल म्हणजे लोकसंख्येच्या प्रादेशिक वितरणाचा स्थलकालसापेक्ष अभ्यास होय.

तुमची प्रगती तपासा :

१) लोकसंख्या भूगोलाची व्याख्या द्या.

१.४ लोकसंख्या भूगोलाचे स्वरुप व व्यासी

लोकसंख्या भूगोल ही भूगोलाची एक स्वतंत्र शाखा आहे. इतर शास्त्रातील तज्ञांनी या अभ्यासाला यथाशक्ती मदत केली आहे. लोकसंख्या भूगोलात 'मानव' हाच केंद्रबिंदू मानला जातो. लोकसंख्या भूगोल हा विषय बहुव्यापी स्वरुपाचा असून मानव या घटकाच्या अस्तित्वाद्वारे तो बहूस्पर्शी देखील झाला आहे. भूपृष्ठातील मानव हा एक महत्वाचा घटक म्हणून लोकांचा

अभ्यास केला जातो. पृथ्वीवर बदल घडवून आणणाऱ्या इतर विघटकांप्रमाणेच मानव हा एक अतिशय मूलभूत घटक आहे. लोकसंख्या समस्या कशा निर्माण करते. या समस्या सोडविण्यासाठी भौगोलिक दृष्टीकोनातून विचार करावा लागतो. याचा अभ्यास लोकसंख्या भूगोलामध्ये केला जातो.

लोकसंख्येचा प्रदेशानुसार अभ्यास, प्रदेशानुसार लोकसंख्येमध्ये असलेली भिन्नता प्रदेशानुसार असलेली वैशिष्ट्ये ही लोकसंख्या भूगोलाच्या अभ्यासातील अंगे आहेत. लोकसंख्येत प्रदेशानुसार भिन्नता कशी निर्माण झाली हे लोकसंख्येच्या अभ्यासावरुन सहज लक्षात येते. लोकसंख्येचे वितरण, लोकसंख्या वाढ, स्थलांतर, लोकसंख्येची वैशिष्ट्ये, धर्म, जात, वंश, राहणीमानाचा दर्जा, स्त्री पुरुषांचे प्रमाण, लोकसंख्येची जागतिक, सामाजिक रचना व त्याच्या सभोवताली असणाऱ्या पर्यावरणातील घटकांचा संबंध हा लोकसंख्येच्या भूगोलाच्या अभ्यासाचा प्रमुख विषय आहे.

मानस शास्त्रीय व सामाजिक स्थितीचाही लोकसंख्या भूगोलाच्या अभ्यासात आढावा घ्यावा लागतो. म्हणूनच आतर सामाजिक शास्त्राशी भूगोलाचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष संबंध येतो.

१) **लोकसंख्या वितरणाचा अभ्यास** - या भागात लोकसंख्येचे व लोकसंख्येच्या वैशिष्ट्यांचे खंड, देश राज्य, प्रदेश त्याचे वितरण स्पष्ट केले जाते. वितरणाचे स्वरुप भूतकाळात झालेले बदल याचा विचार या गटात केला जातो.

२) **लोकसंख्येच्या घनतेचा अभ्यास** - यात लोकसंख्येची घनता, तिचे विविध प्रकार त्यावर परिणाम करणारे भौगोलिक व सांस्कृतिक घटक आणि जागतिक लोकसंख्येच्या घनतेचा आवृत्तीबंध यांचा समावेश होतो.

३) **लोकसंख्या स्थलांतर** - यात प्रामुख्याने देशातील अंतर्गत भागात व देशाबाहेर होणारी स्थलांतरे, स्थलांतरास प्रवृत्त करणारे घटक, स्थलांतराचे प्रकार आणि परिणाम. स्थलांतराचा भौगोलिक स्वरुपावर व भौगोलिक स्वरुपाचा स्थलांतर वर होणारा परिणाम याचा समावेश होतो.

४) **लोकसंख्येची वाढ** - लोकसंख्येत बदल घडवून आणणारे जन्म, मृत्यू त्यांची मोजण्याची परिमाणे, प्रदेशानुसार जन्मदरातील व मृत्यूदरातील कल व त्यावर परिणाम करणारे घटक लोकसंख्या वाढीबद्दल सिध्दांत इत्यादींचा समावेश या गटात केला जातो.

५) **लोकसंख्येची रचना** - यात धर्म, वंश, वय, लिंग, जात, व्यवसाय, शिक्षण, आर्थिक दर्जा वैवाहिक स्थिती या निकषावर आधारीत लोकसंख्येची विभागणी, त्यांची वैशिष्ट्ये भौगोलिक परिस्थितीचा त्यावर झालेला परिणाम याचा अभ्यास केला जातो.

६) **लोकसंख्येतील साक्षरतेचे प्रमाण -** लोकसंख्या अभ्यासात याला विशेष महत्व आहे. साक्षरतेचे निकष प्रदेशानुसार साक्षरतेचे प्रमाण, साक्षरता व लोकांची गुणवत्ता याचा अभ्यास यात केला जातो.

७) **ग्रामीण नागरी लोकसंख्या -** ग्रामीण नागरी लोकसंख्येची वैशिष्ट्ये, नागरीकरण प्रक्रिया, जगातील विविध प्रदेशातील नागरीकरणाचा कल व परिणाम इत्यादीचा समावेश यामध्ये होतो.

८) **लोकसंख्या व नैसर्गिकसाधन संपत्ती -** साधन संपत्तीचा विकास, साधन संपत्तीच्या विकासावर लोकसंख्या वाढीचा परिणाम, लोकसंख्येचा अतिरिक्त भार, विविध प्रदेशातील लोकसंख्या व साधन संपत्ती, आणि तंत्रज्ञान यामध्ये योग्य संतुलन साधण्यासाठी असलेली लोकसंख्या धोरणे इत्यादीचा समावेश या भागामध्ये होतो. वरीव सर्व गोष्टींचा विचार केल्यानंतर लोकसंख्या भूगोलाची व्याप्ती विस्तृत स्वरुपाचा आहे असे लक्षात येते.

तुमची प्रगती तपासा :

१) लोकसंख्या भूगोलाची व्याप्ती स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

_____

१.५ लोकसंख्या भूगोलाच्या अभ्यासाचे महत्व

- भूविज्ञान या शाखेत पृथ्वीच्या पृष्ठभागावरील भौगोलिक व सांस्कृतिक घटकांच्या वितरणाचा अभ्यास केला जातो. माणूस हा सुध्दा निसर्गातील सर्वात बुध्दीमान व शक्तीमान असा सजीव घटक आहे. म्हणून विविध प्रदेशातील लोकांच् वितरण कशाप्रकारचे आहे. याचाही अभ्यास करावा लागतो.

- प्रदेशानुसार लोकांच्या वैशिष्ट्यात भिन्नता आढळते. ही भिन्नता नैसर्गिक घटकांवर अवलंबून असते. प्रादेशिक विविधता समजावून घेणे हा लोकसंख्या भूगोलाच्या अभ्यासातील प्रमुख उद्देश मानला जातो.

- अलिकडे पर्यावरणाच्या अभ्यासाला खूपच महत्व प्राप्त झाले आहे. पर्यावरणात बदल घडवून आणणारा माणूस प्रमुख घटक असल्याने पर्यावरणाबरोबर लोकांच्या वैशिष्ट्यांचा त्यांच्या संख्येचा अभ्यास करावा लागतो.

- विविध प्रकारचे नियोजन आखण्यासाठी तेथील साधनसंपत्तीचा विचार करावा लागतो. मानवाशी संबंधित वेगवेगळ्या प्रकारचे नियोजन आखण्यासाठी उदा. एखाद्या प्रदेशात प्राथमिक आरोग्य केंद्र निर्माण करावयाचे असेल तर तेथील लोकसंख्येचा विचार केला जातो. त्यासाठी आधी लोकसंख्येचा अभ्यास करावाच लागतो.

- लोकसंख्येची गतिमानता, वितरण, लोकसंख्येत होणारे स्थलांतर इ. घटकाव्दारे विविध प्रकारचे प्रश्न किंवा समस्या निर्माण होत असतात. अशा प्रकारच्या समस्या समाजावून घेण्यासाठी समस्यांचे आकलन करण्यासाठी लोकसंख्येच्या अभ्यासाची गरज असते.

- मानव हा जर लोकसंख्या भूगोलाचा गाभा आहे तर मानव हात लोकसंख्येच्या विविध गुणधर्मांना साकार करणारा घटक आहे. म्हणून लोकसंख्येचा अभ्यास करणे महत्वाचे ठरते.

- भूगोलामध्ये मानव आणि संपदा याचा परस्पर अभ्यास केला जातो. मानवाची विकास उपभोगण्याची क्षमता ही त्या प्रदेशातील मानवी संपत्तीवरच अवलंबून असते. दरडोई उत्पादन, दारिद्रय, बेकारी यासारख्या समस्या मानव आणि संपदाच्या विकासातून निर्माण होत असतात. त्या समस्यांचे स्वरुप समजावून घेण्यासाठी व अशा समस्या सोडविण्यासाठी भूगोलात लोकसंख्या अभ्यासाला अतिशय महत्व आहे.

थोडक्यात नैसर्गिक पर्यावरणातील मानव हा एक मूलभूत घटक असून नैसर्गिक परिस्थितीत सांस्कृतिक भूदृष्य निर्माण करण्याचे काम मानव करीत असतो. परंतु प्रदेशानुसार सांस्कृतिक भूदृश्यात पढणारा फरक लोकांच्या दृष्टीकोनावर, कार्यक्षमतेवर, गुणवत्तेवर, दर्जावर अवलंबून असतो म्हणून हे समजावून घेण्यासाठी लोकसंख्या भूगोलाच्या अभ्यासाला भूगोल विषयात खूपच महत्व आहे.

तुमची प्रगती तपासा :

१) लोकसंख्या भूगोलाच्या अभ्यासाचे महत्त्व वर्णन करा.

_____

_____

_____

_____

_____

१.६ लोकसंख्या भूगोल आणि इतर सामाजिक शास्त्रे

१) **अर्थशास्त्र व लोकसंख्या भूगोल -** सध्याच्या विकसनशील देशांमध्ये लोकसंख्या वाढ, आर्थिक विकास व विकसात्मक नियोजन हे प्रश्न विशेष महत्वाचे ठरतात. लोकसंख्या व आर्थिक घटक हे परस्परांशी निगडीत असतात. अन्नधान्याची गरज आणि अन्नधान्याची मागणी, रोजगाराची उपलब्धता, बचत व गुंतवणूक या सर्व आर्थिक गोष्टी लोकसंख्या शास्त्राशीच संबंधित आहेत.

२) **समाजशास्त्र व लोकसंख्या भूगोल -** समाजशास्त्रामध्ये कुटुंब रचना, जनन क्षमता, विवाह, नागरीकरण, झोपडपट्यांची वाढ, सामाजिक गतिमानता, सामाजिक परिवर्तन, लोकसंख्या बदल इ. चा अभ्यास केला जातो. हे सर्व घटक लोकसंख्या शास्त्राशी संबधीत आहेत.

३) **राज्यशास्त्र व लोकसंख्या भूगोल -** धर्म, जात, शिक्षण, साक्षरतेची पातळी, ग्रामीण व नागरी लोकसंख्येची विभागणी, मतदानाचा हक्क इ. सर्व घटकांविषयी अभ्यास राज्यशास्त्रासत केला जातो. भारतीय राज्यव्यवस्थमध्ये प्रोढ मतदान पध्दतीला सुरवात झाल्यापासून मतदाराचे म्हणजेच लोकांचे वर्तन समजून घेण्याबद्दल औत्सुक्य निर्माण झाले आहे. या सर्वांचा संबंध लोकसंख्या भूगोलाशी येतो.



४) **वैद्यकीय शास्त्र व लोकसंख्या भूगोल -** लोकसंख्या भूगोल व वैद्यकीय शास्त्र या दोन्हींचा परस्परांशी खूप जवळचा संबंध आहे. वैद्यक शास्त्रात रोगाचे निदान करून त्यावर उपचार केले जातात. वैद्यकीय सुविधांमध्ये वाढ झाल्यामुळे आर्युमान वाढलेले आहे. उपलब्ध वैद्यकीय सुविधा व त्या प्रदेशातील लोकसंख्या यांचा अभ्यास केला तर या दोन्हीमध्ये खूप जवळचा परस्पर संबंध दिसून येतो.

तुमची प्रगती तपासा :

१) लोकसंख्या भूगोलाचा इतर शास्त्रांशी असणारा संबंध स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

_____

१.७ लोकसंख्या भूगोलाचा इतिहास व विकास

दुसऱ्या महायुध्दानंतर अनेक देश स्वतंत्र झाले. त्या देशांनी विकासास सुरूवात केली. विविध प्रकारच्या सुधारणा घडून मृत्यू दराचे प्रमाण एकदम कमी झाले. जन्म प्रमाण मात्र कमी होऊ शकले नाही. म्हणून जगातील अनेक देशात लोकसंख्या भरमसाठ वाढली. विकासाच्या मार्गात अडचण ठरू लागली. वाढत्या लोकसंख्येद्वारे विविध प्रकारचे प्रश्न निर्माण झाले. त्यातूनच खऱ्या अर्थाने जगातील अनेक विद्वान लोकांचे लक्ष लोकसंख्येच्या अभ्यासाकडे केंद्रित झाले.

दुसऱ्या महायुध्दानंतर लोकसंख्या भूगोलाचा खऱ्या अर्थाने विकास झाला असला तरी फार पूर्वी पासून लोकसंख्येचा अभ्यास केला जात होता. ख्रिस्तपूर्व ३२१ ते २६९ दरम्यान कौटिल्य अर्थशास्त्र या ग्रंथात लोकसंख्येची आर्थिक व शेती संबंधी गणती कशी करावी याचे विवेचन दिले आहे. असे असले तरी १७ व्या शतकापासून लोकसंख्येच्या शास्त्रशुध्द अभ्यासास सुरुवात झाली. १७ व्या शतकात एका जर्मन अभ्यासकाने एक प्रचंड ग्रंथ लिहून मृत्यूची सारणी तयार केली. १७६६ ते १८३४ या दरम्यान थॉमस माल्थस याने लोकसंख्या वाढ आणि अन्नधान्याचे उत्पादन यातील सहसंबंध स्पष्ट करुन लोकसंख्या अभ्यासाकडे जगाचे लक्ष केंद्रीत केले. तेथून पुढेच लोकसंख्या संख्येच्या अभ्यासास खऱ्या अर्थाने सुरुवात झाली म्हणून माल्थसला लोकसंख्या भूगोलाचा जनक मानला जातो.

१९ व्या शतकामध्ये अनेक देशात जनगणना घेण्यास सुरुवात झाली. बऱ्याच प्रदेशात शास्त्रशुध्द माहिती उपलब्ध होवू लागली. वैद्यकिय शास्त्राव्दारे अनेक रोगांवर प्रतिबंधक उपाय योजले गेले. या सर्वांचा परिणाम म्हणून मृत्यूदर झपाट्याने खाली आला. परंतु जन्मदर खाली आला नाही. म्हणून लोकसंख्या भयानक वाढली. आपोआपच जन्म या घटकाच्या अभ्यासास सुरुवातझाली. तेथून पुढे लोकसंख्येच्या अभ्यासास चालना मिळत गेली.

१९५० नंतर जगातील सर्व देशामध्ये लोकसंख्येच्या अभ्यासाकडे लोकांचे लक्ष केंद्रीत झाले. अनेक देशांनी लोकसंख्येचे धोरण आखले. स्थलांतर वर बंदी घालण्यात आली. तेथून पुढे लोकसंख्या भूगोल ही भूगोल शास्त्राची स्वतंत्र शाखा अस्तित्वात आली. या नव्या शाखेचा जन्म झाला. आज प्रत्येक देशात स्थानिक पातळीवर राष्ट्रीय पातळीवर, आंतरराष्ट्रीय पातळीवर लोकांचे अभ्यासाकडे लक्ष केंद्रीत झाले. अनेक विद्यापीठातून पदवी परीक्षेसाठी या विषयाचा अंतर्भाव करण्यात आला. याचाच अर्थ असा की, लोकसंख्येचा अभ्यास फार पूर्वीपासून केला जात असला तरी लोकसंख्येच्या भूगोलाच्या विकासास १९८५० नंतर चालना मिळाली.

तुमची प्रगती तपासा :

१) लोकसंख्या भूगोलाच्या विकासाचा ऐतिहासिक आढावा घ्या.

_____

_____

_____

_____

_____

❖❖❖❖

२

लोकसंख्येची वाढ व वितरण

घटक संरचना :

२.० उद्दिष्टे
२.१ प्रस्तावना
२.२ लोकसंख्या वाढीस जबाबदार घटक
२.३ लोकसंख्या वाढीचे परिणाम
२.४ लोकसंख्या वाढ नियंत्रणाचे उपाय
२.४ लोकसंख्या वितरण - परिणाम करणारे घटक
२.६ लोकसंख्येची घनता
२.७ जागतिक लोकसंख्येचे भौगोलिक वितरण
२.८ भारत - लोकसंख्येची घनता

२.० उद्दिष्टे

- लोकसंख्या वाढीवर परिणाम करणाऱ्या विविध घटकांचा अभ्यास करणे.
- लोकसंख्या वाढीचे परिणाम व त्यावरील उपाय योजना लक्षात घेणे.
- लोकसंख्या वितरणावर परिणाम करणारे घटक अभ्यासणे.
- लोकसंख्येचे जागतिक व भारतातील वितरण लक्षात घेणे.

२.१ प्रस्तावना

जगातील विविध प्रदेशात आज अनेक प्रकारच्या समस्या निर्माण झालेल्या आढळतात. त्यातील प्रमुख समस्या लोकसंख्येत सतत होणारी वाढ होय. ही एक गंभीर समस्या आहे. अनेक देशात लोकसंख्येचा स्फोट झाल्याने त्यातून विविध प्रकारचे प्रश्न निर्माण झालेले आहेत. अशा लोकसंख्येच्या प्रश्नांचा सखोल अभ्यास करण्यासाठी शिलाँगमध्ये लोकसंख्या वाढीचा अभ्यास केला जातो.

लोकसंख्या वाढ -

कोणत्याही प्रदेशात होणाऱ्या लोकसंख्येतील बदलास लोकसंख्या वाढ असे म्हणतात.

बदल हा धन किंवा ऋण असतो. हा बदल धन असल्यास लोकसंख्येत वाढ होते. हा बदल ऋण असेल तर घट होते. याचाच अर्थ असा की, विशिष्ट प्रदेशामध्ये लोकसंख्येत होणाऱ्या बदलास लोकसंख्येची वाढ असे म्हणतात. लोकसंख्येत हा गतिमान घटक आहे. म्हणून लोकसंख्येत सतत बदल होत असतो. हा बदल बहुतेक धन असतो.

तुमची प्रगती तपासा :

१) 'लोकसंख्या वाढ' ही संकल्पना स्पष्ट करा.

२.२ लोकसंख्या वाढीस जबाबदार घटक

लोकसंख्या वाढ म्हणजे लोकसंख्येत झालेला बदल होय. हा बदल प्रामुख्याने दोन घटकांवर अवलंबून असतो. ते घटक म्हणजे जन्म व मृत्यू होत. कोणत्याही प्रदेशातील लोकसंख्या जन्मद्वारे वाढते व मृत्यूद्वारे कमी होते. जन्म-मृत्यू पेक्षा जास्त असेल तर त्या प्रदेशातील लोकसंख्येत वाढ होते व जन्मदर कमी आणि मृत्यूदर जास्त असेल तर घट होते. जन्म आणि मृत्यू या दोन घटकांद्वारे लोकसंख्येत जो बदल घडून येतो त्याला **लोकसंख्येची नैसर्गिक वाढ** असे म्हणतात. जागतिक लोकसंख्येचा अभ्यास करताना या दोन घटकाचाच विचार केला जातो.

या दोन घटकांशिवाय जागतिक लोकसंख्येमध्ये बदल घडवून आणणारा तिसरा घटक म्हणजे **स्थलांतर** हा होय. या घटकाचा विचार एखाद्या प्रदेशानुसार किंवा देशापुरता केला जातो. एवूण जागतिक लोकसंख्येत केला जात नाही. ज्या प्रदेशातून लोक दुसरीकडे स्थलांतरीत होतात त्या प्रदेशातील लोकसंख्येत घट होते. व ज्या प्रदेशात लोक जातात तेथे लोकसंख्येत वाढ होते.

१) **जन्मदर -** एका विशिष्ट प्रदेशात एका वर्षात दर हजार लोकसंख्येमागे जन्मलेली जिवंत अर्भके म्हणजे जन्मदर होय. जन्मदर वाढला का लोकसंख्येत वाढ होते. अविकसीत व विकसनशील प्रदेशात आजही

जन्मदर जास्त असलेला आढळतो. खारण अज्ञान, अंधश्रध्दा, सामाजिक रुढी परंपरा यामुळे जन्माला घातल्या जाणाऱ्या मुलांची संख्या जास्त असते. समाजात मुलींच्या जन्मापेक्षा मुलांच्या जन्माला महत्व दिले जाते. त्यामुळेही मुलगा होईपर्यंत मुलींना जन्मादिला जातो. वैद्यकीय सुविधांच्या अभावी अर्भक मृत्यूचे प्रमाण जास्त असल्यामुळे जन्माला आलेल्या मुलाची जगण्याची शाश्वती नसते. त्यामुळे अधिकधिक मुलांना जन्म दिला जातो. प्राथमिक व्यवसायाचे प्राबल्य असल्याने काम करण्यासाठी अधिक हात मिळावेत म्हणूनही अधिकाधिक मुलांना जन्म दिला जातो. कुटुंबनियोजनाच्या साधनांचा अपुरा प्रसार याचाही परिणाम जन्मदर जास्त राहण्यावर होतो.

२) **मृत्यूदर** - एका विशिष्ट प्रदेशात दर हजारी लोकसंख्येमागे मृत्यू पावलेल्या लोकांची संख्या म्हणजे मृत्यूदर होय. अविकसिक देशात जन्मदर जसा जास्त आहे तसाच वैद्यकीय सुविधांच्या अभावी मृत्यूदरही जास्त आहे. त्यामुळे येथे लोकसंख्या वाढत नाही. मात्र विकसनशील देशात लोकसंख्या वाढण्याचे प्रमुख कारण म्हणजे येथे मृत्यूदर कमी आहे. या प्रदेशात अंधश्रध्दांचे प्राबल्य असले तरीही वैद्यकीय क्षेत्रात खूप मोठी प्रगती झालेली आहे. त्यामुळे साथीच्या रोगांवर नियंत्रण आले, अनेक असाध्य रोगांवर इलाज निर्माण झाले, औषधोपचारामुळे माणसाचे आर्युमान वाढत आहे. वृषीक्रांती झाल्यामुळे पुरेसे अन्नधान्य उपलब्ध होवू लागल्याने भूकबळींची संख्या कमी झाली. या सर्व कारणांमुळे मृत्यूदर झपाट्याने कमी झाला, मात्र जन्मदर वाढतच राहिला. परिणामतः लोकसंख्येची वाढ झाली. काही विकसनशील देशात तर लोकसंख्येच्या विस्फोटाची स्थिती निर्माण झाली.

३) **स्थलांतर** - एखाद्या प्रदेशात नव्याने येणारे लोक किंवा तो प्रदेश सोडून दुसऱ्या प्रदेशात जाणारे लोक या प्रक्रियेला स्थलांतर असे म्हणतात. ज्या प्रदेशातून स्थलांतर होते तेथील लोकसंख्या कमी होते व ज्या प्रदेशात स्थलांतर होते तेथील लोकसंख्या वाढते.

तुमची प्रगती तपासा :

१) लोकसंख्या वाढीचे घटक स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

_____

२.३ लोकसंख्या वाढीचे परिणाम

ज्या प्रदेशात लोकसंख्या वाढ निर्माण होते, अशा प्रदेशात लोकसंख्या वाढीचे परिणाम दिसून येतात. वाढत्या लोकसंख्येद्वारे विविध प्रकारच्या समस्या निर्माण होतात. त्या समस्या खालीलप्रमाणे -

१) दरडोई उत्पादनात घट -

ज्या प्रदेशामध्ये लोकसंख्या जास्त आढळते. अशा लोकांच्या दरडोई उत्पन्नात घट होत असते. देशामधील साधन संपत्ती / राष्ट्रीय उत्पन्न जास्त लोकांमध्ये वाटले गेल्याने आपोआप दरडोई उत्पन्न कमी होते. राहणीमानाचा दर्जा निकृष्ट बनतो.



२) शेतीचे तुकडीकरण -

जास्त लोकसंख्येचा हा एक परिणाम आहे. सतत लोकसंख्या वाढल्याने शेतीचे विभाजन होत असते. आपोआपच शेतीचे लहान लहान तुकड्यांत रुपांतर होते. उदा. भारतामध्ये लोकसंख्या वाढीचा वेग जास्त असल्याने दरवर्षी शेतीचे तुकडीकरण होत आहे.



३) ग्रामीण - नागरी स्थलांतर –

ग्रामीण प्रदेशात व्यवसायाच्या कमी संधी असतात म्हणून ग्रामीण प्रदेशातून लोकांचे शहरी प्रदेशाकडे स्थलांतर होत असते. त्यातून अनेक

नागरी समस्या निर्माण होतात उदा. शहराची विवृत वाढ, झोपडपट्यांची निर्मिती, खून, मारामाऱ्या, गुन्हेगारी, पोलसि यंत्रणेवर ताण, हवा, पाणी, ध्वनी प्रदूषण, वाहतुकीची कोंडी, राहत्या घराची टंचाई, जीवनावश्यक वस्तूंची टंचाई इ.



४) साधन संपत्तीवर ताण -

लोकसंख्या वाढलेल्या प्रदेशातील नैसर्गिक साधन संपत्ती वर ताण पडतो. जास्त लोकसंख्येव्दारे नैसर्गिक साधन संपत्तीचा अतिरिक्त वापर केला जातो. कित्येकदा निष्काळजीपणाने साधन संपत्ती वापरल्यास ती संपुष्टात येण्याची शक्याता असते.

५) बेकारीचा प्रश्न -

लोकसंख्या वाढल्यामुळे नोकऱ्यांची मागणी जास्त व पुरवठा कमी त्यामुळे वाढत्या लोकांना नोकऱ्या उपलब्ध होऊ शकत नाहीत. म्हणून बेकार लोकांमध्ये दरवर्षी भर पडते.

उदा. भारतामध्ये दरवर्षी बेकारांच्या संख्येत वाढ झालेली आहे. म्हणूनच दारिद्र्याचे दुष्टचक्र भारतात निर्माण झालेले आढळते.

६) जीवनावश्यक सेवांची कमतरता -

जास्त लोकसंख्या असलेल्या प्रदेशात नियोजनाव्दारे कितीही जीवनावश्यक सेवा उपलब्ध केल्या तरी त्या वाढत्या लोकसंख्येला कमी पडतात. आरोग्य, पिण्याचे पाणी, शिक्षण, बँका, वाहतूक, दळणवळण यासारख्या गोष्टींची कमतरता भासते.

७) कुपोषण -

जास्त लोकसंख्येमुळे कुटुंबात मुलांची संख्या जास्त असल्याने लहानपणीच आरोग्याकडे दुर्लक्ष / कुपोषण यासारख्या समस्या निर्माण होतात. जीवनसत्व युक्त आहार मुलांना उपलब्ध होत नाही. म्हणून त्यांचे आरोग्य चांगले राहत नाही. साथीच्या रोगाव्दारे / इतर रोगांना असे अशक्त श्रमिक ताबडतोब आहारी जातात त्यांची कार्यक्षमता कमी असते.

८) बुध्दिवंतांचे स्थलांतर -

जास्त लोकसंख्या असेल अशा देशामध्ये गरीबी / दारिद्रय मोठ्या प्रमाणात असते उच्च सुशिक्षित लोक अशा दारुण परिस्थितीला कंटाळून इतर देशांकडे स्थलांतरीत होतात. कारण दुसऱ्या देशात त्यांना आर्थिक फायदा जास्त होतो. सामाजिक प्रतिष्ठा मिळते. म्हणूनच अशा प्रदेशात बुध्दीवंतांच्या समस्या निर्माण होते.



९) पर्यावरणीय समस्या -

जास्त लोकसंख्येमुळे पर्यावरणावर परिणाम होतो. नैसर्गिक साधन संपत्तीवर ताण पडतो. जंगलतोड वाढते. जमिनीची धूप मोठ्या प्रमाणावर होते. प्रदूषणात वाढ होते. खनिजे संपुष्टात येतात. पर्यावरणाचा अतिरिक्त वापर केल्याने पर्यावरणातील संतुलन नाहीसे होऊन विविध प्रकारच्या समस्या निर्माण होतात.



तुमची प्रगती तपासा :

१) लोकसंख्या वाढीचे परिणाम सांगा.

_____

_____

_____

_____

_____

२.४ लोकसंख्या वाढ नियंत्रणाचे उपाय

१) शिक्षणाचा प्रसार - लोकसंख्या वाढ रोखण्यासाठी सर्वात महत्वाचा उपाय म्हणजे शिक्षणाचा प्रसार होय. शिक्षणामुळे अंधश्रध्दांचे निर्मूलन होते. नवीन विचार व बदल स्विकारण्याकडे कल राहतो. रुढी, परंपरांचा पगडा कमी होतो. राहणीमान उंचावते.

२) कुटुंब नियोजनाचा प्रसार - समाजात शिक्षणाचा प्रसार झाला की आपोआपच कुटुंब नियोजनाचे महत्त्व लोकांना पटवून देण्यास सुलभ जाते. छोटे कुटुंब हेच सुखी कुटुंब याचे महत्त्व समाजाच्या ताळागाळापर्यंत पोचवणे गरजेचे आहे. त्याचबरोबर कुटुंब नियोजनाची साधने देखील या लोकांपर्यंत कमीत कमी पैशात पोचली पाहिजेत.



३) विविध सवलती - लोकसंख्या वाढ रोखण्यासाठी सरकार मोफत जे विविध उपाय योजले जातात, त्यांची अंमलबजावणी योग्य तऱ्हेने झाली पाहिजे. लहान कुटुंबासाठी काही सवलती जाहीर केल्या पाहिजेत. एकच अपत्य मग ते मुलगा किंवा मुलगी असेल तर अशा अपत्यांसाठी, त्यांच्या पालकांसाठी विशेष सवलती दिल्या गेल्या पाहिजेत. उदा. करामध्ये सवलती, शिक्षणात सवलती इ. त्याचा निश्चितच परिणाम लोकसंख्या नियंत्रणासाठी होईल.

तुमची प्रगती तपासा :

१) लोकसंख्या वाढ कशी नियंत्रणात आणता येईल ?

_____

_____

_____

_____

_____

२.५ लोकसंख्या वितरण

प्रस्तावना -

लोकसंख्या भूगोलाच्या अभ्यासामध्ये लोकसंख्येची रचना आणि वितरण या दोन घटकाला अतिशय महत्व आहे. जगातील कोणत्याही देशात लोकसंख्येचे वितरण सर्वत्र सारखे नाही. मानवी व्यवस्थेसाठी जेथे अनुकुल परिस्थिती आहे. तेथे जास्त लोक राहतात. जेथे मानवी व्यवसायास प्रतिकूल परिस्थिती असते तेथे लोक कमी असतात.

जागतिक लोकसंख्या वितरणावर परिणाम करणारे घटक / जागतिक लोकसंख्या केंद्रीकरणावर परिणाम करणारे घटक -

आज जगामध्ये लोकसंख्येचे वितरण विषम स्वरुपाचे झालेले आहे. काही प्रदेशात दाट लोकवस्ती तर काही प्रदेशात विरळ लोकवस्ती आढळते. एवढेच नव्हे तर एकाच देशाच्या विविध प्रदेशात लोकसंख्येच्या वितरणात सारखेपणा आढळत नाही. लोकसंख्या वितरणावर खालील घटकांचा प्रभाव पडतो.

अ) भौगोलिक घटक -

भौगोलिक परिस्थितीचा प्रभाव लोकसंख्येच्या वितरणावर होत असतो. प्रदेशानुसार भौतिक परिस्थितीत भिन्नता आढळते व त्याचा परिणाम लोकसंख्येच्या वितरणावर होतो. भौतिक घटकात खालील घटकांचा समावेश होतो.

१) भूपृष्ठरचना
२) हवामान
३) प्रदेशाचे स्थान
४) मृदा
५) पाणीपुरवठा
६) खनिजे
७) नैसर्गिक वनस्पती

१) भूपृष्ठरचना -

लोकसंख्या वितरणावर प्रभाव टाकणारा हा एक महत्वाचा भौतिक घटक आहे. प्रदेशानुसार भूपृष्ठरचनेमध्ये भिन्नता आढळते. भूपृष्ठ रचनेमध्ये खालील घटकांचा समावेश होतो.

१) पर्वत
२) पठारे

३) मैदाने
४) सागर किनारे



१) पर्वत - सभोवतालच्या प्रदेशापेक्षा अती उंच भागाला प्रवतीय प्रदेश असे म्हणतात. पर्वतीय प्रदेशात लोकवस्ती अतिशय कमी असते कारण

१) पर्वतीय प्रदेशाला शीघ्र उतार असतो.
२) जमिनीची धूप मोठ्या प्रमाणात होते.
३) शेतीयोग्य जमिनीचे प्रमाण कमी असते.
४) पर्वताची शिखरे बर्फाच्छादीत असतात.
५) वाहतूक, दळणवळणाचा विकास फारसा होत नाही.
६) मानवी व्यवसायाच्या विकासाला प्रतिवूल भौतिक परिस्थिती आढळते.
७) पर्वतीय प्रदेशात घनदाट जंगले असतात.

वरील सर्व कारणाव्दारे हिमालय रॉकी, अँडीज, सह्याद्री पर्वतीय प्रदेशात लोकवस्ती अतिशय कमी आहे. काही पर्वतीय प्रदेशात खनिजे सापडत असल्याने प्रतिवूल भौतिक परिस्थिती असूनही लोकसंख्या जास्त आढळते. उदा. ॲपलोझीयन पर्वतीय प्रदेशात आल्हाददायक व थंड हवामानामुळे पर्वतीय वेंद्रे निर्माण होऊन तेथे लोकवस्ती वाढलेली आहे. उदा. माथेरान, माहाबळेश्वर, आंबोली इ.

२) पठारे -

सपाट उंच प्रदेशाला पठार असे म्हणतात. पर्वतीय प्रदेशापेक्षा जास्त व मैदानापेक्षा लोकवस्ती कमी आढळते. मध्यम पाऊस, थोड्या प्रमाणात शेती, पशूपालन याव्दारे लोकवस्ती मात्र आढळते. उदा. भारतातील दख्खनच्या पठारवर लाव्हारस तयार झालेली सुपीक जमीन, शेतीचा विकास, कारखानदारी आहे म्हणून लोकवस्ती जास्त आहे. छोटा नागपूर पठारावर खनिजे सापडत असल्याने लोक जास्त राहतात.



३) मैदाने -

सर्वसाधारणपणे मैदानी प्रदेशात लोकवस्ती असते कारण

१) भूपृष्ठाला उतार मंद असतो.
२) नद्यांबरोबर येणाऱ्या गाळाचे संचयन
३) या प्रदेशातील जमीन सुपीक असते.
४) शेतीचा विकास होतो.
५) नद्याच्या पाण्याचा उपयोग जलसिंचनासाठी करुन वर्षभर पिवेक घेता येतात.
६) शेतीवर आधारित कारखानदारीचा विकास
७) प्रदेश सपाट असल्याने वाहतुकीचे मार्ग विकसित होतात. वरील सर्व कारणाव्दारे गंगा-यमुना नद्यांचा प्रदेश, पूर्वकडील भाग, सिंधुनदीचा त्रिभूज प्रदेशात लोकवस्ती दाट आढळते.



४) सागर किनारे -

समुद्र किनाऱ्यावर लोकवस्ती जास्त असते कारण

१) अशा प्रदेशात जलमार्ग व जमिनीवरील मार्ग तयार झालेले असतात.
२) नैसर्गिक बंदराची निर्मिती होते.
३) जहाज बांधणीचा व्यवसाय विकसीत होतो.
४) मासेमारीचा विकास करता येतो.
५) जमिनीवरील सार्वजनिक संपत्ती बरोबर पाण्यातील संपत्तीचा उपभोग घेता योतो.

वरील सर्व कारणाव्दारे किनारी भागात अनेक व्यवसाय उपलब्ध होत असल्यामुळे किनारी भागात दाट लोकवस्ती आढळते. जगातील मोठमोठी शहरे किनारी भागातच आहेत.

२) हवामान -

जागतिक लोकसंख्या वितरणावर प्रभाव टाकणारा हा एक भौतिक घटक आहे. प्रदेशानुसार हवामानामध्ये परिवर्तन होत असल्याने लोकसंख्या वितरणामध्ये सुध्दा कमी अधिकपणा आढळतो. अतीथंड, अतिउष्ण, अतिकोरड्या हवामानामध्ये लोकवस्ती अतिशय कमी असते.

अंटार्क्टिका, ग्रीनलँड, उत्तर सैबेरिया, अलास्का / ध्रुवीय प्रदेशात तापमान वर्षातील ९ महिने ०°C पेक्षा कमी असल्याने सतत बर्फमय प्रदेश असतो. तेथे लोकवस्ती कमी असते. उष्ण वाळवंटी प्रदेशात तापमान जास्त, पावसाचे प्रमाण कमी, पाण्याची टंचाई, वालुकामय जमीन यासाख्ख्या घटकामुळे लोकसंख्या कमी असते. सहारा, कलहारी, थर, अटाकामा या वाळवंटी प्रदेशात लोकवस्ती अतिशय कमी आहे. विषुववृत्तीय प्रदेशात वर्षभर तापमान जास्त व पावसाचे प्रमाणही जास्त असते. म्हणून तेथे, उष्ण, दमट, रोगट हवामान आढळते. सतत दलदल, घनदाट जंगले, हिंस्त्र पशू, विषारी माशा व प्रतिकूल परिस्थिती असल्याने कांगो, ॲमेझॉन नदीचा प्रदेश, न्युगिनी येथे लोकवस्ती कमी आढळते.

सर्वसाधारणपणे समशीतोष्ण व मोसमी हवमानाच्या प्रदेशात हवामान, शेती, कारखानदारी व मानवास योग्य परिस्थिती असल्याने लोकसंख्या जास्त असते.



३) प्रदेशाचे स्थान -

प्रदेशाचे स्थान यावर लोकसंख्याचे वितरण अवलंबून असते. ज्या देशाला सागरात स्थान लाभलेले असेल अशा देशाला जमिनीवरील संपत्तीबरोबर सागरीय संपत्तीचा उपभोग घेता येतो व तेथे लोकवस्ती निर्माण होते. उदा. जपान, इंग्लंड इ. ज्या देशाला खंडातर्गत स्थान लाभलेल असेल तेथे मानवी व्यवसाय कमी विकसीत होतात. उदा. नेपाळ, भूतान, अफगाणिस्तान येथे लोकवस्ती कमी आहे. कारण स्थानावरच माणसाचा आर्थिक व सांस्कृतिक विकास अवलंबून असतो. म्हणून प्रदेशानुसार लोकसंख्येच्या वितरणात फरक आढळतो.

४) मृदा -

लोकसंख्येच्या वितरणावर परिणाम करणारा हा एक नैसर्गिक घटक आहे. कारण मानवाची अन्न ही गरज मृदेवरच / शेतीवरच अवलंबून असते.

ज्या प्रदेशात सुपीक, गाळाची, काळी कसदार जमीन असेल तेथे शेतीचा विकास जास्त होतो. तेथे लोकसंख्या जास्त आढळते.

उदा. गंगा नदीचा त्रिभूज प्रदेश

भारतातील दख्खनचे पठार, इंडोनेशियातील जावा बेट येथे लाव्हारसापासून रेगूर नावाची काळी कसदार जमीन तयार झाली असल्याने लोकवस्ती जास्त आढळते. जमिनीची सुपिकता, जमिनीचा कस, जमिनीचा कस, जमिनीचा धूप, प्रदेशानुसार बदलते. ण्हणून लोकसंख्येचे वितरण सारखे आढळत नाही.

उदा. द कोकणात जांभा जमीन असून जमिनीची धूप जास्त झाली आहे. योथे शेती विकासावर मर्यादा पडतात. म्हणून लोकवस्ती कमी आहे.

५) पाणीपुरवठा / जलप्रणाली -

मानवी जीवनात पाण्याला अतिशय महत्व आहे. तेथे पाणी सहज उपलब्ध होईल तेथे मानव राहणे अधिक पसंत करतो. तलाव, धरणे, नद्या, सरोवरे अशा प्रदेशात पाणी सहज उपलब्ध होते. पिण्यासाठी, घरगुती वापरासाठी, उद्योगधंदे, शेती, वाहतूक, पशुपालन, मासेमारी यासाठी पाणी आवश्यक असल्याने मानव नदीच्याच काठी वेंद्रीत होतो. म्हणूनच विविध सांस्वृतीचा उगम आणि विकास हा देखील नद्यांच्याच काठी झाला. गंगा, यमुना, गोदावरी, कावेरी यासारख्या नद्याच्या खोऱ्यात लोकवस्ती दाट असते. वाळवंटी प्रदेशात पिण्याच्या पाण्याची दुर्मिळता असल्याने लोकसंख्या कमी असते.

६) खनिजे -

पृथ्वीच्या पृष्ठभागात रासायनिक प्रक्रियेव्दारे विविध खनिजांची निर्मिती होते. जेथे खनिजे सापडतात. तेथे खाणकाम विकसीत होतो. उद्योगधंद्यांचा विकास घडून येतो व लोकवस्ती आढळते. भारतातील छोटा नागपूर, पठार, रशियातील उराल, अमेरिवेतील ॲपलेझियन येथे खनिजे सापडत असल्याने लोकसंख्या दाट आहे. सौदी अरेबिया, वुवेत, इराक, इराण येथे उष्ण वाळवंटी हवामान व पाण्याची दुर्मिळता असूनही तेथे सुवर्णरेखा (खनिजतेल) सापडत असल्याने लोकवस्ती वाढलेली आहे.

७) नैसर्गिक वनस्पती -

आर्थिकदृष्टया अरण्ये माहत्वाची असतील तर तेथे मध, मेण, डींक, हिरडा, कात यासारखी दुय्यम उत्पन्ने घेतात. लावूडतोड व्यवसाय चालतो. अशा प्रदेशात लोकवस्ती निर्माण होते. सावंतवाडी तालुक्यात देवसू, दाणोली याठिकाणी याच दृष्टीकोनातून वस्ती झालेली आहे.

थोडक्यात औद्योगिक घटकांचा प्रभाव लोकसंख्येच्या वितरणावर होतो. परंतु अलिकडे या घटकाचे महत्व कमी झाले आहे. कारण आधुनिक

तंत्रज्ञानाव्दारे प्रतिवूल भौतिक परिस्थितीवर मात करुन लोकांनी वस्त्या तयार केल्या आहेत.

तुमची प्रगती तपासा :

१) लोकसंख्येच्या वितरणावर परिणाम करणारे विविध भौतिक घटक स्पष्ट करा.

ब) आर्थिक व सामाजिक घटक -

भौगोलिक घटकापेक्षा आर्थिक व सामाजिक घटकाला अतिशय महत्व प्राप्त झालेले आहे. जगातील बहुतेक प्रदेशात लोकसंख्येचे वितरण आर्थिक घटकाला अनुसरुन होत आहे. आर्थिक घटकामध्ये खालील घटकांचा समावेश होतो.

१) उद्योगधंदे
२) वाहतूक व्यवसाय
३) शहरीकरण
४) सामाजिक सुरक्षितता
५) सामाजिक एकजिनसिपणा

१) उद्योगधंदे -

लोकसंख्या वितरणावर परिणाम करणारा हा एक प्रमुख घटक आहे. ज्या प्रदेशात कारखानदारीचा विकास होतो. अशा प्रदेशात लोकांना कामाची संधी उपलब्ध होते. इतर व्यवसाय उपलब्ध होतात. आपोआपच अशा प्रदेशाकडे लोक आकर्षिले जाऊन त्या प्रदेशाची लोकसंख्या वाढते. मुंबई, पुणे, अहमदाबाद, बडोदा, सामाजिक औद्योगिक प्रदेशात लोकसंख्येचे केंद्रीकरण झालेले आहे. सिंधुदुर्ग प्रदेशातील रेडी प्रदेशात उषा इस्पात ही औद्योगिक वसाहत निर्माण झाल्याने तेथील लोकसंख्या वाढली. महाराष्ट्रात साखर कारखान्याभोवती लोकवस्ती वाढली आहे.

२) वाहतूक दळणवळण -

जेथे वाहतूकीचा विकास होतो तेथे लोकवस्ती वाढते. शेती, व्यापार, उद्योगधंदे यांचा विकास वाहतूकीवर अवलंबून असतो. लोकांच्या गरजा भागविण्यासाठी, वस्तूंची देवाणघेवाण करण्यासाठी मागणीप्रमाणे पुरवठा करण्यासाठी वाहतूकीची आवश्यकता असते. म्हणूनच वाहतूक मार्गाच्या शेजारी लोक केंद्रीत होतात. रस्ते, लोहमार्ग, जलवाहतूक यांचा विकास झालेल्या प्रदेशात लोकवस्ती जास्त असते. उदा. मुंबई, गोवा, पनवेल, महाड,

चिपळूण, सावंतवाडी यासारखी शहरे निर्माण झालेली आहेत. तेथे दाट लोकवस्ती आढळते.

३) शहरीकरण -

ज्या प्रदेशात शहरीकरण असेल अशाच प्रदेशात लोकसंख्या मोठ्या प्रमाणात आढळते. शहरीकरणाचा प्रभाव लोकसंख्या वितरणावर पडतो. मोठमोठे उद्योग, व्यापार, वाहतूक, रोजगार उपलब्धता, शिक्षणाच्या सोई, विविध प्रकारच्या सेवा, करमणूक, बँक, पतपेढ्या यासारख्या घटकांचे केंद्रीकरण शहरातच होत असल्याने सर्वात जास्त लोकसंख्येचे केंद्रीकरण शहरातच होत असते. अनेक लोक शहराकडेच आकर्षित होतात. जागतिक लोकसंख्येपैकी ३० टक्के लोकसंख्या शहरात राहते. विकसीत देशात तर ५० टक्के पेक्षा जास्त लोक शहरात राहतात. मुंबई, कोलकत्ता, न्यूयार्क, टोकियो, लंडन यासारख्या मोठ्या शहरात अतिशय दाट लोकवस्ती आहे.

४) सामाजिक सुरक्षितता -

ज्या प्रदेशात मानवी जीवन सुरक्षित असेल अशाच प्रदेशात लोक राहणे पसंत करतात. म्हणून सामाजिक सुरक्षिततेचा परिणाम लोकसंख्या वितरणावर होतो. महाराष्ट्रात सामाजिक सुरक्षितत असल्याने अनेक प्रदेशातील लोक आकर्षिले गेले. त्या उलट काश्मिरी राज्यात अनेक कुटुंबे दुसरीकडे स्थलांतरीत झाली. म्हणून तेथे लोकसंख्या कमी आढळते.

५) सामाजिक एकजिनसिपणा -

सर्वसाधारणपणे एका धर्माचे / जातीचे लोक एकत्र राहणे अधिक पसंत करतात. म्हणून सामाजिक एकजिनसीपणाचा प्रभाव लोकांच्या वितरणावर होतो. सामाजिक भिन्नता असेल तर समाज विविध धर्मात, जातीनुसार विभागला जातो. तेथे तुलनेने कमी लोकवस्ती आढळते.

क)धार्मिक घटक -

काही ठिकाणांना धार्मिक दृष्टीकोनातून महत्व असते. तेथे धार्मिक विधीसाठी लागणाऱ्या वस्तू तयार केल्या जातात. उदा. अगरबत्ती, तेथे व्यापार वाढीस लागतो. लोक अशा ठिकाणाला भेटी देतात. म्हणून लोकशाही वाढते. मक्का, पंढरपूर, नाशिक, पैठण, काशी, हरिविदार या धार्मिक ठिकाणी लोकवस्ती जास्त आहे.

ड) ऐतिहासिक घटक -

काही भूतकाळातील परिस्थिती, वर्तमान आणि भविष्य काळातील लोकसंख्येवर परिणाम करीत असते. आशिया खंडात ऐतिहासिक कालावधीपासून चालत आलेल्या संस्कृतीचा परिणाम सध्याच्या आशियातील लोकसंख्येच्या केंद्रीवरणावर झालेला आहे. कित्येकदा ऐतिहासिक घटकांना महत्व प्राप्त झालेले असते. उदा. पुणे, आग्रा इ. अशा ठिकाणी लोकवस्ती जास्त आढळते.

इ) राजकीय घटक -

देशातील शासन प्रणालीचा परिणाम लोकांच्या केंद्रीकरणावर होतो. देशातील शासन जन्माला प्रोत्साहन देत असेल तर लोकवस्ती वाढते. रशियाच्या शासनाने रशियाच्या पूर्व भागात राहणाऱ्या लोकांना सुविधा उपलब्ध करुन दिल्याने अनेक लोकांनी पूर्वेकडून पश्चिमेकडे स्थलांतर केले. अंदमान, निकोबार बेटावर जे लोक जातील अशा लोकांना भारत शासनाने जमीन आणि अनुदान उपलब्ध करुन दिल्याने अनेक लोक तेथे जाऊन त्या वस्तीमध्ये वाढ झाली. १९४७ भारत-पाक फाळणी, नैसर्गिक आपत्ती / युध्दे अशा कारणांमुळे लोकसंख्या कमी होते.

ई) तांत्रिक ज्ञानाचा प्रसार -

अलिकडे लोकसंख्या वितरणावर प्रभाव टाकणारा हा अतिशय महत्वाचा घटक आहे. तांत्रिक ज्ञानाच्या प्रसाराबरोबर लोकसंख्या वितरणावरील भौगोलिक घटकाचे महत्व कमी झाले आहे. तंत्रज्ञानाच्या विकासाबरोबर पूर्वी ज्या ठिकाणी लोकवस्ती नव्हती अशा ठकाणी लोकवस्ती वाढलेली आहे.

उदा. गेल्या २५ वर्षापूर्वी भारतातील राजस्थानच्या प्रदेशात अतिशय कमी लोक राहत होते. कारण हा ओसाड प्रदेश होता. भारत शासनाने राजस्थानच्या प्रदेशात जलसिंचनाच्या सोई उपलब्ध करुन दिल्या. त्यामुळे तेथे आपोआप लोकवस्तीमध्ये वाढ झाली. इस्त्राईल या ओसाड प्रदेशात अत्याधुनिक तंत्रज्ञानाव्दारे शेती व उद्योगधंदे यांचा विकास ग्रामीण प्रदेशात झाल्यामुळे लोकवस्ती वाढलेली आहे. उत्तर, कॅनडा, अलास्का, सैबेरीया येथे संपूर्ण बर्फाच्छादित प्रदेश आढळतो. परंतु सध्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन वाहतुकीची गतिमानता, नाशवंत माल दूरच्या प्रदेशात सहज पाठवून तेथे लोकवस्ती वाढू लागली आहे. कोकणात विरळ लोकवस्ती आहे. मात्र अलिकडे आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन डोंगराला बोगदे पाडून कोकण रेल्वे अस्तित्वात आलेली आहे. पुढील ४ ते ५वर्षात निश्चितच कोकणच्या लोकसंख्येत भर पडेल.

थोडक्यात जागतिक लोकसंख्या वितरणावर विविध घटकाचा प्रभाव पडत असतो. प्रदेशानुसार हे घटक बदलणारे असल्याने जागतिक लोकसंख्येचे वितरण असमान झाले आहे.

तुमची प्रगती तपासा :

१) लोकसंख्येच्या वितरणावर परिणाम करणारे आर्थिक व सामाजिक घटक स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

_____

२.६ लोकसंख्येची घनता

लोकसंख्येची वितरण स्पष्ट करीत असताना लोकसंक्येची घनता सांगितली जाते.

लोकसंख्येची घनता म्हणजे दर चौ.कि.मी. प्रदेशात राहणारी लोकांची संख्या होय. लोकसंख्येची घनता पुढील सूत्राने काढली जाते.

$$\text{लोकसंख्येची घनता} = \frac{\text{कोणत्याही प्रदेशातील एकूण लोकसंख्या}}{\text{त्या प्रदेशाचे क्षेत्रफळ}}$$

तुमची प्रगती तपासा :

१) टीप द्या. लोकसंख्येची घनता.

२.७ जागतिक लोकसंख्येचे भौगोलिक वितरण

जास्त /दाट लोकसंख्येच्या घनतेचे प्रदेश

ज्या प्रदेशात लोकसंख्येची घनता प्रति चौकिमी ४५१ पेक्षा जास्त असते अशा प्रदेशांचा समावेश दाट लोकसंख्येच्या प्रदेशात होतो.

अ) **वृषी प्रधान व प्राचीन संस्वृतीचे प्रदेश -** यामध्ये प्रामुख्याने पूर्व व दक्षिण आशिया मधील चीन, भारत, पाकिस्तान, बांग्लादेश यांचा समावेश होतो. येथील मोसमी हवामान, वृषी समृध्दता, गंगा-सिंधु नद्यांची विसृत व संपन्न खोरी, तेथील प्राचीन संस्वृती यामुळे येथे लोकसंख्येची घनता दाट आहे. तसेच नाईल नदीच्या खोऱ्यातील इजिप्तच्या प्रदेशातही लोकसंख्येची घनता दाट आढळते.

ब) **औद्योगिकदृष्टया विकसित प्रदेश -** यामध्ये प्रामुख्याने पश्चिम युरोपमधील जर्मनी, फ्रान्स, ग्रेट ब्रिटन, इटली, स्वित्झर्लँड तसेच उत्तर अमेरीकेतील संयुक्त संस्थाने, कॅनडा इ. देशांचा समावेश होतो. येथील समशीतोष्ण हवामान, खनिज व उर्जा साधनांची मुबलकता, अधिक साक्षरता, उच्च तंत्रज्ञानाचा प्रसार, व्यापारातील वृध्दी, उच्च राहणीमान इ, कारणांमुळे या प्रदेशात लोकसंख्येची घनता दाट आहे. आशियातील

जपान देश उच्च तंत्रज्ञान व इलेक्ट्रॉनिक्स वस्तू, स्वयंचलित वाहनाच्या निर्यातीत अग्रेसर आहे, येथेही लोकसंख्येची घनता दाट आहे.

क) **इतर प्रदेश -** वरील दोन्ही घटकांव्यतिरिक्त अलिकडे जगातील काही देशांमध्ये लोकसंख्येची घनता दाट होत चाललेली आढळते. उदा. सिंगापूर, मध्य आशियातील आखाती देश, ब्राझील इ.

२) मध्यम लोकसंख्येची घनता असलेले प्रदेश -

ज्या प्रदेशात लोकसंख्येची घनता प्रति चौ. किमी १५१-४५० एवढी आढळते अशा प्रदेशांचा समावेश मध्यम लोकसंख्येच्या घनतेच्या प्रदेशात होतो.

अ) **उष्ण व समशितोष्ण गवताळ प्रदेश -** यामध्ये जगातील विस्तीर्ण अशा गवताळ प्रदेशांचा समावेश होतो. अलिकडे येथे यांत्रिक पध्दतीने अन्नधान्याची शेती विकसीत होत आहे. तसेच पशुपालनाचा व्यवसायही मोठया प्रमाणात वाढत आहे. उदा. प्रेअरी, पंपाज, स्टेप्स, व्हेल्ड, डाउन्स इ.

ब) **सूचीपर्णी जंगलांचा प्रदेश -** यामध्ये उत्तर अमेरिका व युरेशिया येथील सूचिपर्णी जंगलाच्या प्रदेशाचा समावेश होतो. अलिकडे येथे अरण्यांची तोड करून शेती करण्याचे प्रमाण वाढत आहे. तसेच येथे प्राण्यांपासून केसाळ कातडी कमविण्याचे उद्योगही वाढत आहेत.

क) **खनिज संपत्तीचे प्रदेश -** खनिजसंपत्तीच्या पठारी प्रदेशात अवजड उद्योधंद्यांच्या विकासामुळे लोकसंख्योची घनता वाढत असलेली आढळते. उदा. संयुक्त संस्थानचा मध्य भाग व रशियाचा पश्चिम भाग.

३) कमी/विरळ लोकसंख्येची घनता असलेले प्रदेश -

ज्या प्रदेशात लोकसंख्येची घनता प्रति चौकिमी १५० पेक्षा कमी असते अशा प्रदेशांचा समावेश विरळ घनतेच्या प्रदेशात होतो.

अ) **उंच पर्वतीय प्रदेश -** येथे असणारे दुर्गम पर्वतीय भाग, थंड हवामान, बर्फाच्छादीत प्रदेश, तीव्र उतार, वृक्षीयोग्य जमिनीचा अभाव, वाहतूक सुविधांचा अभाव यामुळे येथे लोकसंख्येची घनता अतिशय विरळ आढळते. उदा. हिमालय, रॉकी, अडीज इ.

ब) **उष्ण वाळवंटी प्रदेश -** येथे असणारे उष्ण हवामान, पाण्याचे दुर्भिक्ष, वृक्षीयोग्य जमिनीचा अभाव इ. कारणांमुळे या प्रदेशात लोकसंख्येची विरळ घनता आढळते.उदा. सहारा, कलहारी, थरचे व अरेबियाचे वाळवंट इ.

क) **विषुववृत्तीय प्रदेश -** येथे असणारी घनदाट गंगले, रोगट हवामान, विषारी किटक, विषारी माशा, हिंस्त्र पशु, दलदल, वाहतूक सुवुधांचा

अभाव इ. कारणांमुळे लोकसंख्येची घनता विरळ आढळते. उदा. दक्षिण अमेरिकेतील ॲमेझॉन नदीचे खोरे व आफ्रिकेतील कांगो नदीचे खोरे.

ड) **ध्रुवीय प्रदेश -** अतिशय प्रतिकुल हवामान, बर्फाळ जमीन, गोठलेले समुद्र यामुळे या प्रदेशात लोकसंख्येची घनता विरळ आढळते. उदा. उत्तर अमेरिकेतील अलास्का, ग्रीनलँड, उत्तर युरेशिया, दक्षिण ध्रुवाकडील अंटाट्रिका मध्ये तर लोकसंख्याच नाही. संपूर्ण खंड निर्जन आहे.

तुमची प्रगती तपासा :

१) लोकसंख्येचे जागतिक वितरण स्पष्ट करा.

२.८ भारत लोकसंख्येची घनता

वर्ष	शहरीकरणाचे प्रमाण (%)	घनता (चौकिमी)
१९५१	१७.३	११७
१९६१	१८.०	१४२
१९७१	१९.९	१७७
१९८१	२३.३	२१६
१९९१	२६.७	२७४
२००१	२७.८	३२५
२०११	३१.०	३८२

भारतात लोकसंख्या वाढीबरोबरच लोकसंख्येची घनताही वाढत आहे. स्वातंत्र्यानंतर लोकसंख्येची घनता ११७ वरुन ३८२ पर्यंत वाढली. परंतु ती देशात सर्वत्र सारखी नाही. काही ठिकाणी विरळ तर काही ठिकाणी दाट वस्ती आढळते. मुंबईसारख्या दाट लोकवस्तीच्या भागात घनता जास्त आहे. राज्यानुसार विचार करता बिहार मध्ये लोकसंख्येची घनता सर्वात जास्त (१०३०) एवढी आहे. त्या खालोखाल पश्चिम बंगाल राज्याची लोकसंख्येची घनता (११०२) एवढी आहे. केरळ राज्याची लोकसंख्येची घनता (८५९) एवढी आहे. सर्वात कमी लोकसंख्येची घनता अरुणाचल प्रदेशची (१७) एवढी आहे. भारतात शहरीकरणाचा वेग सुध्दा सतत वाढत आहे. १९५१ साली

भारतात शहरीकरणाचा वेग १७.३ टक्के होता तो २०११ साली ३१.० टक्के वर पोचला.

तुमची प्रगती तपासा :

१) टीप द्या. भारतातील लोकसंख्येची घनता

❖❖❖❖

३

लोकसंख्या सिद्धांत

घटक संरचना :

३.० उद्दिष्टे
३.१ प्रस्तावना
३.२ लोकसंख्या संक्रमण सिद्धांत
३.३ माल्थसचा लोकसंख्या सिद्धांत
३.४ मार्क्सचा सिद्धांत

३.० उद्दिष्टे

- लोकसंख्या वाढीबद्दलच्या संक्रमण सिद्धांताचा अभ्यास करणे.
- लोकसंख्येचे विविध सिद्धांत समजून घेणे.

३.१ लोकसंख्या सिध्दांत - प्रस्तावना

जागतिक लोकसंख्येचा अभ्यास प्ल्युटो पासून बऱ्याच तत्वज्ञानी वैज्ञानिकांनी केलेला आहे. हर्बट स्पेन्सर, गिनी या सारख्यांनी लोकसंख्या वाढ ही काही नैसर्गिक नियमांनी नियंत्रित केली असावी. ३ शोधण्याच्या दृष्टीने लोकसंख्या अभ्यास केला माल्थस, रिकार्डो आणि मार्क्स यांनी लोकसंख्या वाढीचा साधनसंपत्तीचा संबंधात अभ्यास करण्याचा प्रयत्न केला पुढील विवेचनात लोकसंख्येच्या काही सिध्दांताबद्दल माहिती दिली आहे.

१) **लोकसंख्या संक्रमण सिद्दांत -**

विसाव्या शतकाच्या आधी लोकसंख्या वाढ एका विशिष्ट प्रकाराने होत असे. अनुभवाधिष्ठित निरीक्षकाणे मांडण्याचा प्रयत्न शास्त्रज्ञांनी केला. पण लोकसंख्या वाढ व आर्थिक विकास यांच्यातील दृढ नात्याचा संबंध विसाव्या शतकात प्रथमच पध्दतशीरपणे मांडण्याचा जो प्रयत्न झाला. त्यातूनच लोकसंख्या संक्रमण ही संकल्पना उदयास आली. लोकसंख्या संक्रमण ही संज्ञा सर्वात प्रथम फक नॉटस्टाईन या शास्त्रज्ञाने व्यापक अर्थाने उपयोगात आणली. पाश्चात्य प्रगत देशातील अनुभवावरुन लोकसंख्ये संबधी मांडण्यात आलेल्या सर्व सिध्दांताच्या मानाने हा सिंध्दात अधिक शास्त्रीय स्वरुपाचा व सर्वांना पटणारा वाटतो. लोकसंख्या वाढ व एखाद्या देशाची किंवा

भौगोलिक क्षेत्राची आर्थिक अवस्था याचा निकटचा संबंध असतो. जन्मदर व मृत्यूदर यांच्या आकडेवारीवरुन लोकसंख्या वाढ काढली जाते. लोकसंख्या वाढीच्या गतिमानतेवरुन तिच्या विविध अवस्था निश्चित करतात. उदा. खमी लोकसंख्या वाढीची अवस्था, मध्यम लोकसंख्या व पुन्हा कमी लोकसंख्या वाढीची अवस्था.

"एखाद्या क्षेत्राच्या लोकसंख्या वाढीचे जे चक्र सुरु असते या चक्रालाच **लोकसंख्या संक्रमण** असे म्हणतात."

"औद्योगिकीकरणाच्या प्रगत अवस्थेत जन्मदर व मृत्यूदर घटल्याने लोकसंख्या वाढीचा वेग पुन्हा कमी होतो. लोकसंख्या वाढीच्या या मार्गक्रमणास लोकसंख्या संक्रमण असे म्हणतात."

शेती व्यवसाय करणारा समाज औद्योगिकीकरणाकडे जाताना त्याला संक्रमणाच्या अवस्थांमधून जावे लागते. एकाचवेळी भिन्न भिन्न देशात लोकसंख्या वाढीच्या भिन्न भिन्न अवस्था असतात.

संक्रमण सिध्दांताची मूलतत्त्वे -

१) लोकसंख्या वाढ किंवा लोकसंख्येतील बदल व आर्थिक विकास याचा घनिष्ट संबंध असतो.
२) लोकसंख्या वाढ चक्रिय स्वरुपाची असते. कालप्रवाहात लोकसंख्या वाढीचे चक्र विविध अवस्थांमधून कार्यान्वित होत असते.
३) लोकसंख्या वाढीच्या अवस्था सुरुवातीला मंद नंतर जलद स्फोटक नंतर पुन्हा मंद वाढ व शेवटी स्थिर वाढ अशा असतात.
४) जन्मदरापेक्षा मृत्यूदरात लक्षणीय घट होते. तेव्हा लोकसंख्या जलद गतीने वाढते.
५) लोकसंख्या वाढीचा कल स्थिरावताना जन्मदर व मृत्यूदर निचतम पातळीला पोहोचतात.
६) लोकसंख्या संक्रमणाचे मूळ आर्थिक संक्रमणात आहे. आर्थिक संक्रमणाबरोबर लोकसंख्या संक्रमण होत असते.

लोकसंख्या संक्रमण सिध्दांताच्या अवस्था -

लोकसंख्या संक्रमणाचे सिध्दांताचे प्रयोजन विविध शास्त्रज्ञांनी केलेले असून त्याच्या संक्रमण अवस्थाच्या वर्गवारीत थोडाफार फरक असला तरी मूलतत्त्वाचे स्पष्टीकरण केले आहे. कोणत्याही प्रदेशाची लोकसंख्या वाढ ही काळाच्या ओघात आर्थिक अवस्थेशी निगडीत असल्यामुळे संक्रमण सिध्दांताच्या पुढील अवस्था आहेत.

१) संक्रमणपूर्व समतोल
२) प्राथमिक संक्रमणावस्था
३) उत्तर संक्रमणावस्था
४) संक्रमणोत्तर समतोल



१) संक्रमणपूर्व समतोल -

लोकसंख्या वाढीची ही सुरुवातीची प्राथमिक अवस्था असते. या अवस्थेत जन्मदर आणि मृत्यूदर हे जास्त व बहुधा सारखेच असल्यामुळे लोकसंख्या वाढ अत्यंत कमी वेगाने होते आणि मंद असते. सामान्यत: प्राथमिक अर्थव्यवस्थेत किंवा जेथे औद्योगिकीकरण नाही अशा क्षेत्रात अथवा काळात लोकसंख्या फारशी वाढत नाही. यामुळे लोकसंख्या ही समतोल असल्याने या अवस्थेला संक्रमण पूर्व समतोल असे म्हणतात. औद्योगिक पूर्व काळातील समाजामध्ये जन्मदर व मृत्यूदर हे जास्त व साधारण समान असतात. समाजात वैद्यकिय सुविधाचा तुटवडा, आरोग्य अनास्था व अन्नपुरवठ्यात अनियमितता यामुळे मृत्यूचे प्रमाण जास्त असते. समाजाचे अस्तित्व टिकविण्यासाठी जन्मदरही जास्त असतो. जन्मदर व मृत्यूदर जास्त असल्याने लोकसंख्या अतिशय मंदगतीने वाढते. उदा. पापुआ व न्युगिनी

२. प्राथमिक संक्रमणावस्था -

पहिल्या अवस्थेत जेव्हा आर्थिक स्तर उंचावयाला सुरुवात होते. त्यावेळी संक्रमण अवस्थेला सुरुवात होते. या अवस्थेत जन्मदर आणि मृत्यूदर यांच्यात तफावत निर्माण होऊ लागते. तथापि ही तफावत मुख्यत्वे मृत्युदरात घट झाल्यामुळे होऊ लागते. प्राथमिक संक्रमणावस्था या अवस्थेत मृत्यूदर कमी झालेला असतो. परंतु जन्मदर मात्र पूर्वी इतकाच वरच्या पातळीवर असतो. काही वेळा जन्मदर थोडासा वाढलेला ही असतो. कारण या अवस्थेत आरोग्याच्या सुविधा आणि अनियमित अन्नपुरवठा उपलब्ध होत असतो. त्यामुळे या अवस्थेत लोकसंख्या जलद गतीने वाढताना दिसते. सध्या विकसनशील देशापैकी बहुतेक देश संक्रमणाच्या या दुसऱ्या अवस्थेत येतात. उदा. श्रीलंका

३. उत्तर संक्रमणावस्था -

संक्रमणावस्थेचा हा भाग आर्थिक अवस्थेला झालेल्या उर्जितावस्थेमुळे मृत्यूदर नीचतम पातळीकडे झुकतो व जन्मदरातील घटही चालूच राहते. या अवस्थेत म्हणूनच जन्मदर नीचतम पातळीकडे वाटचाल करतो तर मृत्यूदर वस्तूत: नीचतम झालेला असतो. अर्थात जन्मदराचे प्रमाण मृत्यूदरापेक्षा थोडे जास्तच असते. परिणामी लोकसंख्येची वाढ होते. पण तिचा वेग मात्र मंदावू लागतो. या अवस्थेत लहान कुटुंब उच्च राहणीमान, शिक्षण, वाहतूक,

आरोग्य यांना उन्नत अवस्था प्राप्त होऊ लागते. व लोक स्वेच्छेने लोकसंख्या नियंत्रित करु लागतात.

विकसित अर्थव्यवस्था, औद्योगिक क्रांती, वैद्यकिय सुविधामुळे मृत्यूदर किमान पातळीवर आलेला असतो. जन्मदरात देखील घट चालूच असते. अर्थात जन्मदराचे प्रमाण मृत्यूदराच्या प्रमाणापेक्षा थोडे जास्त असते. लोकसंख्येत वाढ होत असली तरी वाढीचा वेग कमी होत जातो. उदा. भारत व चीन

४. संक्रमणोत्तर समतोल -

लोकसंख्या संक्रमणाची ही अंतिम अवस्था होय. या अवस्थेत पहिल्या अवस्थेप्रमाणेच जन्मदर व मृत्यूदर दोन्ही ही समान होऊ लागतात. परंतु ते नीचतम पातळीला असतात. लोकसंख्या स्थितिकडे गेल्याने या अवस्थेला संक्रमणोत्तर अवस्था असे म्हणतात. या अवस्थेत जाणीवपूर्वक लोकसंख्येवर नियंत्रण ठेवलेले असते. जन्मदर व मृत्यूदर यांनी किमान पातळी गाठल्यामुळे लोकसंख्या वाढ हळूहळू शून्यवत होऊ लागते. उदा. दक्षिण कोरिया

अशा पध्दतीने कोणत्याही देशाच्या लोकसंख्या बदलाची चार टप्यात विभागणी करता येते. अलिकडे यामध्ये पाचवा टप्पाही समाविष्ट करण्यात आलेला आहे. ज्यामध्ये मुख्यत्वेकरुन लोकसंख्येत होणारी घट दाखविण्यात येते. ही होणारी घट नैसर्गिक असते. येथे मृत्यूदरापेक्षा जन्मदर कमी असतो. उदा. जर्मनी व स्वीडन

लोकसंख्येच्या संक्रमण सिध्दांतात दोन गोष्टींवर भर दिलेला आहे.

१) लोकसंख्या संक्रमणाचे मूळ आर्थिक संक्रमणात असून आर्थिक संक्रमण होत असेल तर लोकसंख्या संक्रमण जवळ जवळ अटळ असते.
२) प्रथम मृत्यूदर कमी होता व जन्मदर कमी होण्यासाठी जो अधिक कालावधी लागतो. त्या मधल्या काळात लोकसंख्या वाढ स्फोटक वेगाने होते.

संक्रमण सिध्दांताचे महत्व -

१) लोकसंख्यावाढ व आर्थिक विकास यांच्यातील सहसबंध स्पष्ट होतात.
२) देशाच्या आर्थिक विकास होत असेल तर लोकसंख्या संक्रमणाच्या विविध पायऱ्या राष्ट्र ओलांडू शकते.
३) आर्थिक विकासामुळे राहणीमानाचा दर्जा उंचावतो कुटुंब समाज व राष्ट्र या विषयीच्या मानवी भावना गतिमान होतात.
४) जर्मन, जपान, ग्रेट, ब्रिटन, स्वीडन या देशाच्या अभ्यासावरुन असे स्पष्ट होते की लोकसंख्या विस्फोटावर सक्तीपेक्षा स्वेच्छेने मात करता येते. औद्योगिक क्रांतीनंतर आर्थिक परिवर्तनामुळे मृत्यूदरातील घट झाली. परंतु जन्मदरातील घट लोकांनी स्वेच्छेने स्वीकारली लोकसंख्या वाढीचा वेग शुन्यवत आणला यामुळे आर्थिक विकासाला अधिक चालना मिळाली.

५) औद्योगिक प्रगतीमुळे वृषीप्रधान अवस्थेतील कुटुंब म्हणजे मोठा उत्पादक घटक ही संकल्पना बदलली गेली. स्पर्धात्मक नगरी संस्कृतीत राहणीमानाचा दर्जा टिकविणे महत्वाचे वाटल्याने मोठे कुटुंब गैरसोईचे वाटू लागते. यामुळे जन्मदर आपोआपच खाली आला.

तुमची प्रगती तपासा :

१) लोकसंख्येचा संक्रमण सिद्धांत स्पष्ट करा.

३.३ माल्थसचा लोकसंख्या सिध्दांत

वाढत्या लोकसंख्येबद्दल माल्थसच्या अगोदरही काहींनी माल्थस प्रमाणेच काही कल्पना मांडल्या माल्थसने याच कल्पना विस्तार सविस्तर आणि गणिती रुपात मांडल्या त्या सिध्दांताला माल्थसचा सिध्दांत म्हटले आहे. यातील प्रथम तीन मुद्यात लोकसंख्या का आणि कोणत्या गतीने वाढते हे त्याने स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच लोकसंख्या वाढीबरोबर साधन संपत्तीची वाढ किंवा अन्न धान्य कसे कमी प्रमाणात वाढते. आणि त्याचे परिणाम काय होतात हे स्पष्ट केले आहे. शेवटच्या दोन मुद्यात माल्थसने वाढत्या लोकसंख्येवर उपाय सुचविले आहेत. माल्थसच्या सिध्दांताचे पाच मुद्दे पुढीलप्रमाणे:

१. माल्थसच्या मते लोकसंख्येवर कोणतेच नियंत्रण नसेल तर लोकसंख्येची वाढ भूमिती श्रेणीनुसार म्हणजे १, २, ४, ८, १६, ३२ या प्रमाणे होऊन २५ वर्षात लोकसंख्या दुप्पट होते.
२. अन्न धान्यांचे आणि इतर साधनसंपत्तीचे उत्पादन मात्र अर्थशास्त्रातील घटत्या कलाच्या सिध्दांतानुसार होते. जरी अन्नधान्य वाढले तरी घटत्या प्रमाणातच वाढते. म्हणजेच माल्थसच्या अन्नधान्य आणि साधनसंपत्ती गणिती श्रेणीचे वाढते. उदा. १, २, ३, ४, ५, ६
३. याप्रमाणे लोकसंख्येतील वाढ आणि अन्नधान्याची वाढ यामध्ये फरक असल्याने शेवटी लोकसंख्या वाढ आणि अन्नधान्य उत्पादनात असमतोल निर्माण होते.
४. या असमतोलामुळे वाढत जाणारी लोकसंख्या त्या पातळीवर सामावून घेणे शक्य होत नाही. त्यामुळे उपासमार, दुष्काळ, रोगराई, साथीचे रोग, पूर, भूकंप इ. सारख्या नैसर्गिक आपत्ती येऊन लोक मृत्यूमुखी पडतात या

नैसर्गिक आपत्तीनांच माल्थसने प्रत्यक्ष निर्बंध असे म्हटले आहे. या निर्बंधातून पुन्हा लोकसंख्या आणि अन्नधान्य यांचा समतोल राखला जातो.

५. नैसर्गिक आपत्तीतून समतोलावस्थेत येणे हे मानवाच्या दृष्टीने अतिशय कष्टप्रद आहे त्यात दु:ख आहे. त्यापेक्षा नैतिक प्रतिबंधाचा लोकांनी स्वीकार करणे अधिक चांगले. न्नैतिक प्रतिबंध म्हणजे उशीरा लग्न, ब्रम्हचर्य पाळणे, लग्नानंतर संयम इ.उपाय माल्थसने सुचविले आहे.

वरीलप्रमाणे माल्थसने आपल्या सिध्दांतात आपली मते वाढत्या लोकसंख्येबद्दल मांडून पुढे माल्थस म्हणतो नैतीक उपाय योजना न केल्याने लोकसंख्या आणि अन्नधान्य यातील असमतोल वाढत जाईलच जगाला दु:ख, दारिद्र, उपासमार या समस्या नेहमीच भेडसावत राहतील.

लोकसंख्येबाबत माल्थसने जो सिध्दांत मांडला त्यामध्ये दोन गोष्टी प्रकर्षाने जाणवतात त्या म्हणजे –

१) मानवाच्या अस्तित्वासाठी अन्न हा घटक अत्यावश्यक आहे.

२) स्त्री पुरुषांमधील लैंगिक वासना ही आवश्यक बाब असून भविष्यकाळात ती कमी होणार नाही. म्हणजेच अन्न आणि लैंगिक वासना या दोन गोष्टी मानवी जीवनाच्या दृष्टीने अत्यावश्यक असल्याने त्या गृहीत धरुन माल्थसने असा सिध्दांत मांडला की मानवाची प्रजोत्पादन शक्ती ही निर्वाह वस्तू उत्पादन करण्याच्या शक्तीपेक्षा मोठी असते. याला पुरावा म्हणून त्याने भूमिती व गणिती पध्दतीचे उदा. देवून स्पष्ट केलेले आहे.

लोकसंख्या आणि अन्न पुरवठा यांच्या वाढीचा तुलनात्मक अभ्यास केला असता लोकसंख्या ही नेहमीच अन्नपुरवठ्याची मर्यादा मागे टाकून ढपाट्याने वाढत जाते. गणिताच्या भाषेत विचार केला तर लोकसंख्या साधारणत: २५ वर्षात दुप्पट होते. लोकसंख्या वाढीबाबत माल्थस असे सांगतो की लोकसंख्या वाढीवर ठराविक मर्यादेनंतर नैसर्गिक व प्रतिबंधक या दोन नियंत्रकामुळे आपोआपच मर्यादा येत असतात.

माल्थस शेवटी असेही म्हणतो की, कोणत्याही काळात लोकसंख्येचे प्रमाण हे अन्न पुरवठ्यापेक्षा केव्हाही वेगाने वाढणारेच असते. अशा विषम परिस्थितीत गरिबांची स्थिती नेहमी खालावत जाणारी असते. या धकाधकीच्या जीवनात नैतिक उपायांचा अवलंब करणे लोकांना शक्य होईलच याची खात्री देता येत नाही कारण दु:ख आणि दारिद्रय या चक्रात हा संयमाचा प्रश्न हाताळणे कोमालाही शक्य होत नाही. म्हणून लोकसंख्या वाढीचा हा प्रश्न केव्हाही आणि कोणत्याही परिस्थितीत कमी अधिक प्रमाणात भेडसावतच राहणार अशा प्रकारचा त्याने निराशावादी निष्कर्ष काढला आहे.

माल्थसच्या सिध्दांतावरील आक्षेप :

१. माल्थसने आपल्या सिध्दांतात लोकसंख्या वाढीचा दिलेल्या भूमिती श्रेणीचा अंदाज खोटा आहे. कारण जगात कोणत्याच देशात या प्रमाणे लोकसंख्येत वाढ झालेली नाही. काही देशात लोकसंख्या कमी झालेली आहे, तर काही देशात लोकसंख्या मंदगतीने वाढते आहे किंवा स्थिर आहे. माल्थसलाही हे नंतर पटलेले असावे. कारण नंतरच्या आवृत्यांमध्ये माल्थसने लोकसंख्या वाढ भूमिती श्रेणीने होते हे न लिहीता लोकसंख्या अन्नधान्यापेक्षा जास्त वेगाने वाढते आहे हे नमुद केले आहे.

२. या सिध्दांतात तांत्रिक प्रगती विचारात न घेतल्याने अन्नधान्याच्या वाढीचा अंदाज देखील चुकीचा ठरतो. कारण वैज्ञानिक प्रगतीमुळे आणि तांत्रिक ज्ञानातील प्रगतीमुळे जगातील काही देश प्रचंड प्रमाणात अन्नधान्याचे उत्पादन करताना आढळतात. त्यामुळे अन्नधान्य उत्पादनाबाबतीत घटत्या उत्पादन फलाचा सिध्दांत चुकीचा ठरतो.

३. माल्थसने असे गृहीत धरले होते की, स्त्री-पुरुषामधील जबरदस्त लैंगिक आकर्षण कायम असते व त्यामुळे लोकसंख्येत प्रचंड वाढ होते. परंतु असे घडले नाही. जगातील बऱ्याच देशात हे आकर्षण कायम असूनही आर्थिक दृष्टया राहणीमानाचा दर्जा टिकवण्यासाठी लोकांनी स्वत:हूनच लोकसंख्या वाढीवर नियंत्रण ठेवले आहे.

४. माल्थसने १५० वर्षापूर्वी आपल्या सिध्दांतात सांगितले होते की एका पोटास खाण्यासाठी आवश्यक असणारे उत्पादन दोन हातांनी होणार नाही. हा विचार खोटा ठरला आहे. कारण सध्या औद्योगिकरण झालेले आहे. त्यामुळे दोन हात आज एका पोटाच्या क्षमतेपेक्षा जास्त निर्मिती करतात. इतकेच नव्हे तर जादा निर्मिती इतर देशांकडे निर्यात केली जाते.

५. माल्थसच्या मताप्रमाणे नैसर्गिक साधन संपत्ती मधील जमिनीसारखी संपत्ती आपण वाढवू शकत नाही. परंतु तांत्रिक प्रगतीमुळे समुद्रात भराव टाकता येतो. अर्थात यावर बऱ्याच मर्यादा आहेत. परंतु जमीन जरी वाढविता आली नाही तरी जमीनीची सुपिकता वाढविता येते. व त्यामुळे उत्पादन मोठ्या प्रमाणात वाढवता येते.

६. क्यनन यांच्या मताप्रमाणे लोकसंख्येची तुलना जगातील अन्नधान्याच्या पुरवठ्याशी न करता एकंदर राष्ट्रीय उत्पन्नाशी करणे अधिक उचीत आहे. कारण आज लोकांचा राहणीमानाचा दर्जा ठरविणाऱ्या अनेक घटकातील अन्नधान्य पुरवढा हा एक घटक आहे. त्यामुळेच आज लोकसंख्येची तुलना राहणीमानाचा दर्जा व दरडोई उत्पन्न यांच्याशी केली जीते.

७. माल्थसच्या सिध्दांता दूरदष्टीचा अभाव आहे. माल्थस त्या काळच्या परिस्थितीने प्रभावित झालेला होता. कारण या सिध्दांतात भविष्य काळातील प्रगतीचा विचार केलेला नाही. आणि तो अंदाज माल्थसला नसल्यामुळेच सिध्दांतातील बऱ्याच गोष्टी चुकीच्या ठरविल्या आहेत.

८. कननच्या मताप्रमाणे लोकसंख्या वाढीचा विचार माल्थसने फक्त अन्नाच्या पुरवठ्याशी संबंधित केला आहे. लोकसंख्या वाढीबरोबर श्रमशक्तीत वाढ होते. हे माल्थसने गृहीत धरलेले नाही. श्रमशक्तीतील वाढीमुळे उत्पादनात वाढ हे त्यामुळेच माल्थसच्या सिद्धांतात अपेक्षित नाही.

९. प्राणी शास्त्रज्ञांनी माल्थसची लोकसंख्या वाढी बद्दलची मते चुकीची मानली आहेत. त्यांच्यामुळे लोकसंख्येच्या सांस्कृतिक प्रगती बरोबर प्रजोत्पादन शक्ती कमी होत जाते. त्यामुळे माल्थसने वर्णन केलेले भयंकर चित्र दिसणारच नाही.

माल्थसच्या सिध्दांताचे महत्त्व-

माल्थसच्या सिध्दांतावर जरी टीका झालेली असली तरी लोकसख्येच्या संदर्भात विस्तृतपणे शोध घेणारा पहिला तज्ञ म्हणून माल्थसच्या सिध्दांताचे अनन्यसाधारण महत्त्व मानले जाते.

१) माल्थसच्या सिध्दांतामुळे प्रथमच लोकसंख्येचा प्रश्न सामाजिक शास्त्रांच्या अभ्यासात समाविष्ट करण्यात आला.
२) सिध्दांतावर टिका करणाऱ्यांनी सुध्दा माल्थसचा सिध्दांत पूर्णपणे चुकीचा ठरविलेला नाही.
३) आजदेखील कित्येक देशांच्या लोकसंख्यावाढीबाबत माल्थसचा सिध्दांत सार्थ ठरतो.
४) लोकसंख्या प्रश्नांना सर्वप्रथम माल्थसनेच वाचा फोडली.
५) माल्थसच्या सिध्दांतांमुळेच लोकसंख्या प्रश्नविषयी शास्त्रज्ञ, तत्वज्ञ, नियोजनकर्ते यांचे लक्ष वेधले गेले.
६) लोकसंख्या प्रश्नांना सर्वप्रथम माल्थनेच वाचा फोडली.
७) माल्थसच्या सिध्दांतामुळे लोकसंख्या प्रश्नांना शास्त्रीय अधिष्ठान प्राप्त झाले.
८) माल्थसचा हा सिध्दांत मुद्देसूद, प्रभावी आणि वैचारिक आक्रमकता स्पष्ट करतो.
९) समायोचितता हे माल्थसच्या सिध्दांताचे आणखी एक वैशिष्ट्य होय.

तुमची प्रगती तपासा :

१) माल्थसचा लोकसंख्या सिद्धांत सांगा.

_____

_____

_____

_____

_____

३.४ मार्क्सचा सिध्दांत

हा सिध्दांत म्हणजे समाजवादी विचारसरणीचा एक भाग आहे. मार्क्सने समाजवादी दृष्टीकोनातून शास्त्रशुध्द विश्लेषणावर आधारीत अशा सिध्दांताचा एक भाग म्हणून लोकसंख्येविषयीचा विचार मांडला. त्याने

लोकसंख्येचा संबंध भांडवलशाहीशी जोडलेला होता. मार्क्सच्या मते लोकसंख्या वाढ आणि लोकसंख्येच्या समस्या हे प्रश्नच अस्तित्वात नाहीत. प्रचलीत समाज व्यवस्थेतील संपत्तीच्या विषम वाटणीमुळे ही निर्माण केलेली दु:खे आहेत. लोकसंख्यावाढीमुळे लोक दु:खी नसून त्यांच्या दु:खाचे मूळ समाजव्यवस्थेतील संपत्तीच्या विषम वाटणीत आहे. माणसा माणसात आर्थिक समता नसल्यामुळे काही लोक दु:खात जीवन जगतात तर काही लोक सुखी जीवनाचा आनंद घेत असतात. म्हणूनच समतेवर आधारलेल्या नव्या समाजातील उत्पादन व्यवस्थेवर पूर्वीची बंधने नसतील तर लोकसंख्येपेक्षा उत्पादन शक्ती वेगाने वाढत जाईल. तसेच मानवी दारिद्र्याचे कारण मोठी लोकसंख्या हे नसून खऱ्या गुन्हेगाराकडे गरीब जनतेचे लक्ष जाऊ नये म्हणून भोडवलदारांनी तयार केलेले हे एक बुजगावणे आहे. श्रीमंत व पांढरपेशी लोकांमुळेच दारिद्र्य वाढते.

मार्क्सच्या मतानुसार प्रत्येक मानवी समस्येचे मूळ आर्थिक कारणांमध्ये व प्रचलीत अर्थव्यवस्थेमध्ये असते. त्याच्या मते सर्व जागतिक संख्येबद्दल स्थलकालातीत एकच सार्वत्रिक नियंत्रण असूच शकत नाही. लोकसंख्येची समस्या कोणत्याही जीवशास्त्रीय कारणामुळे निर्माण झाली नसून भांडवलशाही पध्दतीचा तो अटळ परिणाम आहे इतकेच नव्हे तर भांडवलशाही पध्दत टिकून राहण्यासाठी तो अत्यावश्यक आहे. मार्क्सच्या मते श्रमशक्तीची मागणी फिरत्या भांडवलावर (variable Capital) अवलंबून असते. परंतु भांडवल संचनाच्या प्रक्रियेतच हळूहळू स्थिर भांडवलाचे फिरत्या भांडवलाशी असलेले प्रमाण वाढत जाण्याची क्रिया असते. त्यामुळे श्रमशक्तीची मागणी कमी कमी होत जाते. त्याचा परिणाम म्हणूनच बेकारीचे प्रमाण वाढत जाते. या पध्दतीने लोकसंख्या वाढ झाली हे दाखविण्याचा प्रयत्न केला जातो म्हणजेच भांडवलशाही अर्थव्यवस्था स्वत:च्या प्रगतीबरोबर जादा लोकसंख्या निर्माण करीत रहाते मार्क्सच्या मते या समस्येवर एकमेव उपाय म्हणजे भांडवलशाही नष्ट करुन समाजवादी सामाजकि रचना करणे हा होय. यात मजूरांचे किंवा मानवी श्रमाचे शोषण थांबल्यामुळे जनतेचे राहणीमान उंचावले जाते. राहणीमान कायम राखण्यासाठी जन्म प्रमाण आणि मृत्यू प्रमाण कमी होईल ही मार्क्सची भूमिका आहे. लोकसंख्येचा प्रश्न सोडविण्यासाठी भांडवलपध्दती नष्ट करुन उत्पादनाच्या सामाईक मालकीवर व समतेवर आधारीत असा नवसमाज निर्माण करण्याची गरज वर्तविलेली आहे. कारण जर शोषण थांबले तरच लोकांचे राहणीमान उंचावणार आहे आणि आपोआपच मृत्यू व जन्मप्रमाण कमी होईल असे त्याचे मत होते.

मार्क्सच्या सिध्दांतावरील टिका -

१. मार्क्सचा हा सिध्दांत केवळ तर्काधिष्टित आहे. त्याला वस्तुस्थितीचा कोणताही पुरावा नाही. साम्यवादी अर्थव्यवस्था या दोन्हीच्या लोकसंख्या विषयक परिस्थितीत मूलभूत फरक असतो. व त्यामुळे सामयवादी देशात लोकसंख्येची समस्या नसते. हा मार्क्सचा निष्कर्ष आजच्या साम्यवादी देशाचा विचार खोटा आहे असे आढळते.

२. साम्यवादी व भांडवलशाही या दोन्ही प्रकारच्या समाजामध्ये किंवा देशांमध्ये वेगवेगळी अर्थव्यवस्था आणि शासनव्यवस्था असूनही लोकसंख्येच्या जन्म मृत्यूच्या प्रमाणात भेद जाणवत नाही. परंतु या एका गोष्टीवरुन दोन्ही प्रकारच्या समाजामध्ये लोकसंख्यासंबंधीचे सिध्दांत एकच असतात असा जो निष्कर्ष काढला जातो तो तर्क सांगत नाही.

वरीलप्रमाणे मार्क्सच्या सिध्दांताचे दोष जरी असले तरी मार्क्सच्या सिध्दांताची काही महत्वाची वैशिष्ट्ये ही विचारात घेण्यासारखी आहेत. ती पुढीलप्रमाणे -

१. मार्क्सने लोकसंख्याविषयक मूलभूत गोष्टीवर भर दिला आहे. त्याचा सखोल अभ्यास होणे जरुर आहे. त्यातील पहिली महत्वाची गोष्ट म्हणजे लोकसंख्येबद्दल कोणत्याही काळात कोणत्याही देशात व कशाही परिस्थितीत उपयोगी पडेल असा एकच सार्वत्रिक नियम असू शकत नाही हे प्रथम मार्क्सनेच सांगितले आहे. माल्थसच्या सिध्दांतावरच टीका करताना मार्क्स म्हणतो जन्म प्रमाण जीव शास्त्रीय घटकाशी संबंधीत असेल तरी संपूर्ण सामाजिक व आर्थिक परिस्थितीच्या चौकटीवरच लोकसंख्या वाढ अवलंबून असते.

२. लोकसंख्या वाढीमुळे निर्माण होणारी निर्वाह साधनाची टंचाई हे लोकांच्या दारिद्र्याचे नेहमीच कारण नसून सर्व श्रमिकांना रोजगार पुरविण्याची प्रचलित अर्थ व्यवस्थेची असमर्थता हेही दारिद्र्याचे एक कारण असू शकते.

३. संपत्तीचे विषम वाटप हे दारिद्र्याचे आणखी एक कारण आहे. साधन संपत्तीचा पूर्ण उपभोग घेण्यामध्ये विषमता आणि आर्थिक शोषणावर उभारलेली अर्थव्यवस्था हाच अडथळा आहे.

मार्क्स नंतर या सिध्दांतावर दोन भिन्न मते प्रदर्शित झाल्याने या सिध्दांताबद्दल अनास्था निर्माण झाली असली तरी या सिध्दांतामधील काही मूळ बाबींवर विचार घेणे आवश्यक आहे.

तुमची प्रगती तपासा :

१) मार्क्सचा लोकसंख्या सिद्धांत सांगा.

_____

_____

_____

_____

_____

❖❖❖❖

४

स्थलांतर

घटक संरचना :

४.० उद्दिष्टे
४.१ प्रस्तावना
४.२ व्याख्या
४.३ स्थलांतराचे वर्गीकरण
४.४ स्थलांतरावर परिणाम करणारे घटक
४.५ स्थलांतराचे परिणाम
४.६ स्थलांतरातील ओढ व ढकल घटक
४.७ आधुनिक काळातील स्थलांतरे

४.० उद्दिष्टे

- स्थलांतराची प्रक्रिया समजून घेणे.
- स्थलांतराचे वर्गीकरण लक्षात घेणे.
- स्थलांतरावर परिणाम करणारे घटक अभ्यासणे.
- स्थलांतरातील ओढ व ढकल घटक समजून घेणे.

४.१ प्रस्तावना

मानव स्वत:च्या आरंभापासून एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी सतत हालचाल करीत असे. अन्न वस्त्र व निवारा या मूलभूत गरजा भागविण्यासाठी मानवाची सतत धडपड चालू होती आणि आजही आहे. याचाच अर्थ मानवाच्या अस्तित्वापासून मानवाचे स्थलांतर ही संकल्पना रुढ आहे. अलिकडच्या काळात मानवाच्या मूलभूत गरजांबरोबरच संरक्षण किंवा सुरक्षितता हेही स्थलांतराचे महत्वाचे कारण ठरत आहे. स्थलांतर ही विशिष्ट प्रदेशातील तात्पुरती किंवा कायमची हालचाल असते.

४.२ व्याख्या

एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशात मानवाचे विशिष्ट उद्देशाने व विशिष्ट कालावधीसाठी जाणे किंवा येणे म्हणजे स्थलांतर होय.

विशिष्ट कालावधीत जी व्यक्ती निदान एकदा तरी नेहमीचे निवासस्थान बदलण्याच्या उद्देशाने एका सीमाबध्द घटक प्रदेशातून दुसऱ्या सीमाबध्द घटक प्रदेशात वास्तव्यासाठी जाते त्याला स्थलांतर असे म्हणतात.

निर्गमन प्रदेश व आगमन प्रदेश -

स्थलांतर करण्यापूर्वी व्यक्तीचे जेथे वास्तव्य असते व जेथून स्थलांतरमुळे ती व्यक्ती दुसरीकडे जाते तो निर्गमन प्रदेश होय व स्थलांतराच्या क्रियेनंतर व्यक्ती ज्या ठिकाणी वास्तव्य करते म्हणजेच तेथे ती स्थलांतर घटना संपते तो आगमन प्रदेश होय. स्थलांतरमुळे लोकसंख्येचे पुनर्वितरण होत असते. स्थलांतरमुळे ज्या प्रदेशातून स्थलांतर होते व ज्या प्रदेशात स्थलांतर होते अशा दोन्ही प्रदेशातील लोकसंख्येची घनता व रचना यामध्ये बदल होतो.

- आस्थलांतरी उस्त्थलांतरी, आप्रवासी व उत्प्रवाशी -

कोणत्याही स्थलांतरामध्ये दोन घटना घडत असतात.

१) एका ठिकाणाहून दूर जाण्याची
२) दुसऱ्या ठिकाणी येण्याची

एका स्थानाच्या दृष्टीने ते निर्गमन आहे. तर दुसऱ्या स्थानाच्या दृष्टीने आगमन आहे.

१) आंतरराष्ट्रीय स्थलांतर
२) देशांतर्गत स्थलांतर

आंतरराष्ट्रीय स्थलांतराच्या संदर्भात आस्थलांतरी आणि उत्स्थलांतरी.

उदा. भारतातून अमेरिकेत वास्तव्यासाठी जाणारी व्यक्ती भारताच्या दृष्टीने (Emigrant) तर अमेरिकेच्या दृष्टीने (Immigrant) असते.

देशांतर्गत स्थलांतराच्या आप्रवासी व उत्पवासी उदा. महाराष्ट्रातून केरळमध्ये वास्तव्यासाठी जाणारी व्यक्ती महाराष्ट्राच्या दृष्टीने (Out Emmigrant) तर केरळच्या दृष्टीने (Immigrant) असते.

४.३ स्थलांतराचे वर्गीकरण

स्थलांतराचे वर्गीकरण विविध प्रकारे केले जातो, ते पुढीलप्रमाणे –

अ) उद्दिष्टानुसार / हेतुनुसार स्थलांतर
ब) अंतरानुसार स्थलांतर
क) कालावधीनुसार स्थलांतर
ड) प्रदेशानुसार स्थलांतर

अ) उद्दीष्टानुसार / हेतुनुसार स्थलांतर - स्थलांतर करीत असताना विशिष्ट हेतू किंवा उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून केलेले स्थलांतर या प्रकारात येते. स्थलांतराच्या या प्रकारात ऐच्छिक किंवा स्क्तीचेही स्थलांतर होवू शकते.

२) आर्थिक स्थलांतर
३) सामाजिक स्थलांतर

ब) अंतरानुसार स्थलांतर - स्थलांतराच्या या प्रकारात प्रवासासाठीच्या अंतराचा आधार घोतला जातो. यावरुन कमी अंतराचे स्थलांतर व लांब अंतरावरील स्थलांतर असे प्रकार केले जातात. असे स्थलांतर ऐच्छिक किंवा सक्तीचे असू शकते तसेच कायमस्वरुपी किंवा तात्पुरतेही असू शकते.

१) कमी अंतराचे स्थलांतर - अशा प्रकारचे स्थलांतर हे देशातल्या देशात होत असते. असे स्थलांतर हे दैनिकही असू शकते किंवा दिर्घकालीन, कायमस्वरुपीही असू शकते. या स्थलांतरात देशाच्या सीमा ओलांडल्या जात नाहीत त्यामुळे हे स्थलांतर देशांतर्गत स्थलातर आहे. या स्थलांतरामध्ये राज्यांतर्गत स्थलांतर, जिल्हांतर्गत स्थलांतर व आंतरजिल्हा स्थलांतराचा अंतर्भाव होतो. याचे प्रमुख उपप्रकार पुढीलप्रमाणे –

१) ग्रामीण ते ग्रामीण स्थलांतर
२) ग्रामीण ते नागरी स्थलांतर
३) नागरी ते नागरी स्थलांतर
४) नागरी ते ग्रामीण स्थलांतर

२) दीर्घ अंतराचे स्थलांतर - अशा प्रकारचे स्थलांतर हे एका देशातून दुसऱ्या देशात होत असते.यामध्ये देशाच्या सीमा ओलांडल्या जातात त्यामुळे हे स्थलांतर आंतरराष्ट्रीय प्रकारचे आहे. पूर्वीपासून अशा प्रकारचे स्थलांतर हे अविकसीत देशांकडून विकसीत देशांकडे होत आलेले आहे. अलिकडच्या जागतिकीकरणाच्या व माहिती तेत्रज्ञानाच्या युगात अशा प्रकारच्या स्थलांतरात प्रचंड प्रमाणावर वाढ झालेली आढळते. वाहतूक व

संदेशवहनाच्या साधनांचा झपाट्याने झालेला वकिास आंतरराष्ट्रीय स्थलांतरावर मोठा प्रभाव टाकत आहे. बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या आकर्षणामुळे विकसनशील देशांकडून विकसीत देशांकडे अशा प्रकारचे स्थलांतर मोठ्या प्रमाणात वाढत आहे.

क) **कालावधीनुसार स्थलांतर -** स्थलांतर किती कालावधीसाठी केले जाणार आहे यावरुन स्थलांतराचा हा प्रकार केला जातो. अशा प्रकारचे स्थलांतर हे ऐच्छिक किंवा सक्तीचे असू शकते तसेच ते कमी किंवा लांब अंतराचेही असू शकते.

१) **अल्प किंवा कमी कालावधीचे स्थलांतर -** यामध्ये विशेषत: दैनिक स्थलांतराचा समावेश होतो. म्हणजेच स्वत:च्या राहत्या ठिकाणापासून कामाच्या ठिकाणी ये जा करणे होय. तसेच हंगामानुसार किंवा ऋतुनुसारही स्थलांतर होत असते. पशुपालक जमाती अशा प्रकारचे स्थलांतर करतात. तर आधुनिक लोक पर्यटनाच्या देतूसाठी अशा प्रकारचे स्थलांतर करतात.

२) **दिर्घ किंवा जास्त कालावधीचे स्थलांतर -** अशा प्रकारचे स्थलांतर विशेषत: आर्थिक कारणांसाठी केले जाते. अनेकदा अशा प्रकारचे स्थलांतर हे कायमस्वरुपी असते. कारण या स्थलांतरामध्ये लोक आपली निवासस्थाने बदलतात. मूळ ठिकाणाहून कामाच्या ठिकाणी किंवा निवृत्तीनंतर कामाच्या ठिकाणाहून मूळ ठिकाणी केले स्थलांतर. अशा स्थलांतरात दिर्घ अंतराचे आंतरराष्ट्रीय स्थलांतरही होते. उदा. काही देशवासी आपला देश सोडून इतर देशांचे नागरिकत्व स्विकारतात.

ड) **प्रदेशानुसार स्थलांतर -** कमी विकसीत प्रदेशाकडून जास्त विकसीत प्रदेशाकडे होणारे स्थलांतर या प्रकारचे आहे. यामध्ये प्रदेशातील उपलब्ध सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक सुविधा यांचा परिणाम स्थलांतरीतांवर होतो. स्थलांतराच्या या प्रकारामुळे आधुनिक काळात स्थलांतराचा बदलणारा कल दिसून येतो.

तुमची प्रगती तपासा :

१) स्थलांतराचे वर्गीकरण करा.

_____

_____

_____

_____

_____

४.४ स्थलांतरावर परिणाम करणारे घटक

स्थलांतरावर विविध घटकांचा घनात्मक व ऋणात्मक प्रभव घडत असतो. एखाद्या प्रदेशात असलेले आकर्षक घटक लोकांना आपल्याकडे आकर्षुन घेतात तर त्याच प्रदेशातील अपकर्षक घटक लोकांना दूर करण्यास कारणीभूत ठरतात. यातील काही प्रमुख घटक पुढीलप्रमाणे –

१) प्रावृतिक / भौगोलिक घटक
२) आर्थिक घटक
३) सामाजिक व सांस्वृतिक घटक
४) राजकीय घटक
५) नैसर्गक आपत्ती
६) लोकसंख्याशास्त्रीय घटक

१) **प्रावृतिक / भौगोलिक घटक -** एखाद्या प्रदेशाला लाभलेले अनुवूल स्थान, प्रदेशाची प्रावृतिक रचना (पर्वत, पठार, मैदान), सुपीक मृदा, अनुवूल हवामान, पाण्याची उपलब्धता इ. प्रावृतिक घटक हे स्थलांतरासाठी आकर्षक घटक आहेत. अशा प्रदेशामध्ये मोठ्या प्रमाणावर लोकांचे स्थलांतर होत असते. याउलट एखाद्या प्रदेशातील उंचसखल भूमी, नापीक जमीन, प्रतिवूल हवामान, प्रतिवूल स्थान, पाण्याची अनुपल्बधता इ घटकांचा प्रतिवूल परिणाम स्थलांतर क्रियेवर होतो त्यामुळे अशा प्रदेशात लोकांचे स्थलांतर होत नाही किंवा त्याचे प्रमाण अत्यंत कमी असते. पाण्याचे दुर्भिक्ष असलेल्या ठिकाणी तर लोकांना सक्तीने स्थलांतर करावे लागते.

२) **आर्थिक घटक -** स्थलांतर प्रक्रियेवर आर्थिक घटकांचा मोठा प्रभाव पडताना आढळतो. किंबहुना अलिकडच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात आर्थिक घटक हा स्थलांतराचा मापदंडच म्हटला पाहिजे. ज्या प्रदेशात आर्थिक सुबत्ता असते अशा प्रदेशांमध्ये लोकांना आकर्षित करण्याची खूप मोठी क्षमता असते. अनुवुल आर्थिक घटकांमुळेच लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात, उच्च वेतनाच्या नोकरीच्या संधी मिळतात, त्यामुळे लोकांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावतो. आपोआपच स्थलांतरीतांचे प्रमाण वाढते. याउलट आर्थिक घटक प्रतिवूल असलेल्या प्रदेशातून म्हणजेच अविकसीत प्रदेशाकडून लोकांचे स्थलांतर बाहेर होते.

३) **सामाजिक व सांस्वृतिक घटक -** ज्या प्रदेशात सामाजिक व सांस्वृतिक घटक अनुवूल असतील असे प्रदेश स्थलांतरासाठी आकर्षक प्रदेश असतात. उदा. शिक्षण, आरोग्याच्या सुविधा, चांगल्या दर्जाचे राहणीमान असलेल्या ठिकाणी लोकांचे स्थलांतर होत असते. मानव हा

मूलतः समाजप्रिय प्राणी आहे त्यामुळे तो एकटयाने राहण्यापेक्षा समुहाने राहणे पसंत करतो. त्यामुळेच सामाजिक व सांस्वृतिक घटकांच्या उपलब्धतेकडे त्याचा जास्त कल आढळतो.

४) **राजकीय घटक -** स्थलांतरावर राजकीय घटकांचा परिणामही मोठ्या प्रमाणावर होताना आढळतो. विशेषतः राजकीय घटक आंतरराष्ट्रीय स्थलांतरवर जास्त परिणाम करतात. एखाद्या देशाचे राजकीय धोरण, परस्परांशी असलेले राजकीय संबंध यांचा परिणाम स्थलांतरावर होतो. राजकारणांनुळे विशिष्ट प्रदेशाकडे लोकांचे स्थलांतर होत असते. दुसऱ्या महायुध्दात झालेले स्थलांतर हे राजकीय कारणांमुळे झालेले स्थलांतर होते. जर्मनी व इटली येथे जगातील इतर प्रदेशातील लोकांनी मोठ्या प्रमाणावर स्थलांतर केले. अनेक देशांच्या राजकीय धोरणात पारपत्र परवाना देण्याच्या नियमांमध्ये असलेल्या निर्बंधांचा परिणामही स्थलांतरावर होतो. अलिकडे काही विकसीत व विकसनशील देशांनी पर्यटनाच्या वृध्दीसाठी प्रवेश परवाना देणे सुलभ केले आहे, इतकेच नाही तर इतर देशातून पर्यटनासाठी आलेल्या लोकांना विमानतळावरही असे प्रवेश परवाने दिले जातात. अशा राजकीय धोरणांचा परिणाम म्हणून स्थलांतरीतांचे प्रमाण वाढते व आपोआपच पर्यटन व्यवसायालाही चालना मिळते.

५) **नैसर्गिक आपत्ती -** अचानक येणाऱ्या नैसर्गिक आपत्ती स्थलांतरास कारणीभूत ठरतात. त्सुनामी, पूर, भूकंप या कारणांमुळे ग्रस्त प्रदेशातील लोकांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे लागते. उदा. २०१४ मध्ये माळीण गाव दुर्घटनेतील वाचलेल्या लोकांचे २०१७ पर्यंत दुसऱ्या ठिकाणी पुनर्वसन केले गेले. २००६ साली आलेल्या त्सुनामीच्या आपत्तीत आग्नेय आशियाई देशातील कित्येक लोकांना स्थलांतरीत व्हावे लागले.

६) **लोकसंख्याशास्त्रीय घटक -** लोकसंख्याशास्त्रातील वय व लिंग या दोन घटकांचा परिणाम स्थलांतराच्या प्रक्रियेवर होताना आढळतो. स्थलांतरीतांमध्ये तरुण वर्गाचे स्थलांतर आणि त्यातही पुरुषांचे स्थलांतर मोठ्या प्रमाणावर होत असते. ज्या प्रदेशातून रोजगाराच्या संधी कमी उपलब्ध होतात अशा प्रदेशातून हे स्थलांतर मोठ्या प्रमाणावर होताना आढळते. भारतातील केरळ राज्यात तसेच महाराष्ट्रातील रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यात स्त्रियांचे प्रमाण जास्त आढळते याचेही कारण म्हणजे येथील पुरुष वर्गाचे देशाच्या इतर भागात व मुंबईत होत असलेले स्थलांतर हेच आहे.

तुमची प्रगती तपासा :

१) स्थलांतरावर परिणाम करणारे विविध घटक स्पष्ट करा.

४.५ स्थलांतराचे परिणाम

एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशात होणाऱ्या स्थलांतरामुळे दोन्ही प्रदेशात चांगले व वाईट असे दोन्ही प्रकारचे परिणाम घडून येतात. असे परिणाम पुढीलप्रमाणे -

अ) **प्रावृतिक घटकांवरील परिणाम -** स्थलांतरामुळे ज्या प्रदेशात स्थलांतर होते व जिथून स्थलांतर होते अशा दोन्ही प्रदेशातील भूदृश्यांमध्ये बदल घडून येतो.

१) **ग्रामीण प्रदेशातील प्रावृतिक घटकांवरील परिणाम -**स्थलांतरीत शेती करणारे लोक जंगलांची तोड करतात व शेती करतात, त्यामुळे तेथील प्रावृतिक घटकांमध्ये बदल होतो. शेतीयोग्य जमिनीवर किंवा जंगलांची तोड करुन वस्त्यांची निर्मिती केली जाते. धरणांच्या बांधकामामुळे नवीन वस्त्यांची निर्मिती केली जाते. उद्योग, वाहतुकीच्या मार्गांसाठी प्रावृतिक रचनेत बदल होतो.

२) **नागरी प्रदेशातील प्रावृतिक घटकांवरील परिणाम -** नगरांमध्ये मोठ्या प्रमाणावर स्थलांतर होत असते. त्यामुळे नगरांच्या आकारात बदल होत जातो. जागेअभावी उंचच उंच इमारती निर्माण केल्या जातात. सीमांत प्रदेशातील जंगल व शेती क्षेत्र विविध कारणांसाठी वापरले जावू लागते. थोडक्यात नगरातील मूळ प्रावृतिक घटक बदलत जातात.

ब) **आर्थिक परिणाम -** ग्रामीण भागातून नागरी भागात स्थलांतर झाल्यामुळे स्थलांतरीत लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात, आर्थिक पातळी सुधारते, राहणीमानाचा दर्जा उंचावतो.. तसेच ग्रामीण भागातून स्थलांतर झाल्यामुळे तेथील उरलेल्या लोकांना पुरेसा रोजगार मिळतो व काही प्रमाणात बेरोजगारीचा प्रश्न सुटू शकतो.

याउलट नागरी भागात लोकसंख्या प्रचंड प्रमाणावर वाढल्यामुळे जीवनावश्यक असणाऱ्या पायाभूत सुविधांवर ताण निर्माण होतो. घरांच्या

जमिनीच्या किंमती भरमसाठ वाढतात. शोयीसुविधा पुरविण्यासाठी निधी अपुरा पडतो. शासकीय यंत्रणेवर ताण येतो.

क) **सामाजिक व सांस्कृतिक परिणाम -** विविध देशांतून, विविध प्रदेशातून होणाऱ्या स्थलांतरमुळे वेगवेगळ्या जातीचे, धर्माचे, वंशाचे लोक एकत्र येत असतात. विविध विचार व कल्पनांचा विस्तार होतो. विविध संस्कृती, प्रथा, सण उत्सव यांची ओळख व देवाणघेवाण होतो. यातून मानवी संस्कृतीच्या मूल्यांचे संवर्धन होत असते. त्यातूनच एका परिपक्व समाजाची निर्मिती होण्यास मदत होते.

याउलट विविध / धर्माच्या संस्कृतीच्या लोकांच्या स्थलांतरामुळे जातीय, धार्मिक दंगली निर्माण होवून समाजात अस्थिरता व अशांतता देखील निर्माण होवू शकते. स्थलांतरीत व स्थानिक असा संघर्ष सतत निर्माण होत राहतो. जीवनावश्यक गोष्टींची कमतरता व महागाई वाढते.

ड) **पर्यावरणावरील परिणाम -** ज्या प्रदेशातून स्थलांतर होते अशा प्रदेशातील पर्यावरणावरील ताण कमी होतो व तेथील पर्यावरण सुरक्षित रहाते.

याउलट ज्या प्रदेशात स्थलांतर होते तेथील पर्यावरणावर अतिरिक्त ताण पडतो. साधनसंपत्तीवर ताण निर्माण होतो. अनिर्बंध पध्दतीने शहरांची वाढ होत जाते. उद्योगधंद्यांच्या वाढीमुळे प्रदूषणाच्या समस्या निर्माण होतात. लोकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतात. तेथील परिसंस्थांमध्ये असंतुलन निर्माण होते.

तुमची प्रगती तपासा :

१) स्थलांतराचे परिणाम स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

_____

४.६ स्थलांतरातील ढकल व ओढ घटक

स्थालांतरीत कोण

परदेशी निर्गमीत - आपला देश सोडून परदेशात वस्ती करण्यासाठी गेलेली व्यक्ती.

परदेशी आगमनीत - परदेशातून कायमची वस्ती करण्यासाठी आलेली व्यक्ती.

निर्वासीत - जी व्यक्ती आपल्या देशाच्या बाहेर वास्तव्य करते. उदा. अनेक ज्यू दुसऱ्या महायुद्धाच्या काळात अमेरिकेच्या आश्रयाला निर्वासित म्हणून गेले. तसेच रोहिंगे मुसलमान हे बांगला देशात निर्वासित आहेत.

अंतर्गत स्थान बदलणाऱ्या व्यक्ती - राजकीय, धार्मिक कारणांमुळे ज्यांना सक्तीने स्थलांतरीत व्हावे लागते अशा व्यक्ती. परंतु यामध्ये देशाच्या सीमा ओलांडल्या जात नाहीत.

स्थलांतराची कारणे - देशांतर्गत स्थलांतराची अनेक कारणे आहेत. ज्यांची विभागणी ढकलणारे घटक / अपकर्षक घटक (Push factors) आणि ओढणारे घटक / आकर्षित घटक (pull factors) यामध्ये केली जाते.

ढकलणारे घटक - जे घटक लोकांना अपकर्षित करतात अशा घटकांना ढकलणारे घटक असे म्हणतात. ते पुढीलप्रमाणे –

१) रोजगाराच्या संधीची अनुपलब्धता

२) कमी वेतन

३) जमिनीची कमतरता

४) जमिनीची उत्पादकता

५) आधुनिक सेवांची कमतरता

६) नैसर्गिक आपत्तीग्रस्त प्रदेश

७) शैक्षणिक सुविधांची कमतरता

८) जीवनाची असुरक्षितता

९) राजकीय दबाव

१०) एकत्र कुटुंबांमधील फारकत

ओढणारे घटक - जे घटक लोकांना आकर्षित करणारे असतात अशा घटकांचा समावेश यामध्ये होतो. ते घटक पुढीलप्रमाणे -

१) रोजगाराच्या संधींची उपलब्धता

२) आरोग्य व शिक्षणाच्या सुविधांची उपलब्धता

३) अनुकुल हवामान

४) उद्योगधंद्यांसाठी अनुकुल परिस्थिती

५) वाहतुक दळणवळणांच्या साधंनांची उपलब्धता

६) राजकीय स्थैर्य व व्यक्तीगत सुरक्षितता

७) नवीन उद्योगांचा विकास

८) आधुनिक जीवनशैलीची ओढ

तुमची प्रगती तपासा :

१) स्थलांतरातील ओढ व ढकल घटक सांगा.

४.७ आधुनिक काळातील स्थंलातरे

विसाव्या शतकात झालेल्या विज्ञान व तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे विकसीत व विकसनशील देशांमध्ये मोठी तफावत निर्माण झाली. त्यामुळे विकसीत देशांकडे स्थलांतरीतांचे प्रमाण वाढले.ऐशआरामी पाश्चात्य जीवनशैली, उच्च वेतन, मुवत समाजव्यवस्था या कारणांमुळे जगातील विकसनशील देशांमधील तरुण वर्ग विकसीत देशांकडे आकर्षिला जावू लागला.

धार्मिक कारणांमुळे सिरियातील हजारो मुस्लिम व म्यानमार (बर्मा) मधील हजारो मुस्लीम (रोहिंगे) हे त्या देशांतुन हाकलून दिले व ते निर्वासित म्हणून इतर देशांकडे गेले.

एकविसाव्या शतकात तर अखंड जग हाताच्या तळव्यवरच आले. जागतिकीकरण, खाजगीकरण, मुक्त अर्थ व्यवस्था, आधुनिक तंत्रज्ञानातील प्रगती, उपग्रह संदेशवहनातील प्रगती, इंटरनेटचे जाळे या सर्वांचा परिणाम स्थलांतरावर होत आहे. हवाई वाहतुकीत बोईंग विमानांनी घेतलेल्या आकाश झेपेतून तर अवघे जग हावेच्या अंतरावर येऊन राहिले आहे. या सर्वांचा परिणाम स्थलांतरावर झालेला आहे. परंतु हे उलट किंवा परतीच्या स्थलांतराचे नवे पर्व आहे. विकसनशील देशांमधील सुधारत असलेली स्थिती, उच्च वेतनाच्या मिळणाऱ्या व्यावसायीक संधी, मातृभूमीची ओढ याचबरोबर पाश्चात्य देशातील असुरक्षितता, ताणतणाव यामुळे विकसीत

देशांकडून परत विकसनशील देशांकडे स्थलांतर होवू लागले आहे. तसेच ते शहरी संस्वृतीकडून परत निसर्गाकडेही होवू लागले आहे.

तुमची प्रगती तपासा :

१) आधुनिक काळातील स्थलांतराची माहिती द्या.

❖❖❖❖

५

भारतातील लोकसंख्या

घटक संरचना :

५.० उद्दिष्टे
५.१ प्रस्तावना - आदिवासींचे वितरण
५.२ आदिवासींची वैशिष्टे
५.३ भारतीय आदिवासी
५.४ भारतीय आदिवासीची वैशिष्टे
५.५ भारतीय आदिवासीच्या समस्या
५.६ राज्यानुसार महत्त्वाचे आदिवासी गट
५.७ भिल्ल
५.८ नागा
५.९ गौड
५.१० भारत-धर्मावर आधारित लोकसंख्येचे वितरण
५.११ लोकसंख्येची व्यावसायिक रचना
५.१२ लोकसंख्येची वयोगटानुसार रचना
५.१३ भारताचे लोकसंख्या धोरण

५.० उद्दिष्टे

- भारतातील आदिवासींबद्दल माहिती घेणे.
- भारतीय लोकसंख्येची धर्म, व्यवसाय व वयोगटानुसार रचना लक्षात घेणे.
- भारताचे लोकसंख्या धोरण अभ्यासणे.

५.१ प्रस्तावना - आदिवासी समाजाचे वितरण

अनुसुचित जमाती -

"भारतीय राज्यघटनेच्या कलम ३४२ एक अनुसार राष्ट्रपतींनी घोषित केलेल्या जमातींना अनुसुचित जमाती असे म्हणतात."

"एकाकी डोंगरावर, जंगलात राहणारे व ज्यांना आधुनिक संस्वृती व जीवनाचा परिचय होवू शकला नाही. अशा लोकांना गिरीजन किंवा आदिवासी असे म्हणतात."

"जगातील जमाती आदिवासी जगभर २६० दशलक्षापेक्षा जास्त मूळ रहिवासी किंवा आदिवासी जमीती राहतात. १९०१ मधील आकडेवारीनुसार जगातील ७० देशात मिळून जागतिक लोकसंख्येच्या ४ टक्के इतकी आदिवासी जमातीची लोकसंख्या आहे. यापैकी बऱ्याच देशात हे मूळ रहिवासी अथवा आदिम जमाती आज अल्पसंख्यांक ठरल्या आहेत. ब्राझील, स्विडन सारख्या देशात मूळ रहिवाशांचे प्रमाण ०.८% भारतात ७.५% तर ग्रीनलँड मध्ये ९०%, पेरू मध्ये ४०% बोलीविया मध्ये ६६% एवढे आहे. आदिवासी जमातीची सर्वात जास्त संख्या आशिया खंडात आढळते. जगातील वेगवेगळ्या भागात पुढील आदिम जमाती आढळतात. पिग्मी, एस्किमो, किरगीज, मसाई तर भारतात भिल्ल, नागा इ. आदिम जमाती आढळतात.

आदिवासी समाज म्हणजे सामाजिक नीतीनियमांनी एकत्रित बांधला गेलेला लोकांचा समूह ज्याची समान भाषा आहे आणि सांस्वृतिक परंपराही समान आहे. आदिवासी ही संकल्पना सामाजिक किंवा सांस्वृतिक वैशिष्ट्यांमुळे जीवशास्त्रीय किंवा वांशिक वैशिष्ट्यांपेक्षा महत्वाची आहे. अनेक आदिवासी जमातींमध्ये तांत्रिक विकास हा तमी प्रमाणात झालेला आहे तसेच त्यांचे दरडोई उत्पादनही कमी असते.

५.२ आदिवासींची सर्वसाधारण वैशिष्ट्ये

१) वनस्पतींची लागवड करणे हा मुख्य धंदा अनेक आदिवासींचा असतो.

२) पशुपालन हा त्यांच्या शेती प्रकारातील मुख्य भाग असतो.

३) आदिवासी जमातींची ठराविक अशी आर्थिक वैशिष्ट्ये असतात. उदा. वनस्पतींची लागवड करणे, पशुपालन, शिकार इ.

४) आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आदिवासी लोक करत नाहीत जरी ही साधने उपलब्ध असली तरीही त्यांची उत्पादक क्षमता मर्यादित आहे.

५) जर त्यांच्याकडे एखादे उत्पादन जास्त असेल तर वस्तूंची देवाणघेवाण आणि त्यांचे पुन:वितरण हे त्यांचे अतिरिक्त उत्पादन संपवण्याचे मार्ग आहेत.

६) आदिवासी लोक हे आधुनिक राजकीय संघटनांशी स्पर्धा करु शकत नाही.

७) आदिवासी समुहातील लोकांची भाषा व संस्वृती समान असली तरी ते एकाच समुहामध्ये नसतात.

८) आदिवासी लोक हे तंत्रज्ञानामुळे प्रगत समाजातील लोकांपुढे टिवू शकत नसल्याने ते अंतर्गत /दुर्गम भागात अपुऱ्या सेवासुविधा असणाऱ्या पर्यावरणीय भागाकडे स्थलांतरीत होतात.

९) आदिवासी लोकांच्या अलगदपणामुळे उर्वरीत देशातील लोकांच्या सांस्वृतिक आणि तांत्रिक घटकांमध्ये भिन्नता वाढली आहे. उदा. भारतातील आदिवासी लोक हे डोंगरात व जंगल भागांमध्ये वेंद्रित झाले आहेत. तर ऑस्ट्रेलियातील मूळचे लोक हे उत्तर भागांकडे स्थलांतरीत झाले.

५.३ भारतीय आदिवासी

भारतामध्ये जवळजवळ ६८ दशलक्ष लोक हे आदिवासी जमातीचे असून शेकडा आदिम जमाती प्रमाणे त्यांच्या धार्मिक कल्पना परिभाषा, जीवनशैली, भिन्न आहेत. परंतु त्यांच्यामध्ये एक गोष्ट समान आहे ती म्हणजे त्यांना संघटित अशा प्रमुख धर्माच्या प्रभावाखाली रहावे लागते. त्यातील एक तणाव आंतरराष्ट्रीय पातळीवरील आहे. म्हणजेच बाहेरील मिशनरी लोक आदिवासी भागांमध्ये काम करता आणि त्यांचे ख्रिश्चन धर्मामध्ये परीवर्तन करतात. राष्ट्रीय पातळीवरील राजकीय व आर्थिकदृष्टया त्यांची एकात्मता टिकावी म्हणून इतर समूहांबरोबर जेव्हा संबंध राहण्यासाठी प्रयत्न वेले जातात तेव्हा जास्त ताण-तणाव निर्माण होतात. सर्वसाधारणपणे ज्या आदिवासी जमाती ह्या भौगोलिकदृष्टया अगदी एकाकी भागांमध्ये म्हणजेच वाळवंट, डोंगराळ भाग आणि जंगलामध्ये राहतात किंवा बेटांवर राहतात, आपल्या पारंपारिक संस्वृत्ती आणि धार्मिक गोष्टी वर्षानुवर्षे टिकवू शकतात. ज्या आदिवासी जमाती शिकार आणि वनसंकलनाऐवजी शेतीकडे वळू लागतात तेव्हा कनिष्ठ मजूर काम करणाऱ्या आदिवासींची प्राचीन धार्मिक रुपे नष्ट होवू लागतात आणि तेथे हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन विंवा बौध धर्मीय लोकांकडून आपल्या परंपरा शिकवल्या जातात.

५.४ भारतीय आदीवासींची वैशिष्टये -

१) आदिवासी जमात एका विशिष्ट अशा दुर्गम व अलिप्त भूप्रदेशात वस्ती करुन राहते.

२) आदिवासी क्षेत्र इतर प्रगत समाजापासून दूर विंवा अलिप्त असते.

३) आदिवासी समाजातील गट लहाल लहान असून ते शक्यतो नातेसंबंधावर आधारीत असतात.

४) आदिवासी जमातीत अंतर्विवाह पध्दतीस प्राधान्य असते.

५) प्रत्येक आदिवासी जमातीची स्वतंत्र अशी नियमावली ठरलेली असून त्या आधारावर न्यायनिवाडे वेले जाता व ते सर्वांना बंधनकारक राहतात.

६) प्रत्येक आदिवासी जमातीची सेवतंत्र बोलीभाषा असते.

७) आदिवासी जमातींची धर्म, जात त्यांच्यापुरतीच मर्यादीत असते.

८) आदिवासींचे जीवन संपूर्णतः निसर्गावरच अवलंबून असल्याने त्यांच्या धर्मात निसर्गपूजेला विशेष महत्व दिलेले असते.

९) आदिवासी जमातीचे लोक बुवाबाजी, जादूटोणा यासारख्या बाबींना महत्व देतात.

१०) आदिवासी समाजात पारंपारीकतेला महत्व असून अशा परंपरांचे जतन एका पिढीकडून पुढच्या पिढीकडे होत रहाते.

११) आदिवासी लोक स्वतःच्या कला, परंपरा, संस्वृत्ती जोपासण्याचा विशेष प्रयत्न करतात.

१२) आदिवासींच्या कामकाजाची पध्दत सामुदायीक असते.

१३) आदिवासींची सर्वच कामे प्राथमिक स्वरुपाची असतात.

१४) आदिवासी समाज बाह्य संपर्कापासून अलिप्त असल्याने स्वयंकेंद्रीत असतात.

१५) आदिवासी लोक एकमेकांच्या सुखदुःखात एकोप्याने सहभागी होतात.

तुमची प्रगती तपासा :

१) भारतीय आदिवासीची वैशिष्टे सांगा.

_____

_____

_____

_____

_____

५.५ भारतीय आदिवासींच्या समस्या

१) आदिवासींमध्ये अशिक्षितांचे प्रमाण जास्त आढळते.

२) आदिवासींच्या क्षेत्रात उपलब्ध पायाभूत सुविधांचा अभाव आढळतो. उदा. शुध्द पाणी, आरोग्य सुविधा, वाहतूक दळणवळणांच्या सोयी इ.

३) आदिवासींना जीवन जगण्यासाठी निश्चित उत्पन्नाचे साधन नसल्याने त्यांचा राहणीमानाचा दर्जा कमी असतो.

४) आदिवासींमध्ये दारिद्र्याचे प्रमाण जास्त आढळते.

५) आदिवासी रहात असलेल्या क्षेत्रातील जमीन त्यांच्या स्वमालकीची नसते किंबहुना तशी नोंद सरकार दप्तरीही आढळत नाही.

६) आदिवासी समाज मर्यादीत व दुर्बल असल्याने अन्य सबल घटकांकडून सतत अन्याय केला जातो.

७) आदिवासी क्षेत्र दुर्गम असल्याने विकासामध्ये अडसर ठरतात.

८) आदिवासी समाजाल सतत नैसर्गिक संकटांना सामोरे जावे लागते.

९) आदिवासी समाज नववैचारीक प्रवाहामध्ये सामील होण्यास सहजासहजी तयार होत नाहीत.

१०) आदिवासी भाग दुर्गम असल्याने बऱ्याचवेळा विकासयोजना त्यांच्यापर्यंत पोहचतच नाहीत.

तुमची प्रगती तपासा :

१) भारतीय आदिवासींच्या समस्या सांगा.

५.६ राज्यानुसार महत्वाचे आदिवासी गट

- आंध्र प्रदेश : चेंचू, कंडा-रेडीस, खौंड
- तामिळनाडू : काडर, कमीखेर, कोटा, करुम्बस, तोंडा
- कर्नाटक : कातीयन, काडर, कामीखेर, काटा, तोडा
- मध्यप्रदेश : भिल्ल, गोंड, कोल, कोरकू, बैगा
- झारखंडः संभाल, हो, मूंडा, ओरान, चेंद
- गुजरात : कोली
- अरुणाचल प्रदेश : अका, ढफला, मिश्मी, अबेर, कामाटी
- आसाम : चकमा, हमर, कूशी कचाणी, लालूंग, भिकीर
- हिमाचल प्रदेश : गुज्जर, गड्डी, किनारा
- मणिपुर : अंगामी, सेमा, मिझो
- मेघालय : खासी, कुकी, लाखेर
- मिझोराम : खासी, कूलकी, गारो, हमर

- नागालँण्ड: भुतिया, लेपचा
- ओरिसा : बैगा, बिरहूर, कोल, मुंडा
- राजस्थान : भिल्ल, मिना, गोरासा
- उत्तर प्रदेश : जौनसरी, थारु
- अंदमान-निकोबार : निकोबारी, जावर, ऐन्जीस, सँटीनलेसी, शाम्पेनस्
- दादर-नदर हवेली : दुबला, कौखा, वासी, नाइकडा, धोडिआ

तुमची प्रगती तपासा :

१) भारताच्या विविध राज्यांतील आदिवासींबद्दल माहिती द्या.

५.७ भिल्ल

संथाल व गौड यांच्या नंतर भिल्ल हा वन्य जमातीतील तिसरा मोठा लोकसमुह आहे. देशात भिल्लांचे एकत्रिकरण महाराष्ट्र, गुजरात, मध्यप्रदेश व राजस्थान या चार राज्यात झालेले आहे. गुजरात राज्यातील पंचमहाल, बडोदरा महाराष्ट्रात औरंगाबाद, अहमदनगर, धुळे, जळगांव, नाशिक तर मध्यप्रदेश मध्ये धार, साहुआ, खरगील, रतलाम तसेच राजस्थानमधील बान्सवाडा, भिलवाडा, चितोडगड, उदयपुर, कोटा या जिल्ह्यात भिल्ल आदिवासी समुह आढळतात. भिल्लाचे स्थलमानाने कोटियबाल व लंगोटिया असे दोन प्रकार आहेत. गुजरात व राजस्थानमध्ये किटीयावाल तर मध्यप्रदेश छत्तीसगड व महाराष्ट्रा दूसरा कोरियाबाल तर मध्यप्रदेश छत्तीसगड व महाराष्ट्रात लंगोटिया जमातीचे लोक आढळतात. भिल्लांची भिल्ली ही भाषा असून ती शेजारच्या महत्त्वाच्या आर्यभाषेच्या प्रवाहाखाली आली आहे. भिल्ल लोकांची शारिरीक ठेवण निरनिराळ्या भागात वेगवेगळी दिसून येते. गुजराती भिल्ल हे ठेंगणे, रूबाबदार व चपळ असतात. खाण देशातील भिल्ल हे मध्यम उंचीचे रूंद नाकाचे, गालाची हाडे वर आलेले असतात. हे लोक चपळ व काटक असतात. तर राजस्थानातील भिल्ल हे उजळ रंगाचे, स्त्रिया ठेंगण्या व बांधेसुद असतात. प्रदेशानुरूप यांचे पेहराव दिसून येतात. धनुष्य व बाण, तलवार, खंजिर, फास, बंदुकी इत्यादीचा वापर शिकारीसाठी केला जातो.

वनउत्पादन, वनसंकलन, पशुपालन, शिकार, शेती हे उद्योग केले जातात. गावाच्या मुखियला वसाऊ असे म्हणतात. हे लोक अंधश्रध्दाळू असतात.

५.८ नागा

ईशान्य भारतातील ही एक प्रमुख जमात आहे. तिच्या अनेक लहान मोठ्या उपजमाती आहेत. त्यापैकी अंगामी नागा, कुबई, कोण्याक नागा, चंग, फोग, लोथा, संगथम, सेवानागा इत्यादी प्रसिध्द आहेत. नागालँड आसाम मॅनमार यांच्या सीमेकडील डोंगराळ भागात व जंगली प्रदेशात या विखुरलेल्या आहेत. कोईमा, मोकोकचुंग या भागात त्यांची दाट वस्ती आहेत. नागा लोक हे मुळ मंगोलाईट वंशाचे असून ईशान्य भारतातील हजारो वर्षाच्या वास्तव्यामुळे त्यांचा वंश इंडोमंगोलाईट या नावाने ओळखला जातो. प्रत्येक नागा जमातीची भाषा वेगळी असून ती तिबेटी व ब्रह्मी या भाषांच्या मिश्रणातून निर्माण झालेली आहे. नागा लोक हे देखणे उंच सुदृढ गव्हाळी वर्णाचे असतात. त्याचे कपाळ रूंद, डोळ घारे व दृष्टी भेदक स्वरुपाची असते. काही लोक लहान बांध्याचे, काळे सावळे बसके नाक असलेले व बारीक डोळे असलेले असतात. शिकार, मासेमारी व पुशपालन, बांबूपासुन विविध वस्तू बनविणे हे व्यवसाय करतात. नागा लोगांची कुटुंबपध्दती पितृसत्ताक असून पंचायत सभा, लोककला, समाज व्यवस्था, धर्म व जादुटोणा इत्यादी मानणारे असतात.

५.९ गौंड

गौंड ही द्रविड वंशीय प्रमुख जमात असून भारतातील जंगलात राहणाऱ्या जमातीत ही अग्रगण्य समजली जाते. या जमातीची वस्ती प्रामुख्याने गोदावरी, विंध्य पर्वत या ठिकाणी आढळते. अर्धे अधिक गौंड जमातीतील लोक तोंडी भाषा बोलतात. भारतातील आदिवासी जमातीपैकी गौण सर्वात सुसंस्कृत व प्रगत समाज समजला जातो. यांचे वास्तव्य प्रामुख्याने मध्यप्रदेश, छत्तीसगड, उडिसा, महाराष्ट्र, तेलंगणा किंवा आंध्रप्रदेशात आढळते. महाराष्ट्रामध्ये ही जमात विदर्भ व मराठवाड्यातील नांदेड जिल्ह्यात आढळते. महाराष्ट्रातील चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यात राजगौण, माडिया, गैता, धरुआ, गौण, गोवारी या पोटजाती आहेत. तर मध्यप्रदेश, छत्तीसगडमध्ये बस्तर माडिया, डोंगरी माडिया शुंग माडिया, माडिया गौंड या जाती व पोटजाती आढळतात. तर आंध्रप्रदेशातील गंजम व विशाखापट्टणम या ठिकाणी सावरा पुरुष व केवळ या गौडांच्या उपजाती आढळतात. गौण जमात ही प्रगत समाज म्हणून ओळखली जाते. शिकार करणे, अन्नसंकलन अल्प प्रमाणात, पशुपालन, लघुउद्योग इत्यादी व्यवसाय करतात.

तुमची प्रगती तपासा :

१) टीप द्या. १) भिल्ल २) नागा ३) गौंड

५.१० भारत - धर्मावर आधारीत लोकसंख्येचे वितरण

एवूण लोकसंख्येपैकी भारतातील ८२ % पेक्षा जास्त लोकसंख्या हिंदू आहे. ते भारतातील विविध राज्यांमध्ये राहतात. संख्येच्या दृष्टीने मुस्लीम धर्मीय लोक दुसऱ्या क्रमांकावर असून एवूण लोकसंख्येपैकीजम्मू काश्मीरसह त्यांचे प्रमाण १२.१२ % तर ख्रिश्चन २.९४ % शिख १.९४% आहेत.

हिंदू : देशातील विविध राज्यांची तुलना केल्यास एवूण लोकसंख्येपैकी हिंदू लोकांचे प्रमाण हिमाचल प्रदेशामध्ये सर्वात जास्त म्हणजे ९५.९ % तर मिझोराममध्ये सर्वात कमी ५% आहे.

मुस्लीम : मुस्लीम लोकांचे सर्वात जास्त प्रमाण हे उत्तर प्रदेशामध्ये (२४.१ दशलक्ष) असून त्याखालोखाल पं.बंगाल (१६.१ दशलक्ष) आणि बिहारमध्ये (१२.८ दशलक्ष) आहे.

एवूण लोकसंख्येची मुस्लीम लोकांच्या आकडेवारीची तुलना केल्यास मिझोराममध्ये ती ०.६% व जम्मू कश्मिरमध्ये ६८.३% च्या दरम्यान आहे.

ख्रिश्चन: ख्रिश्चन लोकांचे सर्वात जास्त प्रमाण हे केरळमध्ये असून ते ५.६ दशलक्ष किंवा एवूण लोकसंख्येपैकी १८.६% आहे.

शिख : देशातील एवूण १६.३ दशलक्ष शिख लोकांपैकी १२.८ दशलक्ष (७८.५%) इतके शीख एकट्या पंजाबमध्ये असून उरलेले लोक शेजारी राज्यांमध्ये राहतात. उत्तरांचलमधील तराई प्रदेश आणि दिल्लीमध्येही शीख राहतात.

देशातील एकूण लोकसंख्येपैकी ७९% बौध्द लोक हे एकटचा महाराष्ट्रातच राहतात. तर बौध्दधर्मीय लोक जम्मू काश्मीरमधील लडाख क्षेत्र, हिमाचल प्रदेश आणि सिक्कीममध्ये राहतात.

जैन धर्मीय लोकांचे सर्वात जास्त प्रमाण हे महाराष्ट्रामध्ये (०.९५दशलक्ष) किंवा एकूण लोकसंख्येपैकी २८.८% इतके असून त्यानंतर राजस्थान, गुजरात आणि मध्यप्रदेशाचा क्रमांक लागतो.

धार्मिक रचना	लोकसंख्या	टक्केवारी
हिंदू	८२७५७८८६८	८०.५
मुस्लीम	१३८१८८२४०	१३.४
ख्रिश्चन	२४०८००१६	२.३
शिख	१९२१५७३०	१.९
बौध्द	७९५५२०७	०.८
जैन	४२२५९५३	०.४
इतर धर्मीय व पारशी	६६३९६२६	०.६
धर्म न मानणारे	७२७५८८	०.१
एकूण	१०२८६१०३२८	१००.००

तुमची प्रगती तपासा :

१) भारतातील विविध धर्माच्या लोकांबद्दल माहिती द्या.

५.११ लोकसंख्येची व्यावसायिक रचना

लोकसंख्येच्या व्यावसायिक रचनेच्या अभ्यासामुळे देशातील आर्थिक कामात गुंतलेल्या लोकांची माहिती उपलब्ध होते. या रचनेवरुनच तर देशाच्या आर्थिक विकासाची स्पष्ट कल्पना येते. तसेच देशाच्या प्रगतीसाठी कोणत्या प्रकारचे नियोजन करावे लागेल यासंबंधी निर्णय घेणे सुलभ जाते. व्यवसायातील विविधता ही त्या प्रदेशातील प्रगतीची दर्शक असते. विकसीत

राष्ट्रात तृतीय क्षेणीच्या व्यवसायात गुंतलेल्या लोकांची संख्या जास्त आढळते तर अविकसीत राष्ट्रात प्राथमिक व्यवसायात गुंतलेले लोक जास्त असतात. देशाच्या आर्थिक विकासाबरोबरच लोकसंख्येच्या व्यवसायानुसार होणाऱ्या विभागणीतही बदल होत असतात. मूलतः आर्थिक व्यवसायांची विभागणी प्राथमिक व्यवसाय, द्वितीय व्यवसाय, तृतीय व्यवसाय व चतुर्थ श्रेणीचे व्यवसाय अशा विभागात केलेली आहे. प्राथमिक व्यवसाय हे पूर्णतः निसर्गावर अवलंबून असलेले व्यवसाय आहेत. द्वितीय श्रेणीच्या व्यवसायांमध्ये प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांचा समावेश होतो. तृतीय श्रेणीचे व्यवसाय सेवांच्या स्वरुपातील असतात व चतुर्थ श्रेणीच्या व्यवसायांची निर्मिती ही अलिकडच्या काळातील आहे. ज्यामध्ये बौध्दिक व तत्सम व्यवसायांचा समावेश होतो. जगात विविध प्रकारचे व्यवसाय चालतात. देशादेशात या व्यवसायांची संख्या, प्रकार यामध्ये भिन्नता आढळते. संयुक्त राष्ट्रसंघाने व्यवसायांचे पुढील प्रकार स्विकारलेले आहेत.

१) शेती, मासेमारी, वनांवर आधारीत व्यवसाय

२) खाणकाम

३) वस्तूनिर्मिती उद्योग

४) वीज, गॅस, पाणी व सेवा

५) बांधकाम व्यवसाय

६) व्यापार

७) वाहतूक व दळणवळण

८) विविध सेवा

९) इतर सेवा

भारतात १९७१ च्या जनगणनेनुसार पुढील प्रकारचे वर्गीकरण स्विकारलेले आहे.

१) शेती कामगार

२) वृक्षी कामगार

३) पशुपालन, वनीकरण, मासेमारी, शिकार, वृक्षारोपण, बागायती, संबंधित व्यवसाय

४) खाणकाम

५) वस्तुनिर्माण, प्रक्रिया, सेवा

६) गृहउद्योग

७) गृहउद्योगाव्यतिरीक्त उद्योग

८) बांधकाम

९) व्यापार व वाणिज्य

१०) वाहतूक

११) इतर सेवा

१९८१ च्या जनगणननुसार भारतात कामगारांचे वर्गीकरण ४ विभागात केले गेले.

१) शेतकरी
२) शेती कामगार
३) गृहउद्योगातील कामगार
४) इतर कामगार

२००१ च्या जनगणनेनुसार भारतात ५१.७ टक्के पुरुष आर्थिकदृष्टया लाभदायक व्यवसायात गुंतलेले होते तर स्त्रियांचे प्रमाण केवळ २५.६ टक्के एवढे होते. आर्थिक प्रक्रियेत गुंतलेल्या स्त्रियांचे प्रमाण भारतात नेहमीच कमी राहीलेले आहे. त्याची कारणे पुढीलप्रमाणे –

१) स्त्रियाबद्दलचा सततचा दुजाभाव

२) पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांचा शिक्षणाचा दर कमी

३) स्त्रियांसाठी योग्य असतील अशा व्यवसायांची संख्या कमी

४) निरक्षरतेमुळे स्त्रियांना व्यवसायात संधी कमी आणि पुरुषांबरोबर सततची स्पर्धा

भारतातील व्यावसायीक रचनेची महत्वाची वैशिष्टये पुढीलप्रमाणे -

१) मुख्य व्यवसाय वृषी

२) मागासलेली शेती

३) शेतीत कामगारांचे प्रमाण जास्त

४) उद्योगधंद्यांचा कमी विकास

५) उत्पादनातील असमतोल

६) कमी उत्पन्न

७) ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण जास्त

८) तृतीय श्रेणीच्या व्यवसायांचा कमी विकास

९) गेल्या शतकभरात व्यावसायीक रचनेत कोणताच लक्षणीय बदल आढळत नाही.

तुमची प्रगती तपासा :

१) लोकसंख्येची व्यावसायिक रचना स्पष्ट करा.

५.१२ लोकसंख्येची वयोगटानुसार रचना

लोकसंख्या रचनेच्या अभ्यासात वयोरचनेला अतिशय महत्व आहे. वयोरचनेच्या अभ्यासातून बालकांची संख्या, शाळेत जाणाऱ्या मुलांची संख्या, विवाहास योग्य मुलांची संख्या, श्रमशक्तीचे प्रमाण, अवलंबिता भार, कार्यकारी लोकसंख्या इ. बाबतची माहिती मिळते.

नियोजनासंदर्भात विविध प्रकारच्या योजना आखताना वयोरचनेचा अभ्यास करावा लागतो. पुढील कोष्टकात भारतातील लोकसंख्येची वयोमानानुसार विभागणी दाखवलेली आहे.

वर्ष	०-१४	१५-५९	६०+
१९५१	३८.४	५६.०	५.५
१९६१	४१.०	५३.३	५.६
१९७१	४२.०	५२.०	६.०
१९८१	३९.५	५४.०	६.५
१९९१	३७.५	५५.७	६.८
२००१	३५.४	५७.०	७.५
२०११	३०.९	६०.५	८.६

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, सन १९६१ व सन १९७१ मध्ये लोकसंख्येत असलेले ४१.० व ४२.० बालकांचे प्रमाण पुढील दशकात कमी होत जावून सन २०११ मध्ये ते ३०.९ एवढे कमी झालेले आहे. याचाच अर्थ जन्मदर काही प्रमाणात कमी झालेला आढळतो. याचे महत्वाचे कारण म्हणजे शिक्षणाचा वाढता प्रसार हे आहे. तसेच ६० + या वृध्दांच्या वयोगटात मात्र वाढ झालेली आहे. याचे कारण भारतीयांचे आयुर्मान वाढत आहे, आरोग्यविषयक जागृती निर्माण झालेली आहे, वैद्यकीय क्षेत्रात प्रगती होत आहे, असाध्य रोगांवर इलाज निर्माण होत आहेत, साथीचे रोग आटोक्यात येत आहेत. या सर्वांमुळे अवलंबित लोकसंख्येचे प्रमाण मात्र वाढत आहे.

लोकसंख्येतील १५-५९ हा अतिशय महत्वाचा वयोगट असतो. कारण हाच वयोगट कार्यक्षम असतो. याच वयोगटावर देशाची आर्थिक प्रगती अवलंबून असते. या वयोगटात अधिक लोकसंख्या असणे ही आर्थिक विकासाची संधी मानली जाते. आणि भारताच्या दृष्टीने ही संधी सध्या प्राप्त झालेली आहे. कारण सातत्याने या वयोगटातील संख्या वाढत आहे. भारतात शैक्षणिक पात्रता वाढली, सर्वांना रोजगार मिळाला जर भारत झपाट्याने प्रगतीच्या दिशेने घोडदौड करेल.

तुमची प्रगती तपासा :

१) भारतातील लोकसंख्येची वयोगटानुसार रचना स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

_____

५.१३ भारताचे लोकसंख्या धोरण

भारत देशाचा लोकसंख्येच्या बाबतीत जगात दुसरा क्रमांक लागतो. भारत पारतंत्र्यातून मुक्त होईपर्यंत येथे स्वतंत्र असे लोकसंख्या नियंत्रण धोरण नव्हते. स्वातंत्र्यानंतर देशात लोकसंख्या वाढीचा वेग प्रचंड वाढला. त्यातून अनेक समस्यांची निर्मिती होवू लागली. त्यानंतर देश विकासाच्या पंचवार्षिक योजनांच्या काळात मात्र लोकसंख्या नियंत्रणासाठीच्या विविध उपाययोजनांचा समावेश करण्यात आला. पहिल्या पंचवार्षिक योजनेत कुटुंब नियोजन कार्यक्रमाचा स्वीकार करण्यात आला. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत कुटुंबनियोजनाचा प्रचार, त्याबाबतचे प्रशिक्षण व संशोधन इ. चा समावेश करण्यात आला. त्यानंतरच्या योजनांमध्ये हा कार्यक्रम अधिक लोकप्रिय करण्यासाठी तरतुदी करण्यात आल्या. नवीन कायदे करण्यात आले, लग्नाची वयोमर्यादा कायद्याने निश्चित करण्यात आली, बालविवाहांवर बंधने आणली, कुटुंबनियोजनाच्या साधनांबाबत अधिक संशोधनाला गती देण्यात आली, कुटुंबनियोजनाचा कार्यक्रम शासकीय स्तरावर राबवित असतानाच लोकसहभागासाठी जागृती निर्माण करण्यात आली. इतकेच नाही तर आता असे धोरण राबविले आहे की, भारतीय नागरीकाला कोणतीही निवडणूक लढवायची असल्यास त्या व्यक्तीला दोन पेक्षा अधिक अपत्ये असू नयेत. अलिकडच्या काळात विकसीत होत असलेल्या प्रसारमाध्यमांचा परिणाम लोकसंख्या नियंत्रणाचे धोरण राबविताना निश्चितच उपयोगी ठरत आहे.

राष्ट्रीय लोकसंख्या धोरण २००० मध्ये कमी, मध्यम व दीर्घ मुदतीची धोरणे निश्चित केली आहेत.

१) **कमी मुदतीची धोरणे -** कुटुंबनियोजनाची साधने, आरोग्याच्या पायाभूत सुविधा, व्यक्तीगत आरोग्यविषयक गरजांची पूर्तता करणे व प्रजननक्षम वयोगटातील मुलांच्या आरोग्याच्या सेवा पुरविणे.

२) **मध्यम मुदतीची धोरणे -** सन २०१० पर्यंत एकूण जन्मदर शाली आणणे.

३) **दीर्घ मुदतीची धोरणे -** मातृत्व मर्त्यता व अभ्रक मर्त्यता दर खाली आणणे, मुलांना सर्व प्रकारच्या रोगप्रतिबंधक लसी देणे, संसर्गजन्य रोगांबाबत नियंत्रक उपाय योजणे, मुलीच्या विवाहाच्या वयाची मर्यादा वाढविणे, १४ वर्षापर्यंतच्या मुलांना प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करणे, जन्म-मृत्यू- विवाह नोंदणी बंधनकारक करणे, कुटुंबकल्याण कार्यक्रम अधिक लोकाभिमुख करणे. या सर्व उद्दीष्टांतर्गत सन २०४५ पर्यंत देशाची लोकसंख्या स्थिर राहण्यासाठी प्रयत्नशील राहणे.

तुमची प्रगती तपासा :

१) भारताच्या लोकसंख्या धोरणाबद्दल माहिती द्या.

_____

_____

_____

_____

_____

❖❖❖❖

६

आर्थिक भूगोलाचे स्वरप

घटक संरचना :

६.० उद्दिष्टे
६.१ प्रस्तावना
६.२ आर्थिक भूगोल - अर्थ व व्याख्या
६.३ आर्थिक भूगोलाचे स्वरुप
६.४ आर्थिक भूगोलाची व्याप्ती
६.५ आर्थिक भूगोलाचा इतर शास्त्रांशी संबंध
६.६ आर्थिक प्रदेश संकल्पना
६.७ आर्थिक भूगोलाचे महत्त्व

६.० उद्दिष्टे

- आर्थिक भूगोलाचा अर्थ, स्वरुप व व्याप्ती लक्षात घेणे.
- आर्थिक भूगोलाचा इतर शास्त्रांशी असलेला संबंध अभ्यासणे.
- आर्थिक प्रदेश संकल्पना समजून घेणे.
- आर्थिक भूगोलाचे महत्त्व लक्षात घेणे.

६.१ प्रस्तावना

पृथ्वीची उत्पती ही ४६० कोटी वर्षापुर्वी झाली असे मांडण्यात येते.या कालवधीत पृथ्वीवर भौगोलिक व जैविक स्थरावर मोठया प्रमाणात बदल घडून आले. मानवाचा उत्कांतीचा इतिहास हा जवळपास २०लक्ष वर्षाचा आहे व मानवाचा ज्ञात इतिहास हा १२,००० वर्षाचा आहे मानवाचा उत्कांतीचा इतिहास हा भौगोलिकदृष्टया छोटा कालखंड आहे.पृथ्वीवरील प्राकृतिक जैविक व आर्थिक व सांस्कृतिक घटकांचे अभिक्षेत्रिय वितरण जाणणे हे भूगोलाच्या अभ्यासात अत्यंत महत्वाचे आहे.पृथ्वीवरील हवामान, रचना, पाणी, वनस्पती यांचा परस्पर संबंध असून मानवाच्या आर्थिक व सामजिक क्रिया या घटकांशी जोडलेल्या आहेत. निसर्गामधील विविध घटकांमध्ये क्रिया, प्रक्रिया सतत चालु असतात व त्याचा परिणाम मानवाच्या आर्थिक व सांस्कृतिक घटकावर होतो. पृथ्वी व पृथ्वीशी निगडीत असलेल्या घटकांची माहिती मानवास जसजशी पोहचली तशी भौगोलिक शास्त्राच्या विकासात भर पडत गेली.

प्राचीन काळी भूगोलात फक्त नैसर्गिक किंवा भौगोलिक घटकाचे वितरण अभ्यासले जात असे. त्यानंतर भूगोल या विद्याशाखेचे क्षितीज विस्तारत राहिले. भूगोलाचा अभ्यास हा मुख्यत्वे प्राकृतिक भूगोल व मानवी भूगोल या दोन शाखांतच केला जातो.प्राकृतिक भूगोलात सर्वसाधारणपणे नैसर्गिक घटकांचा अभ्यास केला जातो.तर मानवी भूगोलात मानव व त्याचा पर्यावरणाशी असलेला आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक संबंध अधोरेखित केला जातो. आर्थिक भूगोल ही भूगोलाची प्रगत शाखा मानली जाते व आर्थिक भूगोलात मानवाच्या आर्थिक क्रियांचा अभ्यास केला जातो.

६.२ आर्थिक भूगोल - अर्थ व व्याख्या

आर्थिक भूगोल हा गतीमान व आंतरविद्याशाखीय विषय आहे.या विषयाचा शास्त्रशुध्द अभ्यास १९ व्या शतकाच्या मध्यावर सुरु झाला. जॉर्ज चिशेल्स या ब्रिटीश भूगोल तज्ञास आर्थिक भूगोलाचा जनक मानले जाते .त्याने हॅन्ड बुक ऑन कमर्शियल जॉग्रफी या इंग्रजी पुस्तकात आर्थिक भूगोलाचे विस्तृत विवेचन केले. आर्थिक भूगोलात दृष्टकोनातून मानवाचा आर्थिक क्रियाचा अभ्यास केला जातो .मानवाचे आर्थिक व्यवसाय व नैसर्गिक व सांस्कृतिक पर्यावरणावर अवलंबून असतात.पर्यावरणात क्षेत्रीय व काळानुसार भिन्नता असते. त्यामुळे मानवाच्या आर्थिक व्यवसायातही भिन्नता आढळते.आर्थिक भूगोल हा व्यापारी भूगोलापासून अलग केला व १८८२ मध्ये आर्थिक भूगोल ही संज्ञा सर्वप्रथम वापरली. जॉर्ज चिशोल्स यांच्या मते ”मानवाच्या आर्थिक क्रिया वस्तुचे उत्पादन, वितरण, उपयोग यांच्या क्षेत्रीय आकृतीबंधाचा शास्त्रीय अभ्यास म्हणजे आर्थिक भूगोल होय.

ब्रिटिश भूगोल तज्ञ – डडले स्टॅम्प –

“मानवाच्या उत्पादन क्षमता व व्यापारावर प्रभाव पाडणाऱ्या भौगोलिक व इतर घटकांचा विचार आर्थिक भूगोलात केला जातो.”

एल्सवर्थ हंटिंगटन –

“मानवी व्यवसाय, कार्यक्षमता, कला, धर्म, शासन, शिक्षण व संस्कृती यावर भौगोलिक परिस्थितीचा होणा-या परिणामाचा अभ्यास म्हणजे आर्थिक भूगोल होय.”

हार्टशॉर्न व अलेक्झांडर –

“पृथ्वीवरील विविध प्रदेशातील उत्पादन, व्यापार व सेवा यांचा सविस्तर अभ्यास म्हणजे आर्थिक भूगोल होय.”

“मानवी क्रियाप्रक्रियांवर परिणाम करणा-या भौगालिक, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक इ.घटकांच्या परस्पर संबंधाचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे आर्थिक भूगोल होय.“

तुमची प्रगती तपासा :

१) टीप द्या - आर्थिक भूगोलाची व्याख्या

६.३ आर्थिक भूगोलाचे स्वरुप

पृथ्वीवर साधन संपत्तीचे वितरण असमान आहे. मानवाचा विकास हा ख-या अर्थाने शेतीच्या विकासापासून सुरु झाला. भटके जीवन शेतीच्या शोधामुळे स्थिर झाले. अग्नीचा वापर, हत्यारे, पाळीव जनावरे, खनिजे यांच्या जोरावर मानवाची सांस्कृतिक व आर्थिक प्रगती वेगाने सुरु झाली होती. याबरोबरच साधन संपत्तीमुळे सत्ता संघर्ष ही सुरु झाले. साधन सामुग्रीच्या संदर्भात मानवाचे आर्थिक व्यवसायांचे अध्ययन म्हणजे आर्थिक भूगोलाचा अभ्यास करणे होय. शेती, मासेमारी, पशुपालन यासारखे व्यवसाय निसर्गावर अवलंबुन असतात. या सर्वाचे वितरण व उत्पादन भौगोलिक परिस्थितीवर अवलंबून असते. विविध आर्थिक व्यवसायांमुळे विविध प्रकारची साधन सामुग्री मिळते. मानवी श्रमातून उत्पन्न होणाऱ्या साधन सामुग्रीचा उपयोग हेच आर्थिक कार्याचे उददिष्टये असते. पृथ्वीवर मुख्य आठ नैसर्गिक हवामान प्रदेश आहेत. या वेगवेगळया हवामान प्रदेशांतील विविध मानवी संस्कृती, व्यवसाय व अन्न यातही बदल होत आहेत. मानवाच्या वाढत्या गरजा, नवीन शोध, तंत्रज्ञानातील बदल यामुळे कालमानानुसार मानवाच्या आर्थिक व्यसायाचा सर्वांगीण विकास अभ्यास नैसर्गिक, सामाजिक व सांस्कृतिक घटकाच्या अनुषंगाने करणे आर्थिक भूगोलाचे ध्येय मानले जाते.कोणत्याही प्रदेशाचा विकास हा त्या प्रदेशातील काही मुलभूत घटकांवर अवलंबून असतो. जमिन, पाणी, खनिजे, तंत्रज्ञान, कुशल कामगार, सरकारी धोरण इ. या मूलभुत धटकाचा अभ्यास करणे ही आर्थिक भूगोलातील नवीव संकल्पना समजली जाते. प्रदेशातील नैसर्गिक साधनसंपत्तीचे मूल्यमापन करणे, राष्ट्राचा आर्थिक विकास करणे राष्ट्राच्या विकासाची संरचना समजून घेणे आवश्यक असते. प्रदेशाचे किंवा राष्ट्राचे आर्थिक नियोजन व संरचना समजून घेण्यासाठी भौगोलिक घटकाचे विश्लेषण महत्त्वाचे मानले जाते. आर्थिक भूगोलाचा संबंध अनेक शास्त्राशी येतो. अर्थशास्त्र, लोकसंख्याशास्त्र जीवशास्त्र, अभियांत्रिकी व माहिती तंत्रज्ञान इ. शाखाच्या अभ्यासातून आर्थिक भूगोल समजून घेणे सोपे जाते. त्यामुळे आर्थिक भूगोलाचे स्वरुप आंतरविद्याशाखीय आहे.

तुमची प्रगती तपासा :

१) आर्थिक भूगोलाचे स्वरुप स्ष्ट करा.

६.४ आर्थिक भूगोलाची व्याप्ती

आर्थिक भूगोल स्थळ व काळानुसार गतिमान आहे. आर्थिक भूगोल ही मानवी भूगोलाची एक शाखा आहे. प्राचीन काळी आर्थिक भूगोलाची व्याप्ती ही मर्यादित होती.काळानुसार त्यात बदल होत गेले.वाढती लोकसंख्या अपुरी जमीन, नवीन शोध, वाढत्या गरजा, तंत्रज्ञानातील, बदल बदलती जीवनशैली यामुळे आर्थिक भूगोलाच्या दृष्टीकोनात आमूलाग्र बदल झाला. नैसर्गिक व सांस्कृतिक पर्यावरणात सतत परिवर्तन होत असते. या परिवर्तनाचा मानवाच्या जीवनावर परिणाम होत असतो.

त्यामुळे मानवाच्या आर्थिक कार्याचे क्षितिजही रुंदावले आहे. पृथ्वी मानवाचे घर असे समजून पर्यावरणाचा विचार केला जातो. मानवाच्या आर्थिक क्रिया पर्यावरणाशी संबंधित असतात व मानवी आर्थिक क्रियातूनच वस्तुंचे उत्पादन, विनियोग, उपयोग या क्रिया घडवून येतात. मानव निसर्गाशी संघर्ष करुन आपले जीवन सुसहय करण्याचा प्रयत्न करीत असतो नवनवीन शोधामुळे जास्त सुखसोयी उपलब्ध करीत असतो. वाढत्या लोकसंख्येबरोबरच नव्या तंत्रज्ञानाचाही विकास होत आहे.त्यामुळे मानवी संस्कृतीत वेगाने परिवर्तन होत आहे. नव्या तंत्रज्ञानामुळे आर्थिक व्यवसायाचे स्वरुपही बदलत आहे. हा बदल काळानुसार व प्रदेशानुसार वेगवेगळा असतो. त्यासाठी मानवी प्रयत्न महत्त्वाचे आहेत. त्यामुळे आर्थिक भूगोलाचे अभिक्षेत्र वाढले आहे. त्याचे स्वरुप बदलत असुन व्याप्तीही वाढत आहे. प्राचीन काळी निसर्ग हा मानवाच्या जीवनावर भारुन होता. मानवाच्या सर्व प्रक्रिया या निसर्गावर अवलंबुन होत्या. त्यात काळानुसार तंत्र ज्ञानामुळे बदल होत गेले व आर्थिक भूगोल हा विषय व्यापारी भूगोलात समाविष्ट होता. आंतरराष्ट्रीय व्यापार, खनीज ठिकाणांचा शोध, औद्योगिकीकरण, वाढते उत्पादन यामुळे आर्थिक भूगोलाला नवीन परिणिती मिळाली व त्याची ओळख एक स्वतंत्र विषय म्हणून झाली. १९२० नंतर ली फबवरे ब्लाचे यांनी शक्यता वादाची कल्पना मांडून विषयाची व्याप्ती आणखी वाढवली. मानवी प्रयत्नाने निसर्गावर मात करता येते. हा नवा विचार पुढे आला. औद्योगिकीकरणामुळे पक्या मालाला महत्व येवून व्यापार उदीम वाढीला लागला. स्थलांतर, शहरीकरण वेगाने होवू लागले. उद्योग व व्यापारात काही मोजक्या देशांची एकधिकारी शाही जाऊन वैश्विक उदारता व जागतिकीकरणाचे पडघम वाजले. शीतयुध्दानंतर आर्थिक भूगोलाचे स्वरुप बदलत जावून त्याची व्याप्ती विशाल झाली.

तुमची प्रगती तपासा :

१) टीप द्या - आर्थिक भूगोलाची व्याप्ती.

_____

_____

_____

_____

_____

६.५ आर्थिक भूगोलाचा इतर शास्त्राशी संबंध

आर्थिक भूगोल ही मानवी भूगोलाची एक महत्त्वपूर्ण शाखा आहे.पर्यावरणातील साधन संपत्तीचा उपयोग करुन मानव विविध आर्थिक क्रिया करीत असतो.व त्यामधून विविध आर्थिक उत्पादने निर्माण होतात. कृषी बाजारपेठ, उत्पादने, उद्योगधद्यांचे स्थानिकीकरण, नगररचना नगराचा विकास, नगर वाहतूक व त्याचा आकृतीबंध इ.चे भौगोलिक दृष्टीने अध्ययन केले जाते.

मानवी भूगोल व आर्थिक भूगोल –

कोणत्याही देशाच्या विकासात नैसर्गिक पर्यावरणाचा फार मोठा सहभाग असतो. प्राकृतिक रचना व तिची वैशिष्टये आणि त्या देशातील लोक यांच्यावरुन कोणत्याही देशाची आर्थिक कुवत आजमावत येते.नैसर्गिक साधनसंपत्तीचा उपयोग करुन मानवाने निरनिराळे व्यवसाय करायला सुरुवात केली.कृषी, पशुपालन, खाणकाम,परिवहन, व्यापार इ.आर्थिक क्रियांचा अभ्यास आर्थिक भूगोलात केला जातो. त्यामुळे आर्थिक भूगोल व मानवी भूगोलाचा घनिष्ट संबंध आहे.

१) राजकीय भूगोल व आर्थिक भूगोल –

राजकीय भूगोल म्हणजे राजकीय क्षेत्राचा अभ्यास होय.प्रदेशातील राजकीय स्थिती व साधन संपत्ती यांच्यातील संबंधाचा अभ्यास केला जातो.राजकीय भूगोलात भूपृष्ठाची निरनिराळया राजकीय भागात विभागणी केली जाते.या अभ्यासात प्रत्येक भागाच्या राजकीय विचारसरणीचा व धोरणाचा त्या देशाच्या आर्थिक प्रगतीवर होणा-या परिणामांचा विचार केला जातो.

२) औद्योगिक भूगोल व आर्थिक भूगोल –

औद्योगिक भूगोलात विविध उद्योगधंदे, त्यांचे वितरण, केंद्रीकरण, विकेंद्रीकरण अभ्यासले जाते. औद्योगिक भूगोल या अभ्यासाची फार मोठी मदत होते. औद्योगिकीकरणामुळे एखाद्या प्रदेशाचा आर्थिक विकास कसा होतो व किती प्रमाणात होतो.हे अवलंबुन असते. उत्पादन, वितरण या आर्थिक क्रिया औद्योगिकीकरणात फार महत्वाच्या आहेत.

३) लोकसंख्या भूगोल व आर्थिक भूगोल –

लोकसंख्या भूगोल म्हणजे लोकसंख्येचे प्रादेशिक विश्लेषण होय.लोकसंख्या हा पृथ्वीवरील सर्वात महत्त्वाचा घटक आहे. विविध प्रदेशातील लोकसंख्या वाढ,घनता,स्थलांतर राहणीमानाचा दर्जा लोकसंख्येची आर्थिक रचना इ. घटकांचे आर्थिक क्रिया व उत्पादन या दृष्टीने अध्ययन केले जाते.आर्थिक क्रिया व उत्पादन यावरुन त्या प्रदेशातील लोकसंख्या शास्त्रीय घटकात मोठे बदल होताात.जास्त लोकसंख्येमुळे काही वेळा आर्थिक विकास होतो तर काही वेळा जास्त लोकसंख्या ही विकासाला अडचण ठरते. लोकसंख्या शास्त्रीय घटक व आर्थिक घटक यांचा परस्पर संबंध असतो. त्यामुळेच या दोन शाखांचा संबंध महत्वाचा आहे.



४) भूगर्भशास्त्र व आर्थिक भूगोल –

आर्थिक भूगोलाचे भुगर्भ शास्त्राशी जवळचे नाते आहे. खनिजांचे अस्तित्व, जमिनीचा सुपीकपणा इ. गोष्टी भूस्तर घटकांच्या क्रिया प्रतिक्रियांवर अवलंबून असतात. अग्निजन्य खडकात सामान्यपणे धातुमय खनिजे मिळतात. तर काही भूस्तरामध्ये वेगवेगळी खनिजे व धातु मिळतात. त्यामुळे त्या प्रदेशात रोजगार व प्रक्रिया उद्योग वाढतात.अशा त-हेने भूगर्भशास्त्र आर्थिक भूगोलाच्या अभ्यासात नेहमी उपयोगी ठरते.

५) प्राकृतिक भूगोल व आर्थिक भूगोल –

वारे, महासागरीय प्रवाह इ. संदर्भ प्राकृतिक भूगोलात येतात. वाऱ्यांमुळे पाऊस पडतो व पावसाच्या प्रमाणावर कृषीजन्य पिके अवलंबून असतात.तर महासागरीय प्रवाहांचा प्रभाव मासेमारी व्यवसायावर पडतो.याचप्रमाणे प्राकृतिक भूगोलाच्या अन्य घटकांवर मानवाच्या आर्थिक व्यवहारांचा प्रभाव पडतो.

६) गणितशास्त्र व आर्थिक भूगोल -

संख्याशास्त्र भूगोलात (गणित शास्त्रात) पृथ्वीची जडणघडण तिची गती अक्षांश, रेखांश स्थानिक वेळ इ. घटकाचा समावेश होतो. या सर्व प्राकृतिक घटकाचा परिणाम त्या त्या प्रदेशातील मानवी आर्थिक क्रियांवर होतो.

७) हवामान शास्त्र व आर्थिक भूगोल –

हवामान या घटकाचा सर्वात अधिक प्रभाव मावनी जीवनावर होतो.अन्न,वस्त्र व निवारा या गरजा हवामानावर अवलंबून असतात. हवामानावर मानवी कार्यक्षमता व आर्थिक क्रिया अवलंबून असतात. मानवी व्यवसायही हवामानावर अवलंबून असतात.अशा विविध आर्थिक घटकांवर हवामनाचा परिणाम होतो.त्यामुळेच या दोन्ही शाखातील संबंध महत्वाचे आहेत.

तुमची प्रगती तपासा :

१) आर्थिक भूगोलाचा इतर शास्त्रांशी असणारा संबंध स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

_____

६.६ आर्थिक प्रदेश संकल्पना

आर्थिक प्रदेश हा विभाग आहे जेथे विशिष्ट प्रकाराचा व्यवसाय प्रशासकीय किंवा भौगोलिक सीमांवर आधारीत चालतो.या सीमा एकतर राज्यांच्या सीमांमध्ये येतात किंवा आंतरराष्ट्रीय सीमांमध्ये येतात किंवा नैसर्गिक भौगोलिक हद्दीत असतात. अशा आर्थिक प्रदेशातून इतर प्रदेशांना सेवा पुरविल्या जातात.काहीवेळा आर्थिक प्रदेश हे प्रादेशिक आर्थिक क्रियांच्या विश्लेषणासाठी भोगोलिक प्रमाण असतात.

आर्थिक विभाग वेगवेगळया प्रकारचे आहेत. लहान ,मोठे,नागरी आणि आंतरराष्ट्रीय इ. काही भूगोलतज्ञांनी समान आर्थिक वैशिष्टये आढळणा-या प्रदेशांना आर्थिक विभाग म्हटलेले आहे.उदा.उत्तर अमेरिकेतील व्योमिंग आणि मोन्टाना च्या भागात पशुपालन हा महत्वाचा आर्थिक आहे. याचे उत्पन्न व्योमिंग मोन्टाना राज्यांच्या सीमांपलीकडेही जाते. हा सरळसरळ आर्थिक विभाग आहे. ज्या भागातून पैसा येतो, वापरला जातो आणि तो केवळ राजकीय आणि भौगोलिक सीमांनी सिमीत नाही.

काही विभाग खूप मोठे व विस्तृत आहेत. कानसास चा गव्हाचा पट्टा, दक्षिण टेक्सास मधील लिंबूवर्गीय फळ उत्पादन प्रदेश किंवा कॅलिफॉर्नियाचा सिंचन विभाग ही सर्व आर्थिक विभागाची उदाहरणे आहेत.

जगात १० आंतरराष्ट्रीय आर्थिक विभाग मानले जातात.त्यातील महत्वाचे विभाग म्हणजे- उत्तर आणि लॅटीन अमेरिका,पूर्व व पश्चिम युरोप,जपान,आशिया इ. पश्चिम जपानमधील कनसाई विभाग खूप महत्वाचा आर्थिक विभाग आहे. भारतातील दक्षिण भारत, पश्चिम भारत,पूर्व भारत,मध्य भारत,ईशान्य भारत,मध्य गंगा मैदान आणि उत्तरीय भारत हे भारतातील काही महत्त्वाचे अर्थिक विभाग आहेत.

आर्थिक विभाग ही संकल्पना प्रादेशिक नियोजनासाठी अत्यंत महत्वाची आहे. थोडक्यात आर्थिक विभाग त्यातील आर्थिक क्रियांवरुन व तेथील साधन संपत्तीवरुन ओळखता येतात.त्यावरुन आपल्याला त्या प्रदेशातील लोकांविषयी,साधन संपत्ती विषयी तसेच आर्थिक रचनेची माहिती मिळते आर्थिक विभागामुळे प्रदेशातील गरिबी, भूकबळी स्थलांतर, अविकसीतपण, भूकबळी यांची माहिती मिळते. प्रत्येक आर्थिक विभाग हा सामाजिक –आर्थिक निर्देशक असतो.

तुमची प्रगती तपासा :

१) आर्थिक प्रदेशाची संकल्पना स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

_____

६.७ आर्थिक भूगोलाचे महत्व

आर्थिक भूगोलाचे महत्व हे कोणत्याही देशाच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचे मानले जाते. कृषी, व्यापार उद्योग अशा सर्वच क्षेत्रात आर्थिक भूगोलाचे महत्व आहे.हे महत्व पुढीलप्रमाणे -

१. बदलत्या कृषी व्यवस्थेत बाजारपेठेनुसार उत्पादनांची निर्मिती कशी करावी,उत्पादनांची वाहतूक व विक्री यांचा ताळमेळ घालण्यासाठी आर्थिक भूगोलाची भूमिका महत्वाची आहे.

२. उद्योगाच्या स्थानिकीकरणासाठीच्या आवश्यक घटकांचे ज्ञान उपलब्ध करण्याची माहिती उत्पादनांची मागणी-पुरवठा तसेच भांडवलाची उभारणी कशी करायची यासंबंधीचे ज्ञान आर्थिक भूगोलाच्या अभ्यासातून मिळते.

३. व्यापाराच्या विकासासाठी व्यापाराची उभारणी करण्यापासूनच त्याचा ताळेबंध आखणे महत्वाचे असते. या सर्वांसाठी आर्थिक भूगोलाच्या अभ्यासाची मदत होते.

४. देशाला आर्थिकदृष्टया सबल करण्यासाठी व्यापाराचे धोरण, आयात निर्यात धोरण करविषयक धोरण करण्यासाठी आर्थिक भूगोलाच्या अभ्यासाचे महत्व आहे.

५. कोणत्याही देशाची आर्थिक प्रगती ही त्या देशात उपलब्ध असलेल्या नैसर्गिक साधन संपत्तीवर अवलंबून असते.अशा खनिज संपत्तीची माहिती करुन धेण्यासाठी आर्थिक भूगोलाचा अभ्यास महत्वाचा ठरतो.

तुमची प्रगती तपासा :

१) आर्थिक भूगोलाचे महत्त्व सांगा.

_____

_____

_____

_____

_____

❖❖❖❖

७

आर्थिक व्यवसाय

घटक संरचना :

७.० उद्दिष्टे
७.१ प्रस्तावना
७.२ व्याख्या
७.३ आर्थिक व्यवसायावर परिणाम करणारे घटक
७.४ आर्थिक व्यवसायांचे प्रकार
७.५ आर्थिक विभाग
७.६ प्राथमिक स्तरावरील व्यवसाय - शेती
७.७ प्राथमिक स्तरावरील व्यवसाय - वनउत्पादने व मासेमारी
७.८ खाणकाम

७.० उद्दिष्टे

- आर्थिक व्यवसायांवर परिणाम करणाऱ्या घटकांचा अभ्यास करणे.
- आर्थिक व्यवसायांचे प्रकार लक्षात घेणे.
- शेतीची माहिती घेणे.
- वनउत्पादनाची माहिती घेणे.
- खाणकामाचा अभ्यास करणे.

७.१ प्रस्तावना

आर्थिक भूगोलात मानव व पर्यावरण यांच्यातील सहसंबंधाचा अभ्यास केला जातो.मानव हा पर्यावरणाचा एक घटक आहे. मानवी जीवनाला लागणाऱ्या सर्व आवश्यक वस्तु या नैसर्गिक पर्यावरणातूनच मिळत असतात. अन्न, वस्त्र, निवारा या मूलभुत गोष्टी मानव निसर्गातूनच मिळवत असतो. मानवाच्या मूलभूत गरजा जसाजशा भागत गेल्या तसतसा मानव आपले जीवन आरामी व सुसहय करण्याकडे वळू लागला.त्यातूनच शेती संस्कृतीतून त्याचे जीवन स्थिर झाले व तो अर्थार्जनाकडे वळला.व पुढे खनिज संपत्ती व उद्योगधंदे यामुळे मानवाचा आर्थिक व्यवसाय काळानुसार वृध्दीगत झाला.मानवाने आपल्या बुध्दिकौशल्याच्या जोरावर कमी श्रमात अधिक अर्थार्जन करण्याच्या क्रिया शेधून काढल्या.

७.२ व्याख्या

व्हॉन रयिन व बेनस्टान –

मानवाने आपल्या आर्थिक सामाजिक व बौध्दीक गरजा पूर्ण करण्यासाठी केलेले प्रयत्न म्हणजे आर्थिक व्यवसाय होय.

७.३ आर्थिक व्यवसायावर परिणाम करणारे घटक

नैसर्गिक पर्यावरणात नैसर्गिक घटक असतात.तर सांस्कृतिक पर्यावरण मोठया प्रमाणात नैसर्गिक पर्यावरणावर अवलंबून असते. या दोन्ही पर्यावरणाचा मानवाच्या व्यवसायावर परिणाम होतो. मानवाचे आर्थिक व्यवसाय हे नैसर्गिक व सांस्कृतिक पर्यावरणावर अवलंबून असतात.

अ) नैसर्गिक घटक / प्राकृतिक घटक –

या घटकांमध्ये भौगोलिक स्थान, आकार व विस्तार, भूमी स्वरुपे भूस्तर रचना,हवामान,मृदा, नैसर्गिक, वनस्पती, प्राणी जीवन,जलाशये या घटकांचा समावेश होतो हे सर्व घटक मानवाच्या आर्थिक क्रियांवर /स्थानिकीकरणावर परिणाम करतात.

ब) आर्थिक घटक –

क) सामाजिक घटक /सांस्कृतिक घटक –

आर्थिक क्रियांच्या स्थनिकीकरणासाठी सामाजिक घटक महत्वपुर्ण असतात व प्रत्येक प्रदेशातील एक सामाजिक घटक आर्थिक विकासास मदत करत असतात. बऱ्याच वेळा सामाजिक घटक सुस्थितीत व चांगले असतात. त्या ठिकाणी आर्थिक क्रियांचा विकास झपाट्याने होत असतो.

ड) राजकीय घटक –

नैसर्गिक साधनसंपत्तीत वस्तु निर्माण उद्योग आणि उत्पादक वस्तुंच्या बाजारपेठा विशिष्ट अशा प्रदेशातच स्थानिक झालेला दिसतात.त्या प्रदेशामध्ये असणा-या राजकीय घटकांवर, आर्थिक क्रियांचे स्थानिकीकरण होत असते.शासकीय धोरणे शासन व प्रशासन व्यवस्था कायदे नियम सवलती या सगळ्यामुळे विशिष्ट प्रदेशात उद्योगाचे स्थानिकीकरण होते. ज्या प्रदेशात राजकीय घटक प्रतिकूल असतात.अशा ठिकाणी आर्थिक क्रिया विकसीत होत नाही. वेगवेगळया प्रकारचे राजकीय घटक स्थानिकीकरणावर परिणाम करतात.

इ) शासकीय घटक –

शासकीय घटकांचाही परिणाम आर्थिक क्रियांच्या स्थानिकी करणावर होतो. शासनामार्फत नवीन आर्थिक क्रियांना परवानगी व अर्थसहाय केले जाते. औद्योगीकीकरण, स्वस्त दरात जमिनीची उपलब्धता, कर सवलती, संरक्षण यामुळे या प्रदेशात आर्थिक क्रिया विकसीत होतात. या शासकीय धोरणांचे आर्थिक क्रियावर अनुकूल व प्रतिकूल परिणाम होतात.

काही वेळा प्रादेशिक विकासातील असमतोल दूर करण्यासाठी काही आर्थिक क्रियांना प्रोत्साहन देणे व काहींना प्रतिबंध करणे अशा प्रकारचे धोरण सरकारला अवलंबावे लागते.

७.४ आर्थिक व्यवसायांचे प्रकार-

प्राथमिक - "मानवाचे जे व्यवसाय पूर्णपणे निसर्गावर अवलंबून असतात त्यांना प्राथमिक स्थरावरील व्यवसाय असे म्हणतात "

द्वितीय - ज्या व्यवसायांमध्ये प्राथमिक स्थरावरील उत्पादित मालावर प्रक्रिया करुन त्यांचे पक्या मालात रुपांतर केले जाते.त्यास द्वितीय व्यवसाय असे म्हणतात.

तृतीय - जे व्यवसाय समाजास विविध प्रकारच्या सेवा पुरवितात त्यांना तृतीय श्रेणीतील व्यवसाय असे म्हणतात.

भौगोलिक, आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक घटकांचा विविध आर्थिक क्रियांवरील प्रभाव

प्राथमिक आर्थिक क्रिया मुख्यत: पर्यावरणावर अवलंबून असतात. शेतीसाठी जमिनीची सुपिकता, पर्जन्य, तापमान आवश्यक असते. सर्वच प्रकारच्या शेती प्रकारांवर तापमान या घटकाचा प्रभाव असतो. भूरचनेचा परिणामही शेतीवर होतो.जमिनीची उच्च उत्पादन क्षमता हा घटक देखील शेतीवर परिणाम करणारा आहे. व्यापार, शेती प्रकारांमध्ये वाहतूक या आर्थिक घटकाची भूमिका महत्वपूर्ण ठरते. शेतीसाठी सुध्दा मोठया प्रमाणावर मजुरांची आवश्यकता असते. स्थांलतरीत शेती, स्थायी शेती, मिश्र शेती, बागायती शेती अशा शेतीच्या विविध प्रकारांवर प्रादेशिक समाजिक घटकांचा प्रभाव पडतो.सांस्कृतिक घटकांचा प्रभाव जेव्हा शेतीतील उत्पादने तयार होत असतात त्यावेळी होतो.

द्वितीय आर्थिक क्रियांसाठी मजुरांची उपलब्धता, जमीन, बाजारपेठ, वाहतूकीचा विकास या घटकांचा प्रभाव पडतो. बाजारपेठेची उपलब्धता हा घटक उद्योगधंद्याची उभारणी करण्यापुर्वीच विचारात घेतला जातो.नाशवंत व अवजड स्वरुपाच्या उद्योगातील मालाची ने-आण लांब अंतरापर्यंत करणे योग्य नसते.त्यासाठी असे उद्योग बाजारपेठेजवळ उभारावे लागतात. रस्ते, रेल्वे आणि जल वाहतूक या तिन्ही वाहतूकींच्या प्रकारची महत्वाची भूमिका आहे. म्हणूनच रस्ते, रेल्वे, जल वाहतूकीची जंक्शन ही औद्यगिक क्रियांची केंद्रे बनतात. सध्या वाहतूकीचा प्रकार, वाहतूक दर अणि वाहतूकीची शासकीय धोरणे यांचा औद्योगिक केंद्रांवर परिणाम होतो. इतर घटकांमधे कोळसा, नैसर्गिक वायू ,खनिज तेल आणि जलविद्युत हे उर्जेचे स्वस्त स्त्रोत आहेत. उद्योगाच्या उभारणीपासून ते उद्योगधंद्याच्या वाढीपर्यंत भांडवल हा तर प्रमुखच घटक आहे. उद्योगाच्या स्थानांवर भांडवल व त्यावरील सवलती या सर्व आर्थिक घटकांचा प्रभाव पडतोच. तृतीय आर्थिक क्रियांसाठी वाहतूक अत्यंत महत्वाचा घटक आहे. प्राकृतिक घटकांमधील भूउतार, मृदा आणि हवामान हे वाहतूकीच्या मार्गांसाठी प्रमुख आधार आहेत. आर्थिक घटकांमधील भांडवल आणि बाजारपेठा, बँका आणि विमा हे घटक महत्वाचे आहेत. सामाजिक आणि सांस्कृतिक घटकांमध्ये शासनाची भूमिका, लोकांच्या परंपरा हे घटक सुध्दा महत्वाचे आहेत. काही प्रमाणात सांस्कृतिक व्यक्तीमहत्वाचा परिणामही आर्थिक क्रियांच्या

स्थानांवर होतो. धार्मिकता हा घटक आर्थिक नसलेला घटक आहे परंतु त्याचाही काही अंशी परिणाम होतो. राजकीय घटकाची भूमिका सुध्दा तितकीच महत्वाची आहे.

तुमची प्रगती तपासा :

१) आर्थिक व्यवसायांवर परिणाम करणारे विविध घटक सांगा.

७.५ आर्थिक विभाग – प्राथमिक, द्वितीय आणि तृतीय

आर्थिक क्रिया उत्पादन, वितरण, मालाची खरेदी विक्री आणि सेवा यांच्याशी संबंधित आहेत. आर्थिक क्रियांना व्यवसाय असेही म्हणतात. काही आर्थिक भूगोलतज्ञांनी आर्थिक क्रियांची किंवा व्यवसायांची विभागणी ३ विभागात केली आहे.१) धंदा २) व्यवसाय ३) नोकरी काही देशात यांची विभागणी ५ विभागात केलेली आहे.

१) प्राथमिक विभाग
२) द्वितीय विभाग
३) तृतीय विभाग
४) चतुर्थ विभाग
५) पंचम विभाग

प्राथमिक विभागातील उत्पादने निसर्गाशी संबंधित असतात. यामध्ये शेती, मासेमारी, शिकार वनांवर आधारित व्यवसाय, खाणकाम इ. व्यवसायांचा समावेश होतो. विकसीत देशामध्ये प्राथमिक व्यवसायात गुंतलेल्या लोकांची संख्या खूप कमी आहे.

द्वितीय विभागातील आर्थिक क्रियांमध्ये कच्चा मालावर प्रक्रिया केली जाते. यामध्ये कापड उद्योग, रासायनिक उद्योग, रासायनिक उद्योग, जहात बांधणी उद्योग यांचा समावेश होतो.

तृतीय आर्थिक विभाग हा सेवा देणारा उद्योग आहे.या विभागातून सर्वसामान्य लोकांना सेवा पुरविल्या जातात. व्यापार सेवांमध्ये मालाची किंरकोळ व घाऊक विक्री, वाहतूक अणि वितरण तसेच मनोरंजन, कार्यालयीन सेवा, प्रसारमाध्यमे, पर्यटन, बँका व विमा, आरोग्य सेवा इ. सेवांचा समावेश होतो. विकसीत देशांमध्ये या क्रियांमध्ये गुंतलेल्या लोकांची संख्या सतत वाढत आहे.

चतुर्थ आर्थिक विभाग बौध्दिक क्रियांशी संबंधित आहे. ज्यामध्ये सांस्कृतिक उपक्रम, वाचनालय, वैज्ञनिक संशोधन, शिक्षण यांचा समावेश होतो.

पाचव्या आर्थिक विभागात समाजातील उच्च पातळीवरील निर्णय घेणाऱ्यांचा समावेश होतो काहीजण या विभागाला चतुर्थ आर्थिक विभागाचीच शाखा मानतात. यामध्ये सरकारी अधिकारी, विद्यापीठे, प्रसारमाध्यमे यांचा समावेश होतो.

तुमची प्रगती तपासा :

१) विविध प्रकारच्या आर्थिक विभागाची माहिती द्या.

७.६ प्राथमिक स्तरावरील व्यवसाय

"मानवाचे जे व्यवसाय पूर्णपणे निसर्गावर अवलंबून असतात त्यांना प्राथमिक स्तरांवरील व्यवसाय असे म्हणतात."

निसर्गातून निर्माण होणाऱ्या वस्तूंचा उपयोग व उपभोग मानव घेत असतो. या व्यवसायात शिकार वनउत्पादन, मासेमारी, खाणकाम, पशुपालन यांचा समावेश होतो. हे व्यवसाय प्रत्यक्ष निसर्गाच्या अनुकुलतेवर व प्रतिकुलतेवर अवलंबून असतात. ज्या देशातील जास्तीत जास्त लोकसंख्या प्राथमिक व्यवसायांत गुंतलेली असते.त्या देशाचा आर्थिक विकास मंद गतीने होतो.कारण प्राथमिक व्यवसायातून मिळणारे आर्थिक लाभ तुलनेने कमी व उशीराने मिळतात. विकसनशील व कमी विकसित देशांमध्ये प्राथमिक व्यवसायांचे प्रमाण हे नेहमीच जास्त असते. तर विकसित देशात प्राथमिक व्यवसायाचे प्रमाण हे कमी असते.प्राथमिक व्यवसाय हे मूलभूत आर्थिक क्रिया मानल्या जातात. कारण प्राथमिक व्यवसायांवरच द्वितीय, तृतीय श्रेणीचे व्यवसाय अवलंबून असतात.

प्रमुख प्राथमिक व्यवसाय –

१) शेती –

हजारो वर्षांपासून मानव शेती करीत आलेला आहे. शेती हा जगातील सर्वात मोठा व महत्वाचा व्यवसाय आहे.जगातील ६०% लोक शेती हाच आर्थिक व्यवसाय करतात. यामुळे लोकांचा अन्न व प्राण्यांना चारा उपलब्ध होतो. शेती उत्पादनांवर अनेक प्रक्रिया उद्योग चालतात. तसेच पशुपालनही मोठया प्रमाणात करता येते. शेतीच्या शोधाच्या अगोदर मानव हा कंदमुळे फळे तसेच शिकार करुन आपले जीवन जगत होता. शेतीमुळे मानव हा स्थिर झाला. आधुनिक संस्कृतीचा आधार शेती हाच आहे. शेती ही भूररचना मृदा, हवामान, पाणी इ.

भौगालिक घटकावर अवलंबून असते. शेती ही उदरनिर्वाह व व्यापारी या दोन तत्वावर केली जाते.शास्त्रीय तंत्रज्ञानाच्या विकासामुळे शेतीमध्ये दिवसेंदिवस सुधारणा होत आहे.

शेतीचे प्रकार –

देशातील नैसर्गिक पर्यावरण, लोकसंख्या, लोकांच्या गरजा यानुसार शेतीच्या स्वरुपात भिन्नता आढळते.विविध कसोटयांच्या आधारे कृषी प्रकार अभ्यासले जातात.

१) **क्षेत्रावर आधारित -** अ) सघन / सखोल शेती ब) विस्तृत शेती

२) **आर्द्रता व पाणीपुरवठा यावर आधारित :** अ) आर्द्र शेती ब) कोरवाहू शेती क) जलसिंचन शेती

३) **पीक प्रारुपांवर आधारित :** अ) एक पीक पध्दती शेती ब)दुबार पीक शेती क) बहुपीक पध्दती शेती

४) **उत्पादन प्रमाण व बाजारपेठेवर आधारित -** अ) प्राथमिक उदरनिर्वाह शेती ब) स्थलांतरीत शेती क) प्राथमिक स्थायी शेती ड) व्यापारी शेती इ) मळा शेती

५) **प्रादेशिक आधारानुसार –** अ) मान्सून शेती ब) भूमध्य सागरी शेती क) मिश्र शेती ड) उष्ण कटिबंधीय मळा शेती.

शेतीचे महत्व

मानवाचा प्राचीन व मूलभूत व्यवसाय कृषी हा आज जगातील अनेक देशांच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. जगातील ५०% तर विकसनशील देशातील ६५ % लोकसंख्या कृषी व्यवसायावर अवलंबून आहे. अनेक देशांतील राष्ट्रीय उत्पादनात कृषी उत्पादनाचा मोठा वाटा आहे. अन्न, वस्त्र, निवारा या मुलभूत गरजा पुर्ण करण्याबरोबरच विविध प्रकारच्या उद्योगांना कृषी व्यवसायातून कच्या मालाचा पुरवठा होतो. विकसनशील देशांच्या विदेशी व्यापारात कृषी उत्पादनांचा सहभाग मोठा असतो.

तुमची प्रगती तपासा :

१) टीप द्या - शेती प्राथमिक व्यवसाय

_____

_____

_____

_____

_____

७.७ वन उत्पादने / वन संकलन

वन उत्पादन हा जगातील सर्वात प्राचीन व्यवसाय असून जगातील अधिक जमाती हा व्यवसाय करतात. अरण्यातील वनस्पतींची मुळे, कंदमुळे, फळे गोळा करणे हा जंगलातील

महत्वाचा व्यवसाय आहे. काळानुसार याचे प्रमाण कमी झालेले आहे तरी बऱ्याच प्रदेशात मध गोळा करणे, डिंक गोळा करणे त्याचबरोबर कागद निर्मितीसाठी लाकुडतोड करुन कागदी लगद्यापासून वस्तू, पेटया, कलाकुसरीच्या वस्तू, लाख हा कारखानदारीसाठी लागणारा कच्चा माल अरण्यातील वृक्षतोडीमुळे उपलब्ध होतो. समशितोष्ण कटिबंधात लाकुडतोड हा व्यवयाय व्यापारी तत्वावर केला जातो.

अ) कंदमुळे, फळे गोळा करणे

उष्ण प्रदेश - उष्ण कटिबंधात वेगवेगळया ठिकाणांमध्ये या आर्थिक क्रिया चालतात. ॲमेझॉनचे खोरे, ब्राझील, पेरु, इक्वेकेडोर आणि व्हेनेझुएला, उष्ण कटिबंधीय आफ्रिकेमधील काही पट्टे, ऑस्ट्रेलियामधील उत्तरकडील, न्यू गिनीचा अंतर्गत प्रदेश, अशियामधील म्यानमार, थायलंड, चीन आणि भारताचा दुर्गम प्रदेश इत्यादी.

ब) शिकार –

मानवाचा पहिला व्यवसाय शिकार आहे. सुरुवातीच्या काळात मानव उदरनिर्वाहासाठी कच्चे किंवा शिजवलेले मांस खात होता. शिकार हा मानवाचा प्राचीन व्यवसाय असून तो अप्रगत देशात आजही चालतो. विषुववृत्तीय अरण्यातील व ध्रुवीय प्रदेशातील लोक शिकार हा प्राथमिक स्वरुपातील व्यवसाय करतात. उपजिविकेचे साधन म्हणून शिकार करणे हे उत्तर अमेरिका, आफ्रिका, उत्तर आशिया, उत्तर ऑस्ट्रेलिया या देशातील आदिम जमाती मोठया प्रमाणावर करतात. सध्यस्थितीला प्राण्यांची शिकार करण्यास बंदी घालण्यात आली आहे.

वनांचे महत्व

वने पर्यावरणाच्या दृष्टीने महत्वाची आहेत. वनांमुळे पर्यावरणाचा समतोल राखला जातो.मानवासाठी नैसर्गिक ऑक्सिजनचा पुरवठा वनांमधूनच होतो.मध ,डिंक या घटकांची उपलब्धता आजही वनांमुळेच होते. त्याचबरोबर कागद निर्मितीसाठी लाकुडतोड करुन लगदा, पेटया तसेच खेळाच्या साहित्यासाठी लागणा-या लाकडाची उपलब्धता वनांपासून होते. लाख हा कारखानदारीसाठी लागणारा कच्चा माल अरण्यातील वृक्षतोडीमुळे उपलब्ध होतो. वनांमुळे जमिनीचा धूप रोखली जाते. पर्जन्याच्या प्रमाणावरही वनांचा परिणाम होतो.

ख) मासेमारी - सागरी किनारे, नद्या, सरोवर, तलाव या ठिकाणी मासेमारी हा व्यवसाय चालतो. विकसित देशात हा व्यवसाय आधुनिक पदतीने केला जातो. मासे हे किनाऱ्यावरील लोकांचे पुरक अन्न असल्यामूळे दाट लोकवस्तीच्या प्रदेशात मासेमारी व्यवसाय मोठया प्रमाणावर चालतो. पश्चिम युरोप, कॅनडा संयुक्त संस्थाने, पेरु, चिली, भारत, फिलिपाईन्स या देशात मासेमारी मोठया प्रमाणात होते. समशीतोष्ण कटिबंधीय प्रदेशात व्यापारी तत्वावर मासेमारी केली जाते.

मासेमारीचे महत्व –

मासेमारी हा प्राथमिक व्यवसाय फार पूर्वी पासून मानव करीत आला आहे. आज या व्यवसायाचे स्वरुप व्यापारी झाले आहे. जगात मोठया प्रमाणावर व्यापारी तत्वावर मासेमारी केली जाते. माशांचा अन्न म्हणून वापर केला जातो. माशांपासून उपयुक्त तेलाचे उत्पादन घेतले जाते. सौंदर्यप्रसाधनांमध्ये अशा तेलाचा वापर केला जातो. माशांपासून खताचीही निर्मिती केली जाते.

तुमची प्रगती तपासा :

१) टीप द्या

   १) वन उत्पादने

   २) मासेमारी

७.८ खाणकाम

विविध प्रकारचे धातू, अधातू, खनिजे खाणीतून काढल्यानंतर त्याच्यावर प्रक्रिया केली जाते. या उद्योग धंद्यामुळे खाणकाम या प्राथमिक व्यवसायात खूप महत्व आले. दगड, फर्शी, खडी यांच्याही खाणी बांधकाम क्षेत्रामुळे वाढत आहेत. पेट्रोलियम प्रदेशात नैसर्गिक वायू यांचा खाण जमिनीवर व समुद्र तळाशी खोदून त्यातून हे घटक मिळवले जातात. आखाती देशात व नैसर्गिक वायू यांच्या खाणी मोठया प्रमाणात आहेत त्यामुळे या देशाचा औद्योगिक विकास खाणकामावर अवलंबून आहे. म्हणून या व्यवसायाला विशेष महत्व प्राप्त झाले आहे.

खाणकामाचे महत्व

भूकवचातून खनिजे खोदून काढण्याच्या क्रियेला खाणकाम म्हणतात. मानवाची प्राथमिक अर्थिक क्रिया खाणकाम आहे.देशाचा औद्योगिक विकास खनिजांवर अवलंबून असतो,म्हणून खाणकामाला औद्योगिकीकरणाचा पाया असे संबोधले जाते.

जगात खनिजांचे वितरण असमान आहे.काही भागातच त्यांचे केंद्रीकरण झाले आहे.हल्ली जगातील प्रत्येक देशात खाणकाम व्यवसाय कमी-जास्त प्रमाणात चालतो.औद्योगिक क्रांतीनंतर खनिजांना अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले.धातुशास्त्राच्या विकासामुळे मानवाला खनिजांचे बहुविध उपयोग ज्ञात झाले.

खनिजांचे उपयोग पुढीलप्रमाणे :

१) लोहखनिजाचा उपयोग कृषी अवजारे, ट्रॅक्टर, विविध सुटे भाग, इमारती बांधकाम, रेल्वे डबे, विविध प्रकारच्या यंत्राचे सुटे भाग, भांडी तयार करणे.

२) मँगनीजचा वापर उच्च प्रतीचे पोलाद तयार करण्यासाठी होतो. जगातील ९० टक्के मँगनीज पोलादनिर्मितीसाठीच वापरले जाते. औषधे, रासायनिक द्रव्ये, प्लॉस्टिक, काचसामान, रंगनिर्मिती, शिशाची भांडी किंवा चिनी मातीची भांडी यांना रंग किंवा मुलामा तसेच दागिन्यांना डाग देणे.

३) बॉक्साईट या खनिजापासून ॲल्युमिनियम धातू मिळविला जातो. विजेच्या तारा, टेलिफोनच्या तारा, विमाने, जहाजे, मोटारीचे भाग, भांडी तयार करणे इ.

४) तांबे नेहमी मिश्र स्वरुपात व अल्प प्रमाणत मिळते. अनेक वेळा तांबे हा धातू सोने, चांदी, शिसे, सल्फर यांच्याबरोबर गौण स्वरुपात आढळतो. अतिशय बारीक तारा,पातळ पत्रे, संरक्षण साहित्यनिर्मिती उद्योग, स्वयंचलित वाहने, विद्युत उपकरणे, भांडी, दागिने इ. साठी याचा वापर केला जातो.

तुमची प्रगती तपासा :

१) टीप द्या - खाणकाम

_____

_____

_____

_____

_____

❖❖❖❖

८

उद्योगधंदे

घटक संरचना :

८.० उद्दिष्टे
८.१ प्रस्तावना
८.२ उद्योगधंदे प्रकार - आकारावरुन
८.३ उद्योगधंदे प्रकार - उत्पादनावरुन
८.४ उद्योगधंदे प्रकार - कच्च्या मालावरुन
८.५ उद्योगधंदे प्रकार - मालकीवरुन
८.६ उद्योगधंदे प्रकार - कच्चा माल शुद्ध - अशुद्ध प्रकार
८.७ वेबरचा सिद्धांत
८.८ वेबरचा सिद्धांतावरील टिका व त्याचे महत्त्व

८.० उद्दिष्टे

- उद्योगधंद्याचे विविध प्रकारे होणारे वर्गीकरण अभ्यासणे.
- वेबरचा सिद्धांत समजून घेणे.

८.१ प्रस्तावना

उद्योगधंद्याची सुरवात १७ व्या शतकापासून झाली.पहिली औद्योगिक क्रांती युरोपमध्ये झाली.त्यानंतर औद्योगिकरणाचा प्रसार संपूर्ण जगभर झाला.मानवाने नवनवीन यंत्रांचा व तंत्राचा शोध लावल्यामुळे उद्योगधद्यांना गती प्राप्त झाली आणि त्याचे स्वरुपही बदलत व विकसीत होत गेले.

८.२ उद्योगधंद्याचे प्रकार - आकारावरुन

प्राथमिक उत्पादनाचे रुपांतर अधिक उपयुक्त घटकांत करणे म्हणजे उद्योगधंदे होय. याचाच अर्थ कच्चा मालाचे रुपांतर उपभोग्य अशा पक्या मालात करणे म्हणजे उद्योगधंदे होय.

उद्योगधंदे ही सातत्याने चालणारी प्रक्रिया आहे. जगात उद्योगाचे अनेक प्रकार आहेत. त्यातील प्राचीन काळातील उद्योग खूप महत्वाचे आहेत. धातुउद्योग, कापडउद्योग, इत्यादी.

आधुनिक काळात उद्योगांचे स्वरुप बदलत गेले कच्चा माल,पक्का माल, त्याचे वजन, मूल्य व वापर यावरुन उद्योगाचे अनेक प्रकार पडतात.

१. उद्योगांच्या आकारावरुन वर्गाकरण : उद्योगातील भांडवल गुंतवणूक , कामगार संख्या आणि उत्पादनाच्या प्रमाणावरुन उद्योगांचे पुढील प्रकारे पडतात.

१) ग्रामद्योग / कुटिरोद्योग : कारागीर किंवा प्रशिक्षीत कामगार कुटुंबातील सदस्यांच्या मदतीने स्वतःच्या घरात किंवा प्रसंगी लहान जागेत स्थानिक कच्चा माल व साधी उपकरणे / साधने वापरुन वस्तूंची निर्मिती करतात,याला ग्रामोद्योग/ कुटीरोद्योग असे म्हणतात.

उत्पादनाचा घटक अति लहान असतो.उत्पादन कौशल्य एका पिढीतून दुस-या पिढीकडे हस्तांतरित होते.उत्पादनाला स्थानिक बाजारपेठ उपलब्ध असते.घरगुती स्वरुपात वस्तूंची निर्मिती कुंभार,सुतार,विणकर,लोहार करतात.आशिया व आफिकेत हा उद्योग महत्वाचा आहे.काही हस्तकला वस्तूंना विकसित देशात चांगलीच मागणी असते.

१) **लघु प्रमाणावरील उद्योगधंदे -** कच्चा माल स्थानिक क्षेत्रातून किंवा बाहेरुन उपलब्ध करुन यंत्राच्या सहय्याने छोटी उत्पादने निर्माण करतात, याला लघुप्रमाणावरील उद्योगधंदे असे म्हणतात. कुटीरोद्योगापेक्षा उद्योग मोठे असतात. व्यापारीवर्गामार्फत स्थानिक बाजारपेठ व इतरही उत्पादनाची विक्री केली जाते. अनेक विकसनशील देशात रोजगारनिर्मितीच्या दृष्टीने हे उद्योग महत्त्वाचे आहेत. भारत, चीन यांसारख्या देशात तयार कपडे, खेळणी, फर्निचर, खाद्यतेले आणि चामड्याच्या वस्तूंचे उत्पादन या उद्योगातून केले जाते.

२) **मोठया प्रमाणावरील उद्योगधंदे -** भरपूर भांडवल, गुंतवणुक,मोठी कामगार संख्या,विविध प्रकारची यंत्रसामुग्री असते आणि मोठ्या प्रमाणावर बाजारपेठेसाठी उत्पादने निर्माण होतात. याला मोठया प्रमाणावरील उद्योगधंदे असे म्हणतात.

उत्पादनाची गुणवता आणि त्याचे विशेषीकरण यावर भर देण्यात आलेला असतो. अनेक विभागांमार्फत व्यवस्थापन चालते. विविध ठिकाणांहून लागणारा कच्चा माल उपलब्ध केला जातो.

देशी, विदेशी बाजारपेठेत पक्का माल पाठविला जातो.यासाठी या उद्योगांना चांगल्या पायाभूत सुविधा विशेष करुन रस्ते, लोहमार्ग व जलमार्ग यांचे उत्तम जाळे, ऊर्जासाधनांचा विपुल पुरवठा आवश्यक असतो. उदा. लोह पोलाद उद्योग, पेट्रोकेमिकल्ससारखे अवजड उद्योगधंदे.

८.३ उत्पादन प्रदानावरुन वर्गाकरण

१) मूलभूत उद्योगधंदे : ज्या उद्योगांची उत्पादने इतर उद्योगात वापरली जातात, त्यांना मूलभूत उद्योगधंदे असे म्हणतात. लोह-पोलाद उद्योग हा मूलभूत उद्योग आहे, कारण पोलादाचा उपयोग अनेक उद्योगांत केला जातो. काही मूलभूत उद्योगात विविध प्रकारच्या यंत्रसामग्रीची निर्मिती केली जाते.

२) उपभोग वस्तूनिर्मिती उद्योगधंदे : उपभोगासाठी वापरल्या जाणाऱ्या वस्तूंची निर्मिती केली जाते. उदा. चहा, बेकरी उत्पादने, साबण, सौदर्यप्रसाधने दूरदर्शन संच इ.

८.४ उद्योगांच्या आदानावरुन वर्गाकरण :

उद्योगांमध्ये वापरल जाणाऱ्या कच्चा मालाच्या स्वरुपावरुन उद्योगांचे पुढील चार प्रकार पडतात.

१. कृषी उत्पन्नावर आधारित उद्योगधंदे : या उद्योगात कच्चा माल म्हणून कृषी उत्पादनांचा वापर केला जातो.यामध्ये सुती कापड उद्योग, साखर उद्योग, ताग उद्योग, तेल गिरण्या, चहा, कॉफी, रबर, तंबाखू प्रक्रिया उद्योग यांचा समावेश होतो.

२. वन उत्पादनावर आधरित उद्योगधंदे : वन उत्पादन हे कच्चा माल म्हणून वापरले जाते.कागद व लगदा उद्योग, आगपेटयांचे कारखाने, वनौषधे, खेळाचे साहित्य फर्निचरनिर्मिती उद्योग यांचा यात समावेश होतो.

३. खनिज उत्पादनावर आधारित उद्योगधंदे : विविध खनिजे कच्चा माल म्हणून वापरली जातात.धातूनिमिती उद्योगांचा यामध्ये समावेश होतो.या उद्योगांचे पुढील दोन उपप्रकार पडतात.

अ) लोहखनिज उद्योधंदे : उद्योगात लोहखनिजाचा उपयोग होतो. उदाहरणार्थ लोहपोलाद निर्मिती उद्योग

ब) अलोह उद्योगधंदे : उदाहरणार्थ तांबे, ॲल्युमिनिअम निर्मिती उद्योग.

४. रासायनिक उद्योगधंदे : उद्योगांत विविध रसायनांचा वापर केला जातो. पेट्रोकेमिकल्स , प्लॅस्टिकनिर्मिती, औषध निर्माण उद्योग ही याची उदाहरणे आहेत.

५. बांधकाम उद्योग : या उद्योगामध्ये बांधकामाशी निगडीत वस्तू तयार केल्या जातात. उदा. दरवाजे खिडक्यांच्या चौकटी, सिपोरेक्स बांधकाम विटा इ.

८.५ उद्योगांच्या मालकीवरुन वर्गीकरण :

उद्योगाची मालकी व व्यवस्थापन यावरुन उद्योगाचे पुढील प्रकार पडतात.

१) **शासकीय / सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग :** उद्योगाची मालकी व व्यवस्थापन शासनाकडे असते.शासन उद्योगाची स्थापना करते.व्यवस्थापन शासकीय यंत्रणेकडे असते.

२) **खासगी क्षेत्रातील उद्योग :** उद्योगाची मालकी व व्यवस्थापना खासगी किंवा एखाद्या महामंडळाकडे असते. भागीदारीमध्येसुध्दा असे उद्योग उभारले जातात. उदाहरणार्थ हिंदूस्थान लिव्हर, जनरल इलेक्ट्रिक हे बहुराष्ट्रीय महामंडळाचे उद्योग आहेत.

३) **संयुक्त विभाग :** उद्योगाची मालकी व व्यवस्थापन राज्य सरकार व खासगी क्षेत्र अशी संयुक्त असते.

८.६ कच्चा मालाच्या वजन घट प्रमाणावरुन

१) शुध्द मालावर आधारित - उद्योगात कच्चा व पक्का माल दोघांच्या वजनात जास्त फरक नसतो. उदा.कापड उद्योग, चर्म उद्योग

२) अशुध्द मालावर आधरित- यात कच्चा मालाचे पक्या मालात रुपांतरण होताना बरीच घट होते. उदा.लोह पोलाद उद्योग , ॲल्युमिनियम उद्योग, साखर उद्योग इ.

८.७ उद्योगाच्या स्थाननिश्चीतीवर वेबरचा सिध्दांत –

उद्योग हा आर्थिक विकासाचा पाया आहे.उद्योग उभारणासाठी अनेक घटक कारणीभुत असतात. त्या सर्व घटकांचा आर्थिक निकषावर ताळमेळ बसून उद्योगाचे स्थान निश्चित केले जाते.या सिध्दांतामध्ये अनेक अर्थशास्त्रज्ञानी विचारवंतांनी मांडलेले दोन दृष्टीकोन विचारात घ्यावे लागतात.

१. किमान खर्ची दृष्टीकोन
२. कमाल प्राप्ती दृष्टीकोन / बाजारक्षेत्र दृष्टीकोन

वेबरचा सिध्दांत-

उद्योगाच्या स्थानिकीकरणाचा सिध्दांत हा सर्वप्रथम जर्मन अर्थतज्ञ भूगोलतज्ञ, समाजशास्त्रज्ञ व विचारवंत आल्फ्रेड वेबर यांनी १९०६ मध्ये थिअरी ऑफ द लोकेशन ऑफ इंडस्ट्रीज या जर्मन पुस्तकात मांडला .या आधीही उद्योगाच्या स्थानाविषयी अनेक जर्मन विचारवंतांनी आपले विचार मांडले होते. परंतु ऑल्फ्रेड वेबरचा सिध्दांत हा सोपा व सर्वमान्य झाला सन १९२९ मध्ये वेबरच्या पुस्तकाचे इंग्रजीत भाषांतर होउन त्याला अनेकांकडून मान्यता मिळाली. वेबरचा किमान खर्ची दृष्टीकोन प्रमाणाकारी मानला जातो.

गृहीत तत्वे –

१. प्रदेश हा भौगोलिक दृष्टया तसेच राजकीय सांस्कृतिक व तांत्रीक दृष्ट्या एकसारखाच / एकजिनसी आहे.
२. कारखान्यातून एकच उत्पादन होत असून ते एकाच बाजारात विकले जाते.
३. कच्चा माल, ऊर्जा, व बाजारपेठ तीन वेगवेगळया ठिकाणी आहेत.
३. मजूर हे एकाच ठिकाणी भरपूर संख्येने आहेत.
५. वाहतूक मार्ग निश्चित नसून ते उद्योग कच्चा माल व बाजार पेठेला नजीकच्या मार्गाने जोडता येतात वेबरच्या मते उद्योगाच्या स्थान निश्चितीवर प्रामुख्याने पुढील तीन घटक परिणाम करतात.

१) वाहतूक खर्च
२) मजूर खर्च
३) समुहन शक्ती

१) वाहतूक खर्च -

वेबरने कच्चा माल व पक्या मालाच्या वाहतूक खर्चाला सर्वात जास्त महत्व दिले आहे. कच्च्या मालाच्या प्रदेशातून तो उद्योगापर्यंत वाहून आणण्यासाठी व तयार झालेला माल उद्योगापासून बाजार पेठेपर्यंत पोचविण्यासाठी वाहतूक मार्ग व वाहतूक मार्ग व वाहतूक साधनांची आवश्यकता असते. वेबरच्या मते ज्या ठिकाणी कमीत कमी खर्च होईल असे ठिकाण उद्योगासाठी निवडावे. खर्च विचारात घेण्यासाठी वेबरने कच्चा मालाचे तीन प्रकार पाडले

१. सर्वत्र आढळणारा कच्चा माल
२. निश्चित या ठिकाणी आढळणारा शुध्द कच्चा माल
३. निश्चित या ठिकाणी आढळणारा अशुध्द कच्चा माल

जर कच्चा माल शुध्द स्वरुपाचा असेल तर असा उद्योगधंदा, बाजारपेठे जवळ उभारावा कारण शुध्द कच्चा माल असल्याने पक्या मालात घट होत नाही.परिणामी उद्योग कोठेही उभारला तरी चालतो.

कच्चा माल	उद्योगाचे स्थान	बाजारपेठ

पण कच्चा माल अशुध्द व वजन घटणारा असेल तर असा उद्योग धंदा कच्चा मालाच्या परिसरात उभारावा कारण कच्चा मालाचा वाहतूक खर्च हा कमी करणे आवश्यक असते.

कच्चा माल	उद्योग स्थान	बाजारपेठ

२) मजुर खर्च -

वेबरच्या मते जेथे स्वस्त व मुबलक मजुर उपलब्ध आहेत. अशा ठिकाणी उद्योग उभारावा जर कच्चा मालाच्या वाहतूकीच्या खर्चापेक्षा मजुरांवरील खर्च जास्त असेल तर असे उद्योग स्वस्त मजुर असलेल्या प्रदेशात उभे करणे सोयीचे ठरते. अन्यथा इतर प्रदेशातून कुशल व अकुशल मजुर बोलवावे लागतात. यांच्यासाठी सोयी सुविधा उभाराव्या लागतात. या दोन ठिकाणी स्वस्त व भरपूर मजुर उपलब्ध असल्यामुळे या ठिकाणी उद्योग उभारल्यास मजुर खर्च वाचेल.

३) समूहन शक्ती –

अनेक उद्योग एकाच ठिकाणी एकत्रित झाल्यास त्याच्यातील उत्पादन प्रक्रिया व सेवा खर्च कमी होतो व वेळही वाचतो याच समूहन / संविहन प्रवृत्ती असे म्हणतात.

वाहतूक खर्च व मजुर खर्च शिवाय इतर अनेक घटक उद्योगांना आकर्षित करीत असतात. उदा. बँक व पतपेढया, विमा कंपन्या, शासकीय धोरण, सामाजिक परिस्थिती, तंत्रज्ञान यंत्रसामुग्री, पायाभूत सुविधा, परिक्षण संस्था, सुटे भाग, छोटे उद्योजक इ. या आवश्यक व मुलभूत गोष्टींचा खर्च उद्योगांना या समूहन प्रवृतीमुळे कमी होऊ शकतो व त्या उद्योगांचे एकमेकांना पुरक सहकार्य मिळू शकते.

वेबरचा सिध्दांतावरील टिका –

१. वेबरने ठरविलेली गृहीतके ही काल्पनिक व सैध्दांतिक असून ती वास्तववादी नाहीत.कारण सर्वत्र सुरचना नाही व वाहतूक खर्चाचे दर भिन्न असतात.

२. वेबरने वाहतूक खर्च व मजूर खर्च यांनाच जास्त महत्व दिले आहे.इतर महत्वाच्या घटकांना गौण स्थान दिले आहे.उदा.सरकारी धोरण, कररचना,सवलती,अनुदान,भांडवल,बँका इतर पायाभूत सुविधा.

३. वेबरने सिंध्दंतात कच्चा माल, ऊर्जासाधने व बाजारपेठ हे सारख्याच अंतरावर आहेत असे गृहीत धरले आहे.परंतु प्रत्यक्षात तसे नसते.

४. वाहतूक खर्च अंतरानुसार सारखा घेणार नाही कारण तो भुरचना, हवामान, वाहतूक प्रकार वाहतूकीचे दर यानुसार कमी जास्त होणार असतो.

५. वेबरने उदाहरणासाठी एकच उद्योग एकच उत्पादन व एकच बाजारपेठेचा विचार केला आहे. परंतु आधुनिक काळात एकाच वेळी अनेक प्रकारची साधने अनेक प्रकारची उत्पादने निर्माण झाली, तसेच जागतिक बाजारपेठेत अवलंबून राहण्याचे प्रमाण वाढल्यामुळे उद्योगांच्या स्थानावर परिणाम होतो.

६. वेबरने केवळ आर्थिक घटकांचा महत्व दिले व या संदर्भातील सामाजिक सांस्कृतिक ऐतिहासीक व राजकीय घटकाचा विचार केला नाही.याचा स्थल व काल सापेक्ष प्रभाव असतोच.

वेबरच्या सिध्दांताचे महत्व –

वेबरच्या सिंध्दांतावर टिका केली जात असली तरी त्याचा सिध्दांत आर्थिक भूगोलामध्ये व उद्योगाच्या स्थान निश्चिती संदर्भात अतिशय महत्वाचा आहे. कारण नवीन उद्योगधंदा नेमका कोठे सुरु करावा यात सर्वात प्रथम शास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास ऑल्फड वेबरनेच केला. याबाबतीत पूर्वी ढोबळमानाने स्थान निश्चित केले जाते. असे परंतु वेबर हा पहिला शास्त्रज्ञ आहे की ज्याने शास्त्रीय दृष्टया असा अभ्यास करुन उद्योगाच्या स्थाननिश्चीतीबाबत मार्गदर्शन केले. हा सिध्दांत १०० वर्ष जुना असल्यामुळे कालांतराने सामाजिक आर्थिक व तांत्रिक बदलामुळे सिध्दांताची तत्वे शंभर टक्के लागू असणे अशक्य आहे. इंधनाच्या वाढत्या किंमतीमुळे वाहतूक खर्च हा अजूनही तितकाच महत्वाचा परिणामकारक मुददा बनला आहे.त्यामुळे या सिध्दांतावर टिका झाली तरी त्याचे महत्व कमी होत नाही.

तुमची प्रगती तपासा :

१) वेबरचा सिद्धांत स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

_____

❖❖❖❖

९

वाहतूक, व्यापार व व्यापारी गट

घटक संरचना :

९.० उद्दिष्टे
९.१ प्रस्तावना
९.२ जमिनीवरील वाहतूक - रस्ते
९.३ लोहमार्ग वाहतूक
९.४ नळ वाहतूक
९.५ दोरी मार्ग
९.६ जलवाहतूक
९.७ विमान वाहतूक
९.८ वाहतूक दर संकल्पना
९.९ स्थलीय परस्पर संबंध
९.१० जागतिक व्यापार संघटना

९.० उद्दिष्टे

- विविध वाहतूक प्रकारांची माहिती घेणे.
- रस्ते, लोहमार्ग, नळ, दोरी मार्ग, जलवाहतूक व विमान वाहतूक यांची सखोल माहिती घेणे.
- स्थलीय परस्पर संबंध अभ्यासणे.
- जागतिक व्यापार संघटनांची माहिती घेणे.

९.१ प्रस्तावना

व्यक्ती किंवा वस्तू यांचे एका ठिकाणाहून दुस-या ठिकाणी स्थलांतर करणे म्हणजे वाहतूक होय.अगदी सुरवातीच्या काळात मानव स्वतःच ओझे वाहून नेत असे.नंतर एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी ओझे वाहण्यासाठी त्याने स्वतःजवळील प्राण्यांचा वापर सुरु केला ज्यामुळे त्याच्या श्रमात बचत होवू लागली.तरंगत्या लाकडावर स्वार होवून मानवाने जलवाहतूकीला सुरवात केली.कुशाग्र मानवाने चाकाचा शोध लावला आणि त्याची गती वाढली.हीच चाके त्याने हातगाडीला व प्राण्यांना जोडली व एकाचवेळी जास्त मालाची वाहतूक कमी श्रमात सुरु केली. आजही काही दुर्गम प्रदेशात मानव स्वतः किंवा प्राण्यांमार्फत वाहतूक

करतो. कालांतराने ऊर्जासाधनांचे व इंजिनांचे लागलेले शोध यामुळे मानव अधिक गतिमान झाला. रस्ते, रेल्वे मार्गावरील आधुनिक साधनांमुळे सर्वसामान्य मानवासाठी कमी वेळेत दूर अंतरावर जाणे शक्य झाले. भारक्षमता वाढली. हवाई वाहतूकीमुळे तर संपूर्ण जगच हाकेच्या अंतरावर येऊन पोचलेले आहे. प्रगतशील वाहतूक यंत्रणा हे देशाच्या अर्थिक विकासाचे निदर्शक मानले जाते.

वाहतूकीचे प्रकार : जगातील वाहतूकीच्या विविध प्रकारांचे पुढीलप्रमाणे वर्गीकरण केले जाते.
अ) जमिनीवरील वाहतूक : १) रस्ते मार्ग वाहतूक २) लोहमार्ग वाहतूक ३) खनिज तेल व नैसर्गिक वायू नळ वाहतूक
ब) जल वाहतूक १) अंतर्गत वाहतूक २) सागरी वाहतूक
क) विमान वाहतूक

९.२ जमिनीवरील वाहतूक / भूपृष्ठीय मार्ग

१) रस्ते मार्ग वाहतूक

रस्ते हे वाहतूकीचे सर्वात जुने माध्यम आहे. देशातला ग्रामीणातील ग्रामीण भाग रस्ते मार्गानेच जोडला गेलेला असतो. कमीत कमी अंतरासाठी रस्ते मार्गांचा वापर अधिक सोयीस्कर असतो. काही देशांत रस्त्यांचे जाळे खूप विकसीत झालेले आहे.

रस्ते वाहतूकीचे फायदे

१) **लवचीकता :** रस्ते वाहतूक सर्वात लवचीक असते.ग्राहकाच्या अगदी दारापर्यंत वाहतूक सेवा देता येते,आवश्यकतेनुसार साधने व मार्ग बदलता येतात.

२) **वेळेची बचत :** रेल्वे जहाजे याप्रमाणे मालाची चढ-उतार करण्यासाठी फारसा वेळ लागत नाही.

३) **कमी भांडवल गुंतवणुक :** रेल्वेच्या तुलनेने रस्ते बांधणीचा खर्च कमी येतो.रेल्वेपेक्षा स्थानकांचा ,खर्चदेखील कमी असतो.

४) **बहुउदेशीय वापर :** मालवाहतूक व प्रवासी वाहतूक अशी भिन्न क्षमतेची वाहने एकाच रस्त्यावरुन धावतात.

५) **अंतर :** कमी अंतरावरील वाहतूकीसाठी रस्ते अधिक उपयुक्त ठरतात.

६) **साधन विविधता :** वाहतूक साधनांची निवड करण्यास भरपूर वाव असतो.यामुळे खर्चाची व वेळेची बचत होते.

रस्ते वाहतूकीचे तोटे/मर्यादा –

1) **मर्यादित क्षमता :** मर्यादित माल किंवा प्रवासी यांची वाहतूक करता येते.वाहनांची क्षमता मर्यादित असते.

2) **वेळ व अंतर :** लांब पल्याच्या वाहतूकीसाठी रस्ते वाहतूक उपयुक्त ठरत नाही.

3) **वाहतूक खर्च :** रस्ते व वाहने यांच्या देखभालीशिवाय इंधन, जकात कर यावरील खर्चदेखील अपरिहार्य असतो.त्यामुळे वाहतूक खर्च वाढतो.

4) **वाहतूकीची स्पर्धा :** खाजगी वाहतूक व सरकारी वाहतूक दरांमधील फरकांमुळे स्पर्धा निर्माण होते.

5) **रस्ते स्थिती :** रस्ते मालकी व देखभाल यामध्ये अनेक वेळा जबाबदारी टाळली जाते. राज्य व केंद्र सरकार यांच्यातील विसंवादातून रस्ते देखभालीकडे दुर्लक्ष होते. रस्त्यांचा वापर, योग्य दर्जा राखला जात नाही. यामुळे प्रवासाला अधिक वेळ लागतो. अपघातांचे प्रमाण वाढते.

तुमची प्रगती तपासा :

१) टीप द्या - रस्ते वाहतूक

९.३ लोहमार्ग वाहतूक

जमिनीवरील वाहतूकीचा लोहमार्ग हा महत्वाचा प्रकार आहे.देशांतर्गत वाहतूकीसाठी सुरक्षित अणि स्वस्त असा हा वाहतूकीचा प्रकार आहे.देशाच्या व्यापार अणि उद्योगांच्या विकासासाठी लोहमार्गांची भूमिका महत्वाची ठरते.

लोहमार्ग फायदे :

१) **अवजड मालाच्या वाहतूकीस उपयुक्त :** अवजड व मोठया आकाराच्या मालाच्या वाहतूकीस लोहमार्ग अधिक उपयुक्त ठरतात.

२) **अंतर व गतीक्षमता :** दूर अंतरासाठी लोहमार्ग उपयुक्त ठरतात. रेल्वेची गती व माल वाहून नेण्याची क्षमता जास्त असते.

३) **किफायतीशीर दर :** रेल्वे वाहतूकीचे दर किफायतशीर व सर्वसामान्यांना परवडणारे असतात. दरात एकसूत्रीपणा असतो.

४) आर्थिक, औद्योगिक व व्यापार वृध्दीस चालना मिळते.

५) **उत्पन्न वाढ :** लोहमार्ग निर्मितीचा सुरुवातीचा भांडवली खर्च जास्त असतो. परंतु कालांतराने त्याची भरपाई होऊ शकते. प्रवासी व माल वाहतूक यामुळे उत्पन्नात वाढ होते.

६) **अपघातांचे कमी प्रमाण :** रेल्वे वाहतूकीचे नियंत्रण अधिक कार्यक्षम असल्याने अपघातांचे प्रमाण कमी असते.

लोहमार्गाचे तोटे :

१) **मोठी भांडवली गुंतवणुक :** लोहमार्ग निर्मिती व इतर पायाभूत सुविधा यावर सुरुवातीला मोठी भांडवल गुंतवणूक करावी लागते.

२) **प्राकृतिक रचना व हवामानाचा प्रतिकूल प्रभाव :** पर्वतीय उंच सखल प्रदेशात अनेक ठिकाणी बोगदे खणून, पूल बांधून ,लोहमार्ग टाकावे लागतात ,त्यामुळे लोहमार्ग विकासाला मर्यादा पडतात.

३) **लवचिकतेचा अभाव :** लोहमार्ग वाहतूकीला स्थानकांचे बंधन असल्याने लवचिकतेचा अभाव असतो.

४) **व्यवस्थापन खर्च :** रेल्वे व्यवस्थापनावरील खर्च मोठा असतो.

५) **अंतराची मर्यादा :** माल वाहतूकीसाठी कमी अंतरासाठी रेल्वे वाहतूकीचा खर्च जास्त येतो कारण मालाची चढ- उतार खंडितपणा यावरील खर्च वाढतो.

तुमची प्रगती तपासा :

१) टीप द्या - रेल्वे वाहतूक

९.४ नळ वाहतूक

द्रव पदार्थ किंवा वायूरुप घटकांची ने-आण करण्यासाठी नळ वाहतूकीचा वापर केला जातो.अशा प्रकारची नळ वाहतूक खनिज तेल व नैसर्गिक वायू उत्पादन क्षेत्रापासून ते बंदरापर्यंत किंवा शुध्दिकरण प्रकल्पांपर्यत किंवा बाजारपेठेपर्यंत केली जाते. तसेच पाण्याच्या साठयापासून घरापर्यंत किंवा उद्योगापर्यंत केली जाते.यासाठी वापरले जाणारे नळ हे लोखंडी किंवा प्लास्टीक पासून बनविलेले असतात. तसेच नळ वाहतूक जमिनीच्या खालून केली जाते.

नळवाहतूकीचे फायदे व तोटे / मर्यादा

फायदे

१) नळ वाहतूकीसाठी कोणत्याही प्रकारचे इंधन लागत नाही.

२) या मार्गाच्या देखभालीच्या खर्चाची जास्त गरज नसते.त्यामुळे हे मार्ग स्वस्त असतात.

३) नळ वाहतूक लवचिक वाहतूक आहे.

४) जमिनीच्या खालून जात असल्याने ही वाहतूक सुरक्षित वाहतूक आहे.

५) या वाहतूकीमुळे कोणत्याही प्रकारचे प्रदूषण होत नाही. त्यामुळे ही वाहतूक पर्यावरणपूरक वाहतूक आहे.

६) लोहमार्ग किंवा रस्त्यांपेक्षा या वाहतूकीतून लवकरात लवकर वाहतूक होते.त्यामुळे वेळेची बचत होते.

७) या वाहतूकीवर मालाची चढउतार करावी लागत नाही.त्यामुळे मजुरांवरील खर्चाची बचत होते.

८) या वाहतूकीवर प्राकृतिक रचनेचा कोणताही परिणाम होत नाही.त्यामुळे उंचसखल भाग,दलदलीचे प्रदेश,पाण्याखालूनही नळ वाहतूक करता येते.

९) या वाहतूकीवर हवामानाचाही कोणताच परिणाम हात नाही.त्यामुळे शीत किंवा उष्ण भागातही नळ वाहतूक करता येते.

तोटे

१) सुरवातीला नळ वाहतूकीचे नळ तयार करण्यासाठी खूप मोठा खर्च येतो.

२) पर्वतीय प्रदेशात नळ वाहतूक करणे अवघड असते.

३) विविध प्रदेशातून नळ मार्ग जात असल्याने त्या त्या ठिकाणांहून जमिनीच्या परवानगी घेणे अवघड होते.

४) या वाहतूकीत छोटीशी चूक सुध्दा फार मोठया अनर्थाला कारणीभूत ठरते.

५) समाजातील विघातक घटकांकडून नळ मार्गाला मोठा धोका असतो.

तुमची प्रगती तपासा :

१) टीप द्या - नळ वाहतूक

९.५ दोरी मार्ग (रोप वे)

सखल भागातून उंचावर जाण्यासाठी किंवा एका उंच भागातून दुसऱ्या उंच भागात जाण्यासाठी रोप वे चा वापर केला जातो. यामध्ये दोन्ही टोकाची ठिकाणे धातूच्या दोरीने जोडलेली असतात. दुर्गम किंवा अतिशय खोल भाग खाली राहतो व रोप वे उंचावरुन नेला जातो.यामुळे अशा प्रदेशात इतर मार्गांनी येणारे धोके टाळता येतात.शिवाय अशा प्रदेशात खरेतर मार्ग काढणेच अवघड असते.या वाहतूकीतून माणसांची ने-आण तर केली जातेच परंतु विशेषत : दुर्गम भागात बांधकामाचे साहित्य वाहून नेण्यासाठी ही वाहतूक उपयुक्त ठरते. अलिकडच्या काळात पर्यटन वृध्दीसाठी या रोप वें चा वापर मोठया प्रमाणावर केला जात आहे. उदा. सिंगापूर मधील जगप्रसिध्द सी वर्ल्ड पर्यटन क्षेत्रामध्ये एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्यासाठी अद्यावत रोप वे तयार केलेले आहेत.

तुमची प्रगती तपासा :

१) टीप द्या - दोरी मार्ग

९.६ जलवाहतूक

वाहन जेव्हा पाण्यातून किंवा सागराच्या पृष्ठभागावरुन जाते तेव्हा त्या वाहतूकीस जल वाहतूक असे म्हणतात मानवाने प्राचीन काळापासून जलवाहतूकीचा वापर केलेला आहे. परंतु आज त्याचे स्वरुप बदलले आहे. महासागर, समुद्र, नद्या, कालवे, सरोवरे यांचा वापर मोठया प्रमाणात केला जात आहे. आंतरराष्ट्रीय व्यापार वृध्दींगत होण्यास जलमार्गांचीच भूमिका महत्वपूर्ण ठरलेली आहे. मार्गांचा निर्मिती खर्च कमी, कमी इंधन, भार क्षमता जास्त यामुळे जरी वेळ लागत असला तरी जलवातुक सुरक्षित व फायदेशीर मानली जाते.

जलवाहतूकीचे फायदे व तोटे/ मर्यादा

फायदे

१) **वाहतूक खर्च कमी :** जलमार्ग निसर्गत : उपलब्ध असल्याने त्यांच्या बांधणीचा, दुरुस्तीचा खर्च येत नाही. शिवाय ते मुक्त असल्याने अनेक ठिकाणी कर द्यावे लागत नाही. बोटीतून अवजड माल एकाच वेळी वाहून नेता येतो यामुळे जलवाहतूक स्वस्त असते.

२) **आंतरराष्ट्रीय व्यापारातील महत्व :** आजचा बहुतांशी आंतरराष्ट्रीय व्यापार जलमार्गानेच होतो.

३) **आर्थिक विकासाला चालना :** जलवाहतूकीमुळे अनेक देशांच्या अर्थिक विकासाला चालना मिळाली आहे. उदा. इंग्लंड, जपान, सिंगापूर

४) **सुरक्षित वाहतूक :** जल वाहतूक स्वस्त, सुलभ आणि सुरक्षित असते. काचसामान शास्त्रीय उपकरणे यांसारख्या नाजूक मालाची सुरक्षित वाहतूक होते.

तोटे / मर्यादा :

१) **संथ वाहतूक :** जलवाहतूक मंद गतीची असल्याने प्रवासाला जास्त वेळ लागतो.

२) **हवामान स्थितीचा परिणाम :** धुके,वादळे यांसारख्या प्रतिकूल हवामान स्थितीचा जलवाहतूकीवर प्रतिकूल परिणाम होतो.

३) **नाशवंत मालाच्या वाहतूकीस निरुपयोगी :** जलवाहतूक मंद गतीची असल्याने दुग्ध पदार्थ, फळे, मांस यांसारख्या नाशवंत पदार्थाच्या वाहतूकीस उपयुक्त नाही.

४) **राजकीय परिस्थिती :** वाहतूक मार्गावरील देशात राजकीय संबंध सलोख्याचे असावे लागतात.राजकीय संघर्षामुळे मध्यंतरी काही काळ सुएझ कालवा बंद होता.

तुमची प्रगती तपासा :

१) टीप द्या - जल वाहतूक

९.७ विमान वाहतूक :

जगामध्ये विमान वाहतूक मार्गाचा विकास १९१४-१९१९ च्या दरम्यान झाला.यानंतर विमान वाहतूकीमध्ये बरीच क्रांती झालेली आहे. यामुळे कमी वेळात अधिक अंतर कापले जाते. आता विमानमार्ग बृहवृत्ताला अनुसरुन आखलेले असतात. बृहदवृत म्हणजे पृथ्वीच्या पृष्ठभागावरील दोन स्थळांमधील कमीत कमी अंतर असणारा मार्ग होय. वातारणाच्या स्थितांबरात (१०-१२ किमी उंचीवरुन) जेट विमाने प्रवास करतात. अतिवेगाने जातात आणि त्यांना कमी इंधनाची आवश्यकता असते. साहजिकच जग आणखीच लहान होत चालले आहे. जग खेडे (Global Village) ही संकल्पना आता वास्तवात येऊ शकली. काही विमानमार्ग तर विना थांबा सेवा पुरवित आहेत. उदा. लंडन ते न्युयॉर्क मार्ग. अति दूर अंतराच्या मार्गासाठी एखादा थांबा असून वेळेची बहुमोल बचत होते. उदा. मुंबई-दिल्ली-न्युयॉर्क मार्गात युरोप-अशिया खंडात विमान वाहतूक मोठया प्रमाणात विकसित झालेली आहे.

विमान वाहतूकीचे फायदे व मर्यादा

फायदे

१) विमान वाहतूकीमुळे कमी वेळात अधिक अंतरापर्यंत जाता येते

२) ब्राझील कॅनडा यांसारख्या दुर्गम प्रदेशात विमान वाहतूकीमुळे जाता येते.

३) कमी वजनाचे टपाल व मौल्यवान वस्तू, नाशवंत माल इत्यादींची वाहतूक विमानामुळे लवकर करता येते.

४) व्यवस्थापनात गुंतलेल्या लोकांच्या वेळा व श्रमाला मूल्य प्राप्त झाल्याने विमानामुळे वेळ व श्रमाची बचत होते.

५) पूर्वीचा सोव्हिएत रशिया, संयुक्त संस्थाने, कॅनडा यांसारख्या विस्तीर्ण देशात भौगोलिक अंतर कमी वेळेत कापण्यासाठी विमान वाहतूक अत्यंत उपयुक्त असते.

६) बेट समुहाच्या देशांमध्ये (उदा.फिलिपाईन्स) रस्ते व रेल्वेपेक्षा विमान वाहतूक उपयुक्त होऊ शकेल.

७) आर्थिकदृष्टया विकसित झालेल्या देशांत / खंडात लोक विमान वाहतूकीचा मार्ग स्वीकारतात. उदा. संयुक्त संस्थाने, युरोपमधील देश, जर्मनी, फान्स, इटली इत्यादी.

८) पर्यटन व्यवसायाचा विकास होण्यास विमान वाहतूकीचा हातभार लागतो.

९) सुपर सॉनिक विमानामुळे कमी वेळेत थेट वाहतूक होते, यामुळे वेळेची बचत होते.उदा.लंडन –न्युयॉर्क

१०) आपात्कालीन परिस्थितीत विमान वाहतूक अत्यंत उपयुक्त असते. उदा. पूर व भूकंपात लोकांचे प्राण वाचविते, जखमीना घेऊन जाते, अन्नाची पाकिटे पूरग्रस्त किंवा डोंगराळ भागात वाटणे शक्य होते.

मर्यादा -

रेल्वे रस्ते व जल वाहतूकीपेक्षा सर्वात महाग विमान वाहतूक सेवा आहे. यामुळे सर्वसामान्य तसेच मध्यमवर्गीय लोक याचा विचारही करु शकत नाही.

विमान सेवेसाठी हँगर, विमानतळ, इंधनाच्या सुविधा इत्यादींची व्यवस्था करावी लागते.याचा भांडवली खर्च खूपच असतो.

प्रतिकूल हवामानाचा परिणाम विमान वाहतूकीवर होतो. उदा. हिमवादळ, बर्फवृष्टी वादळी हवामान, दाट धुके, धुळीची वादळे अशा हवेच्या काळात विमानमार्ग बदलावे लागतात किंवा दुस-या नगराच्या विमानतळावर विमान उतरावे लागते.

आकाराने मोठया व अवजड वस्तूची वाहतूक विमानाद्वारा होऊ शकत नाही.

तुमची प्रगती तपासा :

१) टीप द्या - विमान वाहतूक

_____

_____

_____

_____

_____

९.८ वाहतूक दर / खर्च संकल्पना

व्यक्ती किंवा माल एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी वाहून नेण्यासाठी द्यावी लागणारी किंमत म्हणजे वाहतूक दर होय. वाहतूक दर हा मुख्यतः ग्राहकांवर अवलंबून असतो. उदा. व्यापारात उत्पादित वस्तूची किंमत किरकोळ व्यापाऱ्याला गृहीत धरुनच ठरविली जाते. वाहतूक दर वाहतूकीच्या प्रकारानुसार बदलतो. नागरी भूगोलातील किंवा वाहतूक भूगोलातील सिंध्दांतानुसार वाहतूक दर अंतराच्या प्रमाणात असतो. काही भूगोलतज्ञांनी याला पुष्टी देत वाहतूक दर केवळ अंतरावर नाही तर वाहतूकीच्या प्रकारावरही अवलंबून असतो असे मांडलेले आहे. प्रत्येक वाहतूक प्रकाराचा दर व त्यासाठी रावविल्या जाणाऱ्या यंत्रणेचा दर हा ठरलेलाच

असतो. उदा. रेल्वे अणि रस्ते मार्ग यांचा दर जमिनीची किंमत, बांधकाम खर्च व देखभाल खर्चानुसार ठरलेला असतो. नळ वाहतूकीमध्येही हा दर जमिनीची किंमत, बांधकाम खर्च व देखभालीचा खर्च यावरुन ठरलेला असतो.हवाई वाहतूकीत जमीन आणि विमानतळ बांधणी खर्च व देखभाल तसेच वाहतूक साधन व इंधन यावर ठरविला जातो. मजूर खर्चही त्यामध्ये अंर्तभूत असतो. वाहतूक दर जमिनीच्या प्रकारावर तसेच उत्पादनाच्या प्रकारावरही अवलंबून असतो.

वाहतूक दराचा परिणाम हा सर्वच आर्थिक क्रियांवर होतो तसेच तो आंतरराष्ट्रीय व्यापारावरही होतो. वाहतूक क्रियांवर जगातील ६० टक्के खनिज तेलाचा वापर केला जातो. वाहतूकीच्या विविध प्रकारांमध्ये वाहतूक दर वेगवेगळा असतो.

तुमची प्रगती तपासा :

१) टीप द्या - वाहतूक दर

_____

_____

_____

_____

_____

९.९ स्थलीय परस्पर संबंधांचे आधार

स्थलीय परस्पर संबंध हे दोन प्रदेशांना एकत्र आणण्याच्या प्रक्रियेतील महत्वाचा दुवा आहेत. स्थलीय परस्पर संबंध ही एक सर्वसामान्यपणे वापरली जाणारी संज्ञा असून आंतरखंडीय स्थलांतरीत कच्चा मालाची आवक जावक इ. मधून परस्पर स्थलीय संबंध व्यक्त होतात. ही संकल्पना सर्वप्रथम भूगोलतज्ञ एडवर्ड उलमन यांनी वापरली. त्याने यासाठी तीन महत्वाचे आधार सांगितले ते पुढीलप्रमाणे

१) परस्पर पूरकता
२) स्थलीय अदलाबदल
३) मध्यस्थीची संधी

१) परस्पर पूरकता – एडवर्ड उलमन यांच्या मताप्रमाणे दोन वेगवेगळया प्रदेशातील आंतरसंबंध वाढीस लागण्याचे कारण म्हणजे ते दोन्ही प्रदेश एकाच प्रकारचे असले तरी त्यांच्या ठिकाणी उपलब्ध असणाऱ्या घटकात किंवा सामग्रीत उपलब्धता जास्त असलेला प्रदेश कमी उपलब्धता असलेल्या प्रदेशाला ती सामुग्री पुरवतो. यातूनच त्या दोन्ही प्रदेशातील परस्पर आंतरसंबंध वाढीस लागतात. उदा. मध्य पुर्वेतील देश खनिज तेलाच्या बाबतीत समृध्द असल्याने ते खनिज तेलाची कमतरता असलेल्या इतर देशांना त्यांचा पुरवठा करतात. तसेच शहराच्या जवळच असलेल्या ग्रामीण भागातून शहरातील लोकांना जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा केला जातो.

२) स्थलीय अदलाबदल – वेगवेगळया प्रदेशातील उपलब्ध संपत्ती साधनांनुसार वेगवेगळे व्यवसाय स्थापन होत असतात. मात्र बऱ्याचदा संपत्ती साधनांच्या / कच्चा मालाच्या गुणवैशिष्टयानुसार उद्योगाच्या स्थापनेच्या स्थानामध्ये अदलाबदल करणे क्रमप्राप्त ठरते. कच्चा मालावर प्रक्रिया केल्यानंतर जर त्याच्या वस्तूमानामध्ये मोठया प्रमाणात घट होणारी असली तर असे उद्योग कच्चा मालाच्या ठिकाणी उभारणे उचित ठरते. याउलट त्यासाठी आवश्यक असणारी शक्तीसाधने जर जादा खर्चिक ठरणारी असतील तर अशावेळी उद्योगाच्या स्थापनेच्या स्थानामध्ये अदलाबदल करुन योग्य व कमी खर्च येणाऱ्या ठिकाणी उद्योगाची स्थापना करावी.

३) मध्यस्थीची संधी – दोन वेगवेगळे प्रदेश एकमेकांना जोडण्याचे काम तिसराच एखादा प्रदेश सहजपणे करीत असतो. दोन प्रदेशातील लोकांच्या असणा-या जीवनावश्यक चैनीच्या गरजांची त्यांच्या मागणीप्रमाणे पूर्तता करणारे हे एक महत्वाचे ठिकाण असते. बऱ्याच वेळेला घाऊक बाजारपेठ अशा दोन प्रदेशांना एकत्र आणण्याचे काम म्हणजेच मध्यस्तीचे काम करीत असते.

तुमची प्रगती तपासा :

१) 'स्थलीय परस्पर संबंध' स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

_____

९.१० जागतिक व्यापार संघटना

गॅट करारा नंतर व्यापार संघटना स्थापना झाली. व्यापार आणि जकात विषयक सर्वसामान्य करार याची स्थापना १९४८ मध्ये जिनेव्हा येथे झाली याचा उदेश व्यापार विषयक अडथळे दूर करुन व्यापाराला चालना देणे हा आहे. जागतिक व्यापार संघटनेची स्थापना १९९५ मध्ये झाली. जागतिक व्यापार संघटनेचे १५० सभासद राष्ट्र असून यापैकी ७५ टक्के सभासद राष्ट्रे ही विकसनशील आहेत. जागतिक व्यापार सेवा व बौध्दिक संपदांची देवाणघेवाण यांचा यात समावेश होतो.

विना अडथळा व्यापार हा संघटनेचा उद्देश असून कोणताही देश दुस-या देशाला विशेष सवलत देणार नाही. सर्व देश हे समान पातळीवर असतील व्यापारातील अडथळे दूर सारुन व्यापारात उदारीकरणाचा प्रयत्न या संघटनेचा आहे. जागतिक व्यापार संघटना ही मुक्त व्यापार संघटना नाही.परंतु संघटनेची नियमावली ही उदार व सर्वसमावेश स्पर्धेला अनुकूल आहे. या करात आंतरराष्ट्रीय व्यापराविषयक मूलभूत नियमांचा समावेश करण्यात आता आहे.विविध देशांमधील करार मसुदे सुरु राहण्यासाठी संघटनेच्या आधीन राहून व्यापार करणे गरजेचे आहे.

कमी विकसीत व विकसनशील देशासाठी खालील मुद्दे विचारात घेण्यात आले आहेत.

१) बाजारपेठा विकसित करुन व्यापाराला चालना देणे.
२) सहभागी देशांनी विकसनशील देशांना व्यापार विषयक संरक्षण देणे
३) विकसनशील देशांनी व्यापार विषयक नियमामध्ये शिथिलता देणे.
४) विकसनशील देशांना कालावधीमध्ये शिथिलता देणे.
५) अशा देशांना तांत्रिक सहाय्य देणे.

जागतिक व्यापार संघटनेच्या ध्येयधोरणांवर खालील मुद्यांना अनुसरुन टीका होत आहे.

१) गरीब देशांना श्रीमंत देशांशी व्यापार करताना सवलती देणे भाग पाडले जाते.
२) विकसनशील देशांना मताचा समान अधिकार देण्यात आलेला नाही.
३) संघटनेमध्ये पारदर्शकता नाही.
४) विकसनशील देशांकडे दुर्लक्ष केले जाते.
५) श्रीमंत राष्ट्रे अनुदानात कपात करण्याऐवजी तेथील शेतक-यांना विविध सवलती व वेगळी ध्येयधोरण राबवून अनुदाने चालू ठेवत आहेत.

ओपेक (OPEC) :

ओपेक ही पेट्रोलियम उत्पादक देशांची निर्यात संघटना आहे.सन १९६० मध्ये जगातील प्रमुख खनिज तेल उत्पादक देशांनी मिळून इराकमधील बगदाद येथे ओपेक ही संघटना स्थापन केली. सन १९६० नंतर खनिजतेल उत्पादक देशांनी जादा मागणीमुळे तेलाच्या किंमती वाढविण्यास सुरुवात केली. सन १९६० ते १९७२ दरम्यान असणारी तेलाची किंमत प्रति बॅरल २ डॉलर ही १९७३ नंतर ३० डॉलर प्रति बॅलर झाली. त्याच काळात तेलाच्या किंमतीवर नियंत्रण ठेवण्यासाठी इराण, इराक, कुवेत, सौदी अरेबिया व व्हेनेझुएला या देशांनी ओपेके (OPEC) संघटना स्थापना केली. त्यानंतर संयुक्त अरब अमिरात, कतार, अल्जेरिया, लिबिया नायजेरिया, अंगोला व इक्वेडोर हे देश या संघटनेत सामील झाले.

ओपेकचे मुख्यालय व्हिएन्ना (ऑस्ट्रिया) येथे आहे.

ओपेक सदस्य राष्ट्रात तेल उत्पादन कमी जास्त प्रमाणात होत असते. याचा मोठा परिणाम आंतरराष्ट्रीय तेल किंमतीवर पडत असतो. उदा. १९७३ मध्ये ठराविक देशांना तेल निर्यात बंद केली होती. त्याचे महत्वाचे कारण म्हणजे इस्त्रायल विरुध्द इजिप्त व सिरिया यांच्यामधील येम किपूर युध्दात पाश्चिमात्य राष्ट्रांनी इस्त्रायलला पाठिंबा दर्शवून मदत केली होती. याचा परिणाम म्हणजे तेलाच्या किमती चार पटीने वाढल्या व काही महिने ही स्थिती कायम होती.

परंतु सामंजस्याचा अभाव व इराण मधील युध्दामुळे ओपेक संघटना कमजोर होऊन तेलाच्या किंमती १३ डॉलर प्रति बॅरलपर्यंत खाली घसरल्या नंतरच्या इराक, कुवेत युध्दामुळे तेलाच्या किंमती पुन्हा वधारुन ४० डॉलर्स प्रति बॅरल झाल्या जे सर्वात मोठे आयातदार देश आहेत अशा विकसित देशावर सध्या ही संघटना दबाब आणत असते.

असियान (ASEAN) :

असियान म्हणजे आग्नेय अशियातील राष्ट्राचा महासंघ, असियान महासंघाची स्थापना १९६७ मध्ये बँकाक येथे झाली. इंडोनेशिया, मलेशिया, फिलिपाईन्स, सिंगापूर व थायलँड ही असियानची स्थापित राष्ट्रे आहेत. ब्रुनेई व्हिएतनाम म्यानमार, लाओस व कंबोडिया व लाओस ही राष्ट्रे असियानमध्ये नंतर समाविष्ट झाली. त्याच वसाहतीवादी, साम्राज्यवादी या राष्ट्रातील मळयाची शेती, खनिजे व येथील बाजारपेठांचे शोषण केले. परिणाम त्यांच्यात आर्थिक असंतुलन निर्माण झाले. येथील लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी हे देश उत्पादनाचे मूल्य मिळविण्यासाठी औद्योगिक विकासाच्या प्रयत्नात आहेत.

या संघटनेचा मुख्य उद्देश हा अर्थिक विकास, सामाजिक प्रगती व सांस्कृतिक विकासाचा वेग वाढवणे व प्रादेशिक शांतता व स्थिरता यांना प्रोत्साहन देणे हा आहे. असियान देश हे आर्थिक समाजिक, सांस्कृतिक, तांत्रिक, शास्त्रीय व प्रशासकीय यासारख्या समान मुदयावर एकमेकांना सहकार्य करीत आहेत.शेती व उद्योगाचा पुरेपर वापर व्यापार विस्तार, वाहतूक व दळणवळण सुधारणा आणि येथील लोकांचे जीवनमान उंचावणे हे या असियान संघटनेचे मुख्य उद्दिष्ट आहे.

असियान देशातील जकात कर कमी केल्यामुळे या देशातील व्यापार वाढला. परंतु असियान देशांचा व्यापार हा उर्वरित जगाशी वेगाने वाढत आहे. सिंगापूर व्यतिरिक्त या देशातील प्राथमिक उत्पादने ही पश्चिमेकडील देशांना व जपानला निर्यात केली जातात. असियान देश हे गुंतवणुकीसाठी पाश्चात्य देशावर अवलंबून आहेत.

सार्क -

सार्क म्हणजे दक्षिण आशियातील देशांची प्रादेशिक सहकार्याची संघटना या संघटनेची स्थापना १९८४ मध्ये झाली. आर्थिक,तांत्रिक,सामाजिक व सांस्कृतिक प्रगती द्वारे परस्पर सहकार्याने विकास करणे ही सार्कची उद्दिष्टे आहेत. या संघटनेत भारत, बांगलादेश, पाकिस्तान, श्रीलंका, नेपाळ, भुतान व मालदिव हे सात संस्थापक सदस्य देश आहेत. सन २००७ मध्ये अफगाणिस्तान या संघटनेत सामील झाला.

सार्कची संकल्पना सर्वप्रथम बांगलादेशाने १९७७ मध्ये मांडली. १९७० च्या दशकाच्या उत्तरार्धात समान व्यापार विषयक धोरणासाठी दक्षिण अशियाई देशांचा समूह बनविण्यात सार्क संघटना तयार झाली. १९८१ मध्ये सात देशांच्या परराष्ट्र सचिवांची प्रथम सभा झाली. त्यानंतरच्या कोलंबो सभेत प्रादेशिक सहकार्याची पाच मुख्य क्षेत्रे ठरविण्यात आली. ती क्षेत्रे पुढीलप्रमाणे –

१) कृषी व ग्रामीण विकास
२) दूरसंचार , विज्ञान, तंत्रज्ञान व हवामानशास्त्र
३) आरोग्य व लोकसंख्या
४) वाहतूक
५) मानव संसाधन विकास

सार्क संघटनेच्या सनदेमधील प्रमुख उद्दिष्टे -

१) दक्षिण आशियायी लोकांचे कल्याण करण्यासाठी व त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रोत्साहन देणे.

२) वैयक्तिकदृष्टया लोकांना आत्मसन्मानाने व पूर्ण क्षमतेने जगण्याची संधी देवून आर्थिक वाढ, सामाजिक प्रगती साधणे व त्यांचा सांस्कृतिक विकास करणे.

३) दक्षिण आशियायी देशांना आत्मनिर्भर बनविण्यास प्रोत्साहन देणे.

४) सहभागी देशांचे आर्थिक, सामाजिक,सांस्कृतिक, तांत्रिक व विज्ञान क्षेत्राात सहकार्य व संबंध प्रस्थापित करणे.

५) इतर विकसनशील देशांबरोबर सहकार्य वाढविणे

सार्क संघटनेमध्ये सहभागी देशांमध्ये शांतता प्रस्थापित करण्याबरोबरच स्थिरता व विकासास प्रोत्साहन देण्याचा सार्क संघटनेचा प्रयत्न आहे. तसेच सर्वच दक्षिण आशियायी देशांना भेडसावणाऱ्या समस्या देखिल बऱ्याच अंशी समान आहेत. या समस्या ओळखून त्यावर समाधानकारक तोडगा काढण्याचा सार्क संघटनेचा प्रयत्न आहे. सार्क संघटना ही दक्षिण अशियायी देशांमध्ये आर्थिक, सामाजिक, तांत्रिक सहकार्यातून देशांमध्ये स्वयंनिर्भरता निर्माण करण्यावर भर देत आहे. तसेच सहभागी देशांचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रयत्नशील आहे.

युरोपियन युनियन -

युरोपमधील फ्रान्स पश्चिम जर्मनी, इटली, बेल्जियम, लक्सेंबर्ग व नेदरलँड या सहा देशांनी युरोपियन समुदायाची स्थापना केली या देशांनी युरोपियन आर्थिक समुदायाची स्थापना करण्याच्या उद्देशाने १९५७ मध्ये रोम संधीवर स्वाक्ष-या केल्या या संधीच्या आधारावर हा युरोपियन आर्थिक बाजार किंवा युरोपियन सामाजिक बाजार १ जानेवारी १९५७ पासून कार्यरत झाला.

लॅटिन अमेरिकन मुक्त व्यापारी संघटना-

१९६० मधे लॅटीन अमेरिकन मुक्त व्यापारी संघटना अस्तित्वात आली. या संघटनेमध्ये दक्षिण अमेरिकेतील प्रदेश आहेत. ते आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये सुलभता यावी म्हणून एकत्र आले. अर्जेंटिना, ब्राझील, चीली, मेक्सिको हे देश या संघटनेचे मूळ सदस्य आहेत.

ब्रिक्स (BRICS), ब्राझील, रशिया, भारत, चीन, दक्षिण आफ्रिका -

सन २००१ मध्ये गील्डमैन सैच नावाच्या आर्थिक सल्लागार संस्थेचे अर्थशास्त्रज्ञ जिम ओ. हबल यांनी ब्रिक या देशाची संकल्पना सर्वप्रथम मांडली. यांच्या मते ब्राझील, रशिया, भारत व चीन हे चार देश वेगाने विकासाच्या मार्गावर असून सन २०५० पर्यंत अमेरिका व युरोपियन संघातील देशाच्या पेक्षा जास्त हे देश आपला विकास साध्य करतील यांचे कारण या चार देशाच्या अर्थव्यवस्थेच्या आकार मोठा असून जगाच्या एकूण उत्पादन १५.४ ट्रिलियन डॉलर इतके आहे.

तुमची प्रगती तपासा :

१) टीप द्या

   १) जागतिक व्यापार संघटना
   २) ओपेक
   ३) सार्क
   ४) ब्रिक्स
   ५) लॅटिन अमेरिकन मुक्त व्यापारी संघटना

❖❖❖❖

१०

भारतातील अर्थिक विकास

घटक संरचना :

१०.० उद्दिष्टे
१०.१ प्रस्तावना
१०.२ भारतातील प्रादेशिक विषमता
१०.३ भारतातील आर्थिक विषमता
१०.४ आर्थिक विषमतेची कारणे
१०.५ नैसर्गिक साधनसंपत्तीचे असमान वितरण
१०.६ जातीरचना
१०.७ जागतिकीकरण आणि भारतीय अर्थव्यवस्था
१०.८ जागतिकीकरणाचे भारतीय समाजावर झालेले परिणाम
१०.९ जागतिकीकरण व त्याचा अर्थव्यवस्था आणि समाजावरील परिणाम
१०.१० जागतिकीकरणाचा भारतीय अर्थव्यवस्था व समाजावर होणारा परिणाम
१०.११ जागतिकीकरणाचा पर्यावरणावर होणारा परिणाम
१०.१२ सेझ (SEZ)

१०.० उद्दिष्टे

- भारतातील विविध प्रकारच्या विषमतांचा अभ्यास करणे.
- जागतिकीकरणाचा भारतावर झालेला परिणाम समजून घेणे.
- सेझ बद्दल माहिती घेणे.

१०.१ प्रस्तावना

अलिकडील काळात अर्थिक विकास ही संकल्पना व्यापकपणे विचारात घेतली जाते. आर्थिक विकासात दारिद्र्य, विषमता अणि बेकारी कमी करण्याबरोबरच जीवनाच्या गुणवत्तेतील सुधारणेचाही समावेश करण्यात येतो.जीवनाची गुणवत्ता म्हणजे स्वास्थ्य, पर्यावरण, दर्जेदार शिक्षण , चांगले आरोग्य होय. आर्थिक स्थितीतील वाढीबरोबरच जीवनाची उत्कृष्ट गुणवत्ता यांचा समावेश आर्थिक विकासात केला जातो.म्हणजेच अर्थिक विकासात शास्त्रीय ज्ञानाचा वापर आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार अपेक्षित आहे. आर्थिक विकास ही दीर्घकाळ चालणारी व गतीशील प्रक्रिया आहे. अर्थिक विकासाबरोबरच सामाजिक अर्थिक व राजकीय क्षेत्रात सतत परिवर्तन होत असते.

भारतीय अर्थव्यवस्था ही अल्पविकसीत अर्थव्यवस्था आहे. देशातील बरीचशी लोकसंख्या दारिद्रयरेषेखाली आहे. देशातील नैसर्गिक साधन संपत्तीचाही योग्य व पुरेसा वापर होत नाही. आजच्या अल्पविकासाचे प्रमुख कारण म्हणजे ब्रिटीशांच्या काळात झालेले आर्थिक शोषण आहे.

त्या काळात भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासाच्या दृष्टीने कोणतेच खास प्रयत्न केले गेले नाहीत. भारताच्या स्वातंत्र्याच्या काळात भारतीय अर्थव्यवस्था खूप मागासलेली होती. नंतरच्या काळात नियोजनाच्या माध्यमातून व पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून आर्थिक विकास समतोलीत करण्याचा प्रयत्न केला गेला.आज भारतीय अर्थव्यवस्था ही पूर्णपणे विकसीत झालेली नसली तरीही ती विकासाच्या मार्गावर असलेली दिसून येते.

भारताच्या नियोजनाच्या काळात झालेले शेती विकासात्मक बदल, औद्योगिकरणातील प्रगती, वैद्यकीय क्षेत्रातील प्रगती, तंत्रज्ञानातील सुधारणा, वैज्ञानिक झेप या सर्वांचा परिणाम देशाच्या आर्थिक विकासावर होत आहे. मेक इन इंडिया, डिजीटल इंडिया इ. च्या माध्यमातून भारताच्या आर्थिक विकासाचा वेग अधिक गतीमान करण्याचा प्रयत्न केला जात आहे. नव्यानेच अंमलबजावणी होत असलेली जीएसटी प्रणाली म्हणजेच वस्तू व सेवा करप्रणालीमुळे भारताच्या प्रादेशिक आर्थिक विकासातील विषमता कमी होईल.

१०.२ भारतातील प्रादेशिक विषमता

निसर्गामध्ये अनेक बाबतीत विविधता असलेली आढळते. निसर्ग निर्माण होत असतानाच बहुधा त्याची विविधांगाने निर्मिती झालेली आहे. निसर्गातील फरक लोक, प्रदेश, रचना, स्थिती इ. बाबतीत आढळतो. या फरकालाच नैसर्गिक फरक किंवा विविधता असे म्हणतात. या निसर्गनिर्मित असणाऱ्या अटी म्हणजे जणू मानवावर लादलेली एक निसर्गाची बळजबरीच असे म्हणावे लागेल. म्हणूनच मानव नेहमी आपल्या विकासाचा मार्ग शोधत असताना निसर्गाच्या या बळजबरीपणाचा कमीत कमी कसा परिणाम होईल हे पाहत असतो. सामाजिक, आर्थिक, राजकीय धार्मिक आणि सांस्कृतिक बाबतीत हा फरक नेहमीच जाणवत असतो. यालाच सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक आणि सांस्कृतिक विषमता असे म्हणतात.

आर्थिक विषमता ही निसर्गामध्ये फारच जटिल बनली आहे व ती सध्याच्या आधुनिक जगाचा एक महत्वाचा विषय बनली आहे. आर्थिक विषमतेमुळे इतर अनेक प्रकरच्या समस्या विषमता निर्माण होत असतात. त्यामुळेच आर्थिक विषमताच मुळात कमी केल्यास इतर विषमता आपोआपच कमी होण्यास मदत होईल.

आर्थिक विषमता म्हणजे लोकांना जीवन जगण्यासाठी ज्या विशिष्ट प्रकारच्या गरजांची हक्कांची आवश्यकता असते त्या गरजांची आर्थिक कारणामुळे योग्यप्रकारे पूर्तता न होता आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक आणि धार्मिक गरजांतील उपलब्ध संधी हया आर्थिक विषमतेमुळे हिरावून घेतल्या जातात.

अनेक देशांमध्ये विशेषत: विकसनशील देशामध्ये अर्थिक विषमता ही त्याच्या विकासाचा अडसर ठरते की ज्यामुळे अशा देशांचे नियोजित विकास आराखडे आणि प्रत्यक्ष फलश्रुती यांच्यातील दरी रुंदावत जाऊन तेथील आर्थिक सामाजिक व सांस्कृतिक जडणघडणच बिघडूनच ताणतणाव निर्माण होतात.

कोणत्याही अर्थव्यवस्थेचा अभ्यास करत असताना त्या प्रदेशातील लोक सर्वसाधारपणे दोन गटामध्ये विभागले जातात. ते म्हणजे १) गरीब लोक २) श्रीमंत लोक, जगातील बहुतांशी लोकसंख्या ही पहिल्या गटामध्ये म्हणजेच गरीब लोक या गटात सामावलेली असून कमी लोक श्रीमंत आहेत. जगामध्ये गरीब व श्रीमंत लोकांतील ही विषमतेची दरी आर्थिक, शैक्षणिक, उत्पन्न, साधनसंपदा, पगार इ. बाबतीत दिवसेंदिवस वाढतच असलेली आढळते. त्यामुळेच आर्थिक विकासाद्वारे लोक कल्याणकारी योजना राबवणे ही खऱ्या अर्थाने एक डोकेदुखी ठरत असून हे मोठे आव्हानच आहे.

तुमची प्रगती तपासा :

१) भारतातील प्रादेशिक विषमता स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

_____

१०.३ भारतातील अर्थिक विषमता :

भारताच्या अर्थव्यवस्थेचा अभ्यास केला असता भारतातील आर्थिक विषमतेचा इतिहास हा थेट ब्रिटिश राजवटीपर्यंत जाऊन पोहोचतो. ब्रिटीश लोकांना आपल्या राजवटीच्या काळामध्ये भारतातील ज्या ठिकाणाच्या प्रदेशातून त्यांना आर्थिकदृष्टया व शासकीयदृष्टया विशेष फायदा होणारा होता त्याच भागांचा विकास केलेला आढळतो. त्यामुळे या भागाव्यतिरिक्त उर्वरित भारतातील भाग हा दुर्लक्षित राहीला. प्रामुख्याने मोठे-मोठे उद्योगधंदे हे समुद्रकिनारीच स्थापन करण्यात येऊन त्याचा विकास साध्य केला. तसेच शैक्षणिक सुविधा हया ज्या भागामधून सहज व स्वस्त मनुष्यबळ उपलब्ध होण्याजोगे होते त्याच ठिकाणी विकसित करण्यात आले. ब्रिटीशांनी सिंचनासाठी कालव्याची निर्मिती केली. पण ज्या भागामध्ये शेती योग्य जमीन असून ज्यांची उत्पादकता व सुपीकता जास्त आहे अशाच भागात त्याचा विकास केला. ब्रिटीशांनी आपल्या प्रशासकीय कामकाजासाठी समाजातील प्रमुख हुशार व्यक्ती व श्रीमंत घराणी निवडून त्यांना आपले दलाल केले. याच लोकांच्यामार्फत ब्रिटीश आम जनतेकडून अनेक प्रकारचे कर, संपत्ती, साधनसंपदा अक्षरश: ओरबाडून घेत होते.यासाठी या लोकांना ब्रिटीश राजवटीने / सरकारने अनेक प्रकारचे खास अधिकारही दिले होते. हीच बाब नेमकी आर्थिक विषमता वाढविण्यास कारणीभूत ठरलेली आढळते.

भारताच्या स्वातंत्र्योत्तर काळामध्ये आर्थिक विषमता कमी करण्यासाठी खास प्रयत्न केलेले आढळतात. आर्थिक विषमतेच्या विविध गुणवैशिष्टयांचा अभ्यास करुन १९५१ नंतरच्या आर्थिक नियोजनामध्ये यावर विशेष लक्ष केंद्रीत केल्याने पुढील काळात थोडयाफार प्रमाणात का होइना आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक विषमतेमध्ये घट झालेली आढळते.

भारतातील आर्थिक विषमतेचे प्रकार :

आर्थिक विषमतेचा अभ्यास करत असताना भारत सरकारच्या वेगवेगळया निकषांच्या आधारे सरकारी आर्थिक योजना भारतीय रिझर्व्ह बँक योजनेमार्फत भारतीय आर्थिक विषमतेचा अभ्यास करुन पुढील प्रकार स्पष्ट केलेले आढळतात.

उत्पन्न व संपत्तीतील विषमता :

स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये उत्पन्नाच्या वितरणामध्ये मोठया प्रमाणात विषमता होती. स्वातंत्र्यानंतर त्यामध्ये फरक पडेल असे वाटले होते मात्र प्रत्यक्षात स्वातंत्र्योत्तर काळातील नियोजनामध्ये या विषमतेत आणखीनच वाढ झालेली आढळते.एकूण राष्ट्रीय उत्पनाचा ५० % वाटा हा केवळ २० टक्के लोकसंख्येच्या ताब्यात असून उरलेल्या ८०% लोकांकडे ५०% राष्ट्रीय उत्पन्न आहे. म्हणजेच राष्ट्रीय उत्पन्नाचे वितरण किती असमान आहे याची कल्पना येऊ शकते.

संपत्तीच्या वितरणाचा अभ्यास केला असता यापेक्ष वेगळीच परिस्थिती अनुभवास येते ती म्हणजे केवळ २७% लोकांच्या हाती एकूण संपत्तीपैकी ५७% संपत्ती असलेली आढळते तर उरलेली ४३% संपत्ती ९०% लोकांच्या वाटयाला आलेली आहे. शेतीच्या बाबतीत यापेक्षा वेगळी परिस्थिती नसून भारतातील एकूण शेतकऱ्यापैकी ७२ % शेतकऱ्यांच्या वाटयाला एकूण शेतजमीनीपैकी केवळ २८% शेतकऱ्यांच्या ताब्यात असलेली आढळते. एकंदरीत त्यांच्या हाती जास्तीत जास्त संपत्ती असून जवळपास ८०% लोकसंख्या यापासून वंचीतच असलेली आढळते.

शैक्षणिक विषमता : भारत हा खेडयाचा देश असून भारतातील जवळपास ८०% लोकसंख्या (कुटुंबे) ही ग्रामीण भागातच रहात आहेत.या कुटुंबाचे दरडोई उत्पन्न पाहिले असता ते अतिशय कमी असून त्यांच्या शैक्षणिक विकासास त्यांना हातभार लावता येण्याइतपतही त्यांची परिस्थिती नाही. त्यामुळेच आर्थिक परिस्थिती नसल्यानेच या कुटुंबातील बरीचशी मंडळी शिक्षणापासून वंचित राहिलेली आढळतात. ज्यांनी शिक्षण घेतले आहे ते सुध्दा अर्धवटच असून त्यांना सर्व सोईंनी युक्त असणाऱ्या शाळासुध्दा अशा ग्रामीण भागात उपलब्ध असत नाहीत. कुटुंबातील लहान मुले ज्यांचे वय सात / आठ वर्षाचे असते तीही मुले काहीं ना काही तरी रोजगार करुन कुटुंबाला आधार देण्याचा प्रयत्न करत असतात. बालमजूर ही समस्या यातूनच निर्माण झालेली आहे. यामुळेच ग्रामीण भागातील मुलांना शिक्षणापासून वंचित रहावे लागते. त्यांच्याजवळ बुध्दीमत्ता आहे पण परिस्थितीमुळे त्यांना शिक्षण घेता येत नाही. शिक्षण घ्यायचे म्हटले तर जवळपास शिक्षणाच्या सोई नाहीत. सोई आहेत त्या ठिकाणी योग्य प्रकारची साधनसामुग्री उपलब्ध नाही.शिवाय अशा शाळा या कुठेतरी कोणत्याही प्रकारच्या ज्यांना मान्यता नाही किंवा सरकारी नियंत्रण नाही अशा संस्था किंवा विद्यापीठांशी संलग्न असलेल्या आढळतात. त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना अपुरे शिक्षण मिळते. त्यामुळे ग्रामीण भागातील शिक्षणाचा दर्जाच घसरलेला आढळतो.

याउलट शहरी भागातील लोकांची मुले ही उच्च श्रीमंत लोकांची असल्याने त्याठिकाणी शिक्षणाचा दर्जा हा उत्तमप्रकारे राखला जातो. विविध प्रकारची साधनसामुग्री व सोईसुविधांनी युक्त असणाऱ्या सुसज्य शाळा, कॉलेज शहरी भागात पावलापावलावर उपलब्ध असतात त्यापैकी काही आंतरराष्ट्रीय किर्तीच्या असतात.

अशा शाळांमधून शहरी भागातील मुलांना शिक्षणाच्या सोई उपलब्ध होतात. थोडक्यात ग्रामीण भागातील मुलांना शिक्षणाची वानवा तर शहरी भागातील मुलांना शिक्षणाची रेलचेल अशी परिस्थिती आढळते.

तुमची प्रगती तपासा :

१) भारतातील आर्थिक विषमता स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

_____

१०.४ आर्थिक विषमतेची कारणे :

१) राजकीय कारणे :

राजकीय पक्षांतर, सरकार कोसळणे, मतांचे राजकारण अशाप्रकारची परिस्थिती राज्यस्तरीय तसेच राष्ट्रीय पातळीवर सर्रासपणे पहावयास मिळते. यामुळेच आपले सरकार राजकीयदृष्टया दुर्बल बनलेले असून राजकीय सूत्रे धनदांडग्या मूठभर लोकांच्या हातामध्ये गेलेली आढळतात व यातूनच सर्वसामान्य लोकांचे समाधान होईल असा कोणताही निर्णय घेतला जात नाही. सर्वसामान्य लोकांमध्ये बेरोजगारी समाजकल्याणकारी योजनांची वानवा अशा प्रकारची परिस्थिती आढळते. यामुळेच काही ठरावीकच श्रीमंत लोक अजूनही श्रीमंत बनत असून त्यांच्याच हातात राजकीय सूत्रे असल्याने जे सर्वसामान्य लोकांची फसवणूक करुन अर्थिक विषमता वाढवतच आहेत.ग्रामीण भागाकडे राजकीय लोकांचे म्हणावे तसे लक्ष नसल्याने शहरे दिवसेंदिवस वाढतच असून ग्रामीण भाग मागासलेलाच राहिला आहे. आर्थिक विकासाचा जास्तीत जास्त वाटा उच्च सुशिक्षित अणि राजकारणाशी संबंधीत असलेल्य लोकांच्याच हातात राजकीय दबावापोटी पडत असलेला आढळतो.

२) प्रशासकीय कारणे :

प्रशासकीय सेवेमध्ये असलेल्या लोकांच्यावर समाजातील काही मूठभर लोकांचे वर्चस्व असलेले आढळते किंवा हे लोक राजकीय नेत्यांच्या दबावाखली कार्यरत असतात.त्यामुळे त्याचा परिणाम प्रत्यक्षात विकास कामावर होतो.प्रशासकीय अधिका-यांवर राजकीय दडपण आणून काही ठराविक मंडळीच आपल्या भागाचा विकास साध्य करण्यामध्ये गुंतलेले असतात.यातूनच काळया बाजाराचा विकास आणि भ्रष्टाचाराला सुरुवात होते व त्याचाही परिणाम प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरित्या विकास कामावर झालेला पाहावयास मिळतो.

उच्चपदस्थ अधिका-यापासून ते अगदी शेवटच्या थरामधे लोक या भ्रष्टाचारामध्ये गुंतलेले असल्याने भ्रष्टाचार ही भारतातील सर्वसामान्यपणे घटनाच बनलेली आहे. स्वत:चे चांगले कार्य सिध्द करण्यासाठी व चांगले काम करुन दाखवण्यासाठी हे लोक जास्तीत जास्त गुंतवणूक अणि विकास योजना या विकसीत भागामध्येच सुरु करुन लवकरात लवकर त्याची फलश्रुती मिळविण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे विकसीत भाग अधिकच विकसीत बनतात तर मागासलेले भाग तसेच मागासलेले राहतात.मागासलेल्या भागामध्ये योजना राबवून त्याचा विकास घडवून आणण्याची मानसिकता अशा प्रशासकीय अधिकाऱ्यांमध्ये दिसून येत नाही.

तुमची प्रगती तपासा :

१) भारतातील आर्थिक विषमतेची कारणे द्या.

_____

_____

_____

_____

_____

१०.५ नैसर्गिक साधनसंपत्तीचे असमान वितरण

भारताच्या विविध भागातील व प्रदेशातील नैसर्गिक साधनसंपत्तीचे वितरण पाहिले असता ते असमान झालेले आढळते. नैसर्गिक साधनसंपत्तीची विपुलता असलेल्या भागात औद्योगिक क्षेत्रांचा विकास झपाटयाने होतो.याशिवाय या प्रदेशात शैक्षणिक सुविधा रोजगारांची उपलब्धता इ. बाबतीत कमतरता असल्याने ते भाग मागासलेले राहतात.

१०.६ जातीरचना /पध्दती

भारतीय समाजामध्ये प्रामख्याने हिन्दु धर्म असून तो अनेक जातींमध्ये विभागलेला आहे. या ठिकाणी सामाजिक जाती वर्ग रचना फारच महत्वाची मानली जाते. भारतातील जातीव्यवस्था कमी करण्यासाठी शासकिय तसेच निमशासकीय संघटनाद्वारे प्रयत्न केले जातात. त्यातूनच एक वेगळया प्रकारची जातीहीन समाज व्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो. जातीव्यवस्था मुळासकट उपटून टाकून परंपरागत पाळल्या जाणऱ्या अस्पृश्यता सारख्या पारंपारिक पध्दती नष्ट करुन समाजातील शेवटच्या थरातील राहाणाऱ्या लोकांनाही समान शिक्षण, रोजगार, अन्य सामाजिक सुखसोई उपलब्ध करुन देण्याची गरज आहे.तरच देशामध्ये आर्थिकदृष्टया कमकुवत असणारे लोक विकासाच्या प्रवाह मार्गात सामील होतीव व यातूनच आर्थिक विषमतेची दरी कमी होण्यास मदत होईल.

वरील सर्व विवेचनातून आपणांस शेवटी असे विधान करता येते की भारताच्या अर्थिक विषमतेमुळे भारताच्या आर्थिक विकासाचा दर अतिशय खाली राहिलेला आहे. ग्रामीण भागातील विकासाची दर रुंदावत चालली आहे. कृषी विकास रोडावलेला आहे. असंतुलीत वाढ,

गुन्हेगारीत वाढ, बेरोजगारीचा प्रश्न, शेती व उद्योगधंद्यातील वीजपुरठयाचा अभाव व कमतरता बालसंगोपनासाठी आवश्यक असणाऱ्या पोषक आहाराची कमतरता, दूध औषधाचा अभाव, औषधामधली भेसळ हॉस्पीटल-दवाखने यातील गलीच्छपणा, रस्ते, महामार्ग यांच्यातील खड्डे बाजारपेठेतील अतिरिक्त गर्दी, वर्तमानपत्रातील रोजगार गुन्हेगारी, बालमजूर अशा एक ना अनेक समस्या आज भारतासमोर उभ्या असून भारताला स्वातंत्र्य मिळवून ७० वर्षे झाली तर अजूनही भारतातील आर्थिक विषमता कमी होऊ शकलेली नाही.

१०.७ जागतिकीकरण आणि भारतीय अर्थव्यवस्था

माहिती तंत्रज्ञान आणि दूरसंचार प्रणालीतील क्रांतीमुळे जागतिकीकरण प्रक्रियेला गती प्राप्त झाली आहे.यामुळे आता कोणत्याही प्रकारची माहिती कमीत कमी वेळेत जगाच्या कानाकोपऱ्यात पाठविता येते. यातूनच जगाची एक विस्तृत बाजारपेठ निर्माण होत आहे. जागतिकिकरणामुळे विविध सांस्कृतिक उत्पादनांचा आंतरराष्ट्रीय व्यापार वाढला. उदा. प्रकाशन, फिल्म, संगीत इ. त्यामुळे बऱ्याच भारतीयांना पाश्चात्य संस्कृतीची माहिती झाली यामुळे भारतीय समाजातही स्थित्यंतरे झाली.संस्कृती, मूल्ये, परंपरा यात बदल झाले. याची काही लोकांना भिती वाटते. यामुळे आपली भारतीय संस्कृती धोक्यात येईल असे वाटते. कारण जागतिकीकरणाचा तोटा जास्तीत जास्त विकसनशील देशांनाच सहन करावा लागतो.

१०.८ जागतिकीकरणाचे भारतीय समाजावर झालेले परिणाम

१) अन्नाच्या /जेवणाच्या सवयीत बदल:

बऱ्याच भारतीयांच्या - विशेषत : शहरी भागातील-खाण्यापिण्याच्या सवयी बदलत आहेत.पारंपारिक खाद्य पदार्थां ऐवजी वडा सांबर, पोहे, शिरा, पिझ्झा मॅक्डोनाल्डचे फास्ट फूड बर्गर किंवा चायनीज लोकप्रिय होत आहे.

२) सामाजिक कार्यक्रमांवरील परिणाम :

वाढदिवस, लग्न, गणेशोत्सव, नवरात्री इत्यादींवर पाश्चात्य संस्कृतीचा प्रभाव वाढत आहे. धांगडधिंगा वाढत आहे.

३) सर्वसाधारण वर्तणुक :

भारतीय समाज पारंपारिक व संकुचित मनोवृत्तीचा होता. जागतिकीकरणामुळे– मिडिया-दूरदर्शनमुळे पाश्चिमात्य संस्कृतीतील बऱ्याच गोष्टी आपल्या समाजात येत आहेत. भारतीय समाज बदलत आहे. अधिक मुली, स्त्रिया, शिक्षण, नोकरी यात पुढे जात आहेत उदा. वैद्यक, अभियांत्रिकी, पायलट, टॅक्सी ड्रायव्हर किंवा अवकाश संशोधन, अंतरिक्षात भरारी इ.

४) व्यापारी घटक / व्यवसाय :

जागतिकीकरणामुळे भारतातील नगरे पूर्णतः बदलत आहेत. वाण्याच्या दुकानाच्या जागी मॉल्स–बिग बाजार, फूड बाजार, वॉलमार्ट, डी-मार्ट इ. उभे रहात आहेत. तसेच सिने वंडर, सिटी प्राइड, आयमॅक्स, सिनेमॅक्स इ. मल्टीप्लेक्स थिएटर्स उभी रहात आहेत.

५) **असमानता :** जागतिकीकरणामुळे समाजात असमानता वाढत आहे.तसेच शहरातील श्रीमंत व ग्रामीण भागातील गरीब यांच्यातील असमानता प्रचंड प्रमाणात वाढत आहे.

तुमची प्रगती तपासा :

१) जागतिकीकरणाचे भारतीय समाजावर झालेले परिणाम सांगा.

१०.९ जागतिकीकरण व त्याचा अर्थव्यवस्था आणि समाजावरील परिणाम

संस्कृती, परंपरा, व्यापार, गुंतवणूक आणि सेवांची जागतिक पातळीवर मुक्तपणे देवाण- घेवाण जागतिकिकरणाच्या प्रक्रियेत होते.

मुक्त व्यापाराची चळवळ जुनीच आहे. अगदी मेसोपोटेमिया, सिंधु नदी व इजिप्तमधील प्राचीन राजवटीतही जागतिकीकरण असा खास ठसा न वापरताही वस्तू सेवा व संस्कृतीची देवाणघेवाण चालूच होती.अगदी १९ व्या शतकातही आजच्या सारख्याच जागतिकीकरणाच्या प्रक्रिया आढळत होत्या व बरेच काळ त्या चालू होत्या.

जागतिकीकरणाच्या संकल्पनेत जागतिक अर्थव्यवस्थेला एकच घटक मानले आहे.ही अर्थव्यवस्था संपूर्ण जगभर एकाचवेळी कार्यरत असते ही आर्थिक संकल्पना आहे.यामध्ये भांडवलाचा प्रवाह, मजूर, बाजारपेठा माहिती, कच्चा माल, व्यवस्थापन असे सर्वच घटक आंतरराष्ट्रीय पातळीवर एकमेकांशी संबंधित असतात.नव्याने विकसीत होत असलेल्या दळणवळण संपर्क साधने व माहिती तंत्रज्ञानाचा फायदा जागतिकीकरणामुळे मिळतो व त्यामुळे जागा व वेळ या दोघांचीही मोठया प्रमाणावर बचत होते. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत जग हे सामाजिक-राजकीय बंधने नसलेले व्यापारी युनीट आहे असे मानले जाते. व्यापारीकरण हाच जागतिकीकरणाचा केंद्रबिंदू आहे. या प्रक्रियेत वेगवेगळया देशांतून कोणत्याही अडथळयाविना माणसे, माल, सेवा, व्यापार, संकल्पना व माहितीची देवाणघेवाण दुसऱ्या देशात सहज होऊ शकते. कॉम्प्युटर व दूरसंचार सेवांच्या विस्तारामुळे जागतिककरणाची प्रक्रिया अधिक वेगाने व सुलभतेने होऊ लागली. जागतिककरणात मुक्त अर्थव्यवस्था अपेक्षित आहे त्यामुळे अधिक वेगाने व चांगल्या प्रकारे मुक्त बाजारपेठांची संकल्पना राबविता येईल. त्यामुळे खाजगी कंपन्या, खुली स्पर्धा त्यामुळे चांगला माल-व्यावसायिकता इ. चा फायदा होतो.त्यामुळे विशिष्ट प्रकारचा माल विशिष्ट प्रदेशात तयार होतो व त्याचे जगभर वितरण होते. यामुळे जागतिकीकरणाची प्रक्रिया सुलभ होते.

१०.१० जागतिकीकरणाचा भारतीय अर्थव्यवस्था व समाजावर होणारा परिणाम

गेल्या २० वर्षात जागतिकीकरणाचा भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेला परिणाम पुढीलप्रमाणे :

१) **ग्राहकांचा फायदा :** जागतिकीकरणामुळे स्पर्धा वाढली.स्थानिक तसेच परदेशी उत्पादक बाजारपेठेत आले त्यामुळे ग्राहकांना कमी पैशात चांगला माल मिळू लागला. उदा. पूर्वी आपल्या देशात फियाट व हिंदूस्थान अशा दोनच मोटार कंपन्या होत्या आज टोयोटा, सुझुकी, होंडा अशा अनेक बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या गाडया बाजारपेठेत आहेत. त्यामुळे ग्राहकांना चांगल्या गाडया स्वस्तात मिळू लागल्या.

२) **नवीन रोजगार संधी :** ब-याच बहुराष्ट्रीय कंपन्यांनी भारतात गुंतवणूक केली. या कंपन्या सेल फोन, इलेक्ट्रॉनिक्स, गाडया, फास्ट फुड, सॉफ्ट ड्रिंक तसेच बँका व विमा कंपन्या या क्षेत्रात कार्यरत आहेत. त्यामुळे भरपूर प्रमाणात नवीन रोजगार संधी युवकांसाठी उपलब्ध झाल्या.

३) **नवीन तंत्रज्ञान आणि उत्पादन प्रक्रिया :** स्पर्धा वाढल्यामुळे बऱ्याच भारतीय कंपन्यांना फायदा झाला. या कंपन्यांनी नवीन तंत्रज्ञान व उत्पादन पध्दतीत मोठी गुंतवणुक केल्यामुळे त्यांच्या मालाची गुणवत्ता वाढली. काही कंपन्यांनी परदेशी कंपन्याबरोबर करारही केले आहेत.

४) **भारतीय बहुराष्ट्रीय कंपन्या :** मोठया भारतीय कंपन्याचा अधिक विकास होऊन त्या आज आंतरराष्ट्रीय स्तरावर बहुराष्ट्रीय कंपन्या बनल्या आहेत. उदा. इन्फोसिस, टाटा मोटर्स, रॅनबॅक्सी, एशियन पेंटस इ.इतर देशांतही या कंपन्यांचा विस्तार होत आहे.

५) **सेवा उद्योगाचा विकास :** भारतीय कंपन्या विशेषत : आयटी क्षेत्रातील कंपन्याना सेवा क्षेत्राचा विकास करण्याची संधी मिळाली. लंडनच्या कंपनीसाठी भारतीय कंपन्या मासिके छापतात. डेटा एंट्री, अकाउंटिग, प्रशासकीय कामे अशी बरीच कामे भारतीय कंपन्या परदेशी कंपन्यासाठी करतात.

तुमची प्रगती तपासा :

१) अर्थव्यवस्था व समाजावरील परिणाम सांगा.

_____

_____

_____

_____

_____

१०.११ जागतिकीकरणाचा पर्यावरणावर होणारा परिणाम :

जागतिकीकरणामुळे नैसर्गिक संपत्तीचा ऱ्हास होत आहे. पर्यावरणातील अविवेकी मानवी हस्तक्षेपामुळे मुळातच पर्यावरण संतुलनात धोका निर्माण झाला आहे. त्यात आता जागतिकीकरणाच्या प्रक्रियेची भर पडत आहे. खनिजे ऊर्जासाधने यांच्या उत्पादनाचा वेग वाढत आहे. नैसर्गिक साधनसंपत्तीच्या ऱ्हासामुळे मानवी संस्कृतीला धोका निर्माण झाला आहे. ऊर्जा साधनांच्या वापरामुळे प्रदूषणाची समस्या निर्माण होत आहे. यांत्रिकीकरण मोठया प्रमाणावर होत असल्याने त्यातूनही प्रदुषणाची समस्या निर्माण होत आहे. जैविक तंत्रज्ञानाचा वापर शेती क्षेत्रातही वाढत आहे. त्यातूनही पर्यावरणाला धोका निर्माण होतोय. शाश्वत विकासासठी उपलब्ध साधनसंपत्तीचा सुयोग्य वापर झाला पाहिजे नाहीतर पर्यावरणीय प्रदूषणाच्या समस्यांना सतत तोंड द्यावे लागेल.

तुमची प्रगती तपासा :

१) टीप द्या – जागतिकीकरणाचा पर्यावरणावर परिणाम

१०.१२ सेझ (SEZ)

देशातील परकीय गुंतवणूक वाढविण्यासाठी गरज व स्थानिक उद्योगाना मालाची निर्यात करण्यास प्रोत्साहन हे दोन प्रमुख उद्देश डोळयासमोर ठेऊन भारत सरकारने एप्रिल २००० मध्ये खास आर्थिक क्षेत्र सेझ स्थापण्याची घोषणा केली. २००७ पर्यंत ५०० पेक्षा जास्त सेझ प्रस्तावित होते व त्यापैकी २२० सुरु झाले होते.

सेझ संबंधीचा कायदा २००५ मध्ये मंजूर करण्यात आला.सरकारने याबाबतीत खूपच पुढाकार घेतला आहे. धोरणे आखून सेझ निर्माण करणे, धोरणांची पुनर्विचार करणे सेझ मध्ये कंपन्यांना भरपूर सुविधा देणे. या सर्वांना सरकारी मदत व पाठींबा दिला जातो.

भारतातील सेझ :

आंध्रप्रदेश, गुजरात, हरियाणा, कर्नाटक, महाराष्ट्र, ओरीसा, राजस्थान, तामिळनाडू, उत्तरप्रदेश, प.बंगाल , चंदिगढ

सध्या (२०१०) भारतात १०२२ युनिटस कार्यरत असून ती ९ सेझ प्रदेशात विभागली गेली आहेत. भारताच्या विविध भागांमध्ये हे सेझ प्रदेश असून त्यांचे क्षेत्र हे सरासरी २०० एकरचे आहे. या सेझ ची व्यवस्थापन खाजगी तसेच सरकारी आहे. काही ठिकाणी संयुक्त व्यवस्थापन आहे.

सेझ असलेल्या अनेक ठिकाणी वेगवेगळया समस्या निर्माण झाल्या आहेत. प्रामुख्याने शेतकऱ्यांचा ग्रामीण भागांतील लोकांचा राग आहे. सरकारी अधिकारी अतिशय कमी भावाने सेझसाठी जमीन संपादन करतात.त्यामुळे मूळ जमीन मालकांचे नुकसान हाते. ते विस्थापीत होतात. या प्रश्नांचा गंभीरतेने विचार चालू आहे. या संबंधात नेमलेल्या एका समितीने मूळ जमीन मालकाला बाजार भावापेक्षा सहापट रक्कम द्यावी असे सरकारला सुचविले आहे. बजाजसारख्या प्रतिष्ठित कंपन्याही सेझसाठी सुपीक शेतजमीनी ऐवजी ओसाड, नापीक जमीन वापरावी असे सुचवत आहेत.

सेझ (SEZ) बद्दलचा सार्वत्रिक विरोध –

१. महाराष्ट्राच्या अहमदनगर जिल्हयातील शेतक-यांनी त्यांच्या जमिनी सरकारने ताब्यात घेतल्याबद्दल आंदोलन केले.

२. महामुंबई सेझ बद्दलही स्थनिक लोकांचा राग आहे. त्यांच्या मतानुसार पैसे संपून जातात पण जमीन कायम राहते आणि म्हणूनच आपली जमीन प्रकल्पांना देण्यास त्यांचा विरोध आहे.

३. केरळमध्ये ही कोची व एर्नाकुलम जिल्हयातील सेझ प्रकल्पांसाठी जमीन संपादन करण्यास विरोध आहे.

३. बंगलूरु-म्हैसूर इन्फास्ट्रक्चर कॉरीडॉर प्रकल्पांना तेथील शेतकरी विरोध करत आहेत.

४. गुजरातमध्ये सरदार सरोवर प्रकल्प व मुंद्रा सेझ प्रकल्पांना हजारो शेतकरी व आदिवासींचा विरोध आहे.

५. हरियाणात गुरगांव जिल्हयातील सेझ च्या विकासाबद्दल तेथील शेतकरी आंदोलन करीत आहेत.

६. ओरिसातील (Posco, Strelite, Vedanta, VAIL) या विकास प्रकल्पांना स्थानिकांचा विरोध आहे .

७. चंदिगढ मये राजीव गांधी इन्फर्मेशन ॲन्ड टेक्नॉलॉजी पार्कच्या स्थापनेसाठी १०० हेक्टर जमीन संपादन करण्यास स्थानिक लोकांचा विरोध आहे.

तुमची प्रगती तपासा :

१) टीपा द्या.
   १) सेझ
   २) सेझ बद्दलचा विरोध

_____

_____

_____

_____

_____

❖❖❖❖